
अहम् आवाम्
वर्ष दहावे | अंक ५ | ऑक्टो-नोव्हें २०२२ | पृष्ठे ११६
वयम्
आपण सारे
कल्पक, चौकस
किशोरांचे मासिक
मूल्य ₹ २२०/-
दिवाळी २०२२


मिनू
अदिती पाध्ये-देसाई
aditeepd@gmail.com
अय्या! हे बघ माझ्या लहानपणीच्या गोष्टींचं पुस्तक सापडलं एकदाचं! आठवतंय तुला?.. मी मागे किती शोधत होते हे. माझ्या आजोबांनी मला भेट दिलं होतं. ते रोज मला यातल्या गोष्टी वाचून दाखवायचे. मी लग्नानंतर आठवणीने या घरी घेऊन आले होते, पण इतक्या वर्षांत कुठे ठेवलं होतं तेच विसरले. खूप छान आठवणी आहेत माझ्या या पुस्तकाबद्दलच्या.
खरंच गं.. खूप सुंदर चित्रं आहेत यातली. पण जुनं असल्याने पानं सुटतायत. या दिवाळीची धांदल संपली की बाईंडरकडून नव्यासारखं करून आणेन. मग तू छान जपून ठेव तुझ्या आजोबांची ही आठवण.
मिनू शाळेचं दिवाळी प्रोजेक्ट पूर्ण झालंय का?
हो.. सगळं लिहून तयार आहे. आता फक्त वही सजवायची राहिलीये.
अं... कशाने बरं सजवू वही? मला वाटतं.. जुन्या मासिकातील चित्रं छान दिसतील माझ्या गोष्टी आणि निबंधासाठी.
अरे वा! हे पुस्तक मस्तच आहे. किती सुंदर चित्रं आहेत.
माझे गाव
वाह! मस्त काम झालं. इतक्या वर्षांत पहिल्यांदाच दिवाळीची वही इतकी सुंदर झालीये; तीही आईच्या मदतीशिवाय. आईला दाखवून येते. जाम खूश होईल ती.

# Find the way

-Aditi Pdhye-Desai | *aditeepd@gmail.com*

Find your way through the dense forest to reach the ancient goddess with the help of clues. You will have to decode the clues first using the ancient script. Clues are given on page- 97



RNI NO.MAHMUL/2013/53138

अहम् आवाम्

कल्पक, चौकस किशोरांचे मासिक

# वयम्

वर्ष १० | अंक ५ | ऑक्टो-नोव्हें. २०२२

आश्विन/ कार्तिक/ मार्गशीर्ष शके १९४४

**प्रकाशक**
श्रीकांत बापट

**सल्लागार**
डॉ. अनिल काकोडकर
कुमार केतकर
डॉ. आनंद नाडकर्णी
डॉ. उदय निरगुडकर
अच्युत गोडबोले
राजीव तांबे
श्रीकांत वाड

**मुख्य संपादक**
शुभदा चौकर
(पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी)

**मुखपृष्ठ**
जुईली माहीमकर

**सुलेखन**
अच्युत पालव

**अंकातील चित्रे**
निलेश जाधव, गिरीश सहस्त्रबुद्धे, अदिती पाध्ये-देसाई, संतोष घोंगडे, जुईली माहीमकर, धनंजय गोरेगावकर आणि शुभांगी चेतन

**वरिष्ठ उपसंपादक**
क्रांती गोडबोले-पाटील

**मांडणी-सजावट**
क्रांती गोडबोले-पाटील

**मुद्रितशोधन**
शिवानी ओक

**वितरण व्यवस्था**
राजेंद्र गोसावी

'वयम् हे मासिक मालक, प्रकाशक श्रीकांत बापट यांनी मेसर्स रेड एलिफंट, ३१५/ए १, शाह ॲण्ड नाहर इंड. इस्टेट, ३रा मजला, एस. जे. मार्ग, लोअर परेल (प.) मुंबई- ४०००१३, येथे छापून, २०१, नंद चेंबर्स, वंदना सिनेमाजवळ, ठाणे- ४००६०२ येथे प्रसिद्ध केले. या अंकातील सर्व मतांशी संपादक सहमत आहेत असे नाही. सर्व हक्क प्रकाशकाधीन.

**संपादकीय विभाग :**
'वयम्', न्यू वंदना को.ऑप.हा.सो., ३रा मजला, लालबहादूर शास्त्री मार्ग, वंदना सिनेमाजवळ, ठाणे- ४००६०२.
दूरध्वनी : ०२२-२५९८६२७३/ ६९०८६२७३
इमेल : info@wayam.in

www.wayam.in

# अंतरंग

दिवाळी २०२२

**प्रकाशकीय** : श्रीकांत बापट- ६

**संपादकीय** : शुभदा चौकर- ८

**डगर चलत मोसे**- श्रीकांत बोजेवार- १२

**शब्दाचं बारसं** : वसुंधरा देवधर- १७

**उत्सवाचं रसायन** : डॉ. उज्ज्वला दळवी- १८

**खूप वेगळे** : प्रशांत असनारे- २०

**कल्पककला** : स्वरूपा वक्नाली- २१

**माझे किशोरवय** : पर्ण पेठे - २२

**काजव्यांच्या गावात** : डॉ. सुरेश सावंत- २७

**प्लॅन** : गणेश मतकरी- २८

**शिस्तीची दीपिका** : दीपिका पदुकोण- ३४

**राजूचा बागुलबुवा** : भारत सासणे- ३८

**निसर्ग-नवल** : मकरंद जोशी- ४२

**वाट चिमुकली** : दासू वैद्य- ४४

**डॉ. एलन स्वॅलो रिचर्डस** : वीणा गवाणकर- ४५

**लव्हस्टोरी** : राजीव तांबे- ४८

**शब्दखेळ** : प्रतिभा गोपुजकर- ५१

**डासांची फॅक्टरी** : डॉ. बाळ फोंडके- ५२

**तेज !** : कांचन जोशी– ५६

**Hide & Seek :** Mahimkar sisters- ५८

**विली, प्रिन्स आणि मी !** : प्रवीण दवणे– ६०

**आंतरजातीय मैत्री** : सुबोध जावडेकर– ६४

**राजा सूर्यदेवा** : डॉ. संगीता बर्वे– ७०

**मुंगीच्या पावलाने** : मृणालिनी वनारसे– ७२

**सुपरहिरो टांका** : स्मरणजित चक्रबर्ती / सुमती जोशी– ७६

**हितगुज** : एकनाथ आव्हाड– ७९

**वन-वाचनाचे नवे पान** : सलीम सरदार मुल्ला– ८०

**अशी ही माणसं** : नीरजा– ८३

**नंदादीपक** : डॉ. निर्मोही फडके– ८४

**पूर्वजांचे देणे** : डॉ. आनंद नाडकर्णी– ८८

**धाडसी धोंडू** : ईशान पुणेकर– ९२

**हसरी दुनिया** : मधुकर धर्मापुरीकर– ९६

**A Return Gift** : Vidya Dengle– ९८

**नव्या कोऱ्या कविता** : संकेत म्हात्रे, आदित्य दवणे, प्रथमेश पाठक आणि स्पृहा जोशी– १०१

**Cinderella Shoes** : Prachi Mokashi– १०४

**राम करवंदे** : मल्हार अरणकल्ले– १०८

**कुडता पेंटिंग** : श्रीनिवास बाळकृष्ण– ११२

**कोडी, शब्दखेळ, विनोद इत्यादी** : अदिती पाध्ये–देसाई, सुरेखा काणेकर, कांचन जोशी,
देवयानी खरे, ज्योती कपिले



'वयम्' वाचकांनो, हा अंक आवडतोय ना? तुमच्या प्रतिक्रिया, सूचना जरूर कळवा. तुमच्या मित्र-मंडळींनाही 'वयम्' मासिकाचे सभासद व्हायला सांगा.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

'वयम्' वाचकांनो, 'वयम्'चा हा दिवाळी अंक ऑक्टोबर-नोव्हेंबर जोड-अंक आहे.
पुढचा अंक डिसेंबरमध्ये प्रसिद्ध होईल.

**माझ्या बालकिशोर मित्र-मैत्रिणींनो,**



तुम्हां सर्वांना दसरा, दिवाळी व नवीन वर्षाच्या खूप शुभेच्छा.

२०२२ हे वर्ष आपल्या भारतीय स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष म्हणून साजरे होत आहे. आपल्या देशाची अर्थव्यवस्था सन २०२४ पर्यंत $ 5 trillions (पाच लक्ष कोटी डॉलर- पाचावर १२ शून्य) वर नेण्याची महत्त्वाकांक्षा मनाशी बाळगून आपले पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी काम करत आहेत. हे साध्य करण्यासाठी आपल्याला तंत्रज्ञानात नाविन्यपूर्ण काम (Technological Innovations) करणे फार महत्त्वाचे आहे.

अनेक शोध हे सर्वसामान्य माणसांच्या कल्पनेतून लागलेले असतात. वेल्क्रोचा शोध कसा लागला माहितीये?– एका युरोपियनने जंगलवाटेवरून फिरताना केलेल्या निरीक्षणातून.

कॉम्प्युटरचा शोध ही मानवजातीला मिळालेली फार मोठी देणगी आहे. आजकाल कृत्रिम बुद्धिमत्तेचा (Artificial Intelligence-AI) उपयोग सर्वत्र किती होतो आहे, हे तुम्हांला माहिती आहेच. आपल्या देशाच्या पुढील प्रगतीसाठी सर्व क्षेत्रांत विविध प्रकारच्या नव-कल्पना (innovations) प्रत्यक्षात येणे फार गरजेचे आहे; ती जबाबदारी, या देशाचे पुढील नागरिक म्हणून तुम्ही पेलाल, याची खात्री आहे.

मध्यंतरी बंगलोर येथे राहणाऱ्या मुदित दंडवते या अवघ्या २६ वर्षांच्या तरुणाने 'डोझी- Dozee' नावाच्या उपकरणाचा शोध लावला. त्याबद्दल आपण 'वयम्'मध्ये लिहिले होते. पेशंटच्या हृदयाची गती, श्वसनाची गती, ऑक्सिजनची पातळी, इसीजी इत्यादी नोंदी अचूकपणे करण्यासाठी एक पट्टा विकसित केला आहे. त्यात धोक्याची सूचना देणारा अलार्मदेखील आहे, त्यामुळे पेशंटला ताबडतोब उपचार मिळू शकतात. या उपकरणाचा वापर आत्तापर्यंत ३२,००० पेशंटवर केला गेला आहे.

'वर्ल्डवाईड ऑईलफिल्ड मशीन प्रायव्हेट लिमिटेड कंपनी', पुणे आणि 'Defence Research and Development Organisation' (डीआरडीओ) यांनी 'आत्मनिर्भर भारत' या योजनेअंतर्गत भारतीय सैन्य दलासाठी आपत्तीच्या वेळी वापरण्यासाठी 'माउंटन फूट ब्रिज'ची निर्मिती केली आहे. दुर्गम ठिकाणी आपत्तीच्या वेळी या पुलाचा मोठा उपयोग होणार आहे. या पुलाचे वैशिष्ट्य म्हणजे १५ जवान ९० मिनिटांत हा पूल सहज उभारू शकतात. या पुलाचा कोणताही भाग १८ किलोपेक्षा अधिक नाही. ३५ मीटर लांबीच्या ह्या पुलामुळे १०० फूट अंतर पार करता येऊ शकते. तो २० वर्षे टिकू शकेल.

अशी असंख्य उपयुक्त संशोधने विविध क्षेत्रातील कल्पक नागरिक करत आहेत. आत्मनिर्भर

भारताचे स्वप्न गाठण्याच्या या प्रयत्नांना आपण सर्वांनीच हातभार लावू या.

तुम्ही सर्वजण कल्पक आहात. तुमच्या कल्पना कायम फुलवत राहा. तुमच्या नव-निर्मितीतून आपले जीवन अधिकाधिक सुकर, सुंदर होत जाणार आहे.

कल्पकता, उद्यमशीलता यांच्या बरोबरीने तुम्ही संवेदनशील नागरिक म्हणून ही तीन तत्त्वे मनापासून पाळाल, अशी अपेक्षा मी करतो-

* देशाभिमान आणि राष्ट्राभिमान;

* आई, वडील, आजी, आजोबा व इतर सर्व मोठ्यांचा तसेच आपल्या देशाच्या रक्षणासाठी लढणाऱ्या जवानांचा आदर करणे;

* नागरिकशास्त्रात तुम्ही जे शिकता, त्या जबाबदारीच्या सर्व नियमांचे पालन करणे (civic responsibilities / civic sense).

तुमच्या पिढीत खूप क्षमता आहे. तुमच्या क्षमतांना खतपाणी देण्यासाठी आम्ही या आपल्या मासिकातून दर्जेदार साहित्य देत असतो. तुमच्या प्रतिक्रिया, कल्पना आमच्यापर्यंत पोहोचवत राहा.

आपले बापटकाका हे लॅबइंडिया ॲनॅलिटीकल इन्स्ट्रुमेंटस प्रा.लि. चे अध्यक्ष आहेत. त्यांच्या प्रेरणेतून आणि पाठबळातून गेली दहा वर्षे 'वयम्' मासिक प्रसिद्ध होत आहे.
-संपादक



**तुमचा,**
**बापटकाका**

**श्रीकांत बापट**
प्रकाशक, 'वयम्'

'साहित्य अकादमी' ही भारतातील राष्ट्रीय पातळीवरची प्रमुख साहित्यसंस्था आहे. १९५४ मध्ये नवी दिल्ली येथे ही साहित्यसंस्था स्थापन झाली. पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरु हे या संस्थेचे पहिले अध्यक्ष होते. साहित्य अकादमीतर्फे दरवर्षी मान्यताप्राप्त २४ प्रादेशिक भाषांतील सर्वोत्कृष्ट सर्जनशील साहित्यकृतींना पुरस्कार दिले जातात. २०१० पासून त्यांनी बाल साहित्य पुरस्कार द्यायला सुरुवात केली. आपल्या या अंकातील राजीव तांबे (२०१६), सलीम मुल्ला (२०१९) आणि डॉ. संगीता बर्वे (२०२२) या साहित्यिकांना साहित्य अकादमी पुरस्कार मिळाले आहेत. तसेच दिलीप प्रभावळकर, माधुरी पुरंदरे, आबा महाजन या साहित्य अकादमी पुरस्कार मानकऱ्यांचे साहित्यही 'वयम्' वाचकांना वाचायला मिळत असते. अनिल अवचट या साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्यांनीही आपल्या अंकात लिहिले होते, त्यांचे जानेवारी महिन्यात निधन झाले. त्यांना आदरांजली.

## संपादकीय



# अभ्यासालय आणि गमतालय!

**‘वयम्’ दोस्तांनो,**

मध्यंतरी काही दिवस स्वीडनला असतानाचा अनुभव... तिथली तरुण मुले बरीच स्वावलंबी असल्याचे जाणवले. बहुतांश स्वीडिश मुले स्वतःची सायकल स्वतः दुरुस्त करायची. प्रत्येकाला बेकिंगसह संपूर्ण स्वयंपाक करता येत होता. पोहणे, जिम्नॅस्टिक्स, प्रथमोपचार, साफसफाई अशी सर्व कामे आठवी-नववीतल्या स्वीडिश मुलांना सहजतः येत होती. हे कसे काय?

“हे आलं नाही तर आम्ही सहावी पास होऊ शकत नाही,” या मुलांनी सांगितले. हे ऐकल्यावर मी बुचकळ्यात पडले.

“आमच्या शाळेत हे विषय आहेत!” मी थक्क!

मग ठरवून स्वीडनमधल्या शाळांचा अभ्यासक्रम पाहिला. शालेय विषयांच्या यादीत कला, हाउसकीपिंग (घरकाम), कौटुंबिक जीवन, ग्राहकत्व, आरोग्य आणि फिटनेस हे रीतसर विषय आहेत. यातील प्रत्येक विषयाचा अभ्यासक्रम आहे. इयत्ता पहिलीत ही मुले घरातील भांडी कशी, कधी वापरायची हे शिकतात. धारदार सुरी किंवा कात्री दुसऱ्याला देताना कशी धरावी, जेणेकरून ती कोणाला लागणार नाही, शक्यतो न सांडवता कसे खायचे, एखादी गोष्ट दुसऱ्याला न दुखावता कशी छान रीतीने सांगायची, हेही पहिली-दुसरीत शाळेत शिकवले जाते. नकाशावरून रस्ता शोधणे, पॅकबंद खाद्यपदार्थांची लेबल समजून घेणे, कचऱ्याचे नीट व्यवस्थापन करणे- ही

कामे सहावीपर्यंतच्या सर्व मुलांना यावी लागतात. गणित, भाषा, विज्ञान या विषयांप्रमाणे याही विषयांची परीक्षा होते. यांपैकी कोणत्याही विषयात नापास झालेल्यांना तो विषय पुढच्या इयत्तेत पुन्हा अभ्यासावा लागतो. यातल्या एखाद्या विषयात टंगळमंगळ केल्यामुळे 'रिपीट' लागल्याचे किस्सेही काही स्वीडिश मुलांनी ऐकवले. स्वीडनमधल्या शाळा म्हणजे जणू 'फिनिशिंग स्कूल' आहेत; तिथे घरात, समाजात जगताना आवश्यक अशी कौशल्येही शिकवली जातात.

एका पार्टीनंतर पाहिलेले दृश्य मनावर कोरले गेले. पार्टी संपल्यावर त्या घरातील पाचवी ते दहावीच्या तीन मुलांनी मिळून सगळा कचरा आवरला. प्लास्टिकचे पेले, पुठ्ठ्याच्या प्लेट, खरकटे, उरले-सुरले वेगवेगळया डब्यांत टाकले. काचेच्या बाटल्या आणि त्यांची पत्र्याची बुचे वेगळी करून मगच विशिष्ट डब्यात वर्गीकरण करून टाकली. हे सर्व पटापट, कोणी न सांगता. हेही त्यांना शाळेत शिकवले होते! आणि ते अमलात आणायची सवयही त्यांच्यात रुजलेली होती. कमी लोकसंख्येच्या स्वीडनमध्ये वरकाम करायला मदतनीस मिळणे मुश्कील आणि प्रचंड महाग. त्यामुळे प्रत्येकाला स्वयंपूर्ण असावे लागते. सगळी कामे स्वतःची स्वतः करण्याची गरजही भासते आणि सवयही होते. त्यासाठी लागणारी कौशल्ये प्रत्येक जण कमावतो.

वाचायची सवय मुलांना लागावी यासाठी सुद्धा स्वीडिश शाळेतून जोरदार प्रयत्न होताना दिसले. एकदा मी लायब्ररीत बसलेले असताना १५-२० मुले त्यांच्या शिक्षिकेसह लायब्ररीत आली. प्रशस्त, सुरेख, रंगीबेरंगी होती ती लायब्ररी. ही मुले तिथे येताच लायब्ररीयन जागेवरून उठून त्यांना पुस्तके निवडायला मदत करू लागली. ही लायब्ररीयन स्वतः अधूनमधून मुलांच्या शाळेत पुस्तकांची बॅग घेऊन जाते आणि मुलांना पुस्तके वाटून येते. त्यामुळे तिची या मुलांशी ओळख होती. त्यांचा वाचनाचा तास आज या लायब्ररीत होता. कुणी तिथे पसरलेल्या गादीवर लोळत, तर कुणी कोनाड्यात, गुहेसारख्या जागेत बसून वाचू लागला. कोणी तिथल्या एका त्रिकोणी तंबूत बसून पुस्तके चाळू लागली. ते मोहक कोपरे, कट्टे, कोनाडे, गुहा बघून मीही तिथे बसून वाचण्याची मौज अनुभवली. चित्र काढणे, पुस्तकांतली पझल सोडवणे, तिथे ठेवलेले जिगसॉ रचणे अशीही मजा काही मुले करत होती. फक्त पुस्तकालय नाही, गम्मतालय होते ते!


हाही शाळेतील अभ्यास!





तिथे सर्व वयाच्या लहान मुलांसाठी प्रचंड प्रमाणात पुस्तके होती. या लायब्ररीतली बहुतांश पुस्तकं स्वीडिश भाषेतील होती. काही इंग्लिश, थोडी अन्य युरोपीय भाषांतील व अरेबिक भाषेतलीसुद्धा. १०-१५ हिंदी पुस्तकेही पाहायला मिळाली.

तेथे बहुतांश स्वीडिश मुले प्राथमिक शाळेत तरी स्वीडिश माध्यमातूनच शिकतात आणि प्रामुख्याने स्वीडिश पुस्तके वाचतात, जोडीला इंग्लिश पुस्तकेही. अगदी ७-८ वर्षांच्या मुलांसाठी सुद्धा स्वीडिश भाषेतील चरित्र मालिका पाहायला मिळाल्या- त्यात आईनस्टाईन, मेरी क्युरी, डार्विन,







महात्मा गांधीजी, व्हॅन गॉग, मलाला यांची छोट्या वाक्यांची, चित्रमय व रंजक चरित्रे होती. पिपी हे मूळ स्वीडनमधले कॅरॅक्टर. नऊ वर्षांच्या धीट, गोड पिपीची मालिका जगभरात भाषांतरित झालेली आहे. अगदी हिंदीतही. पिपीची एक गोष्ट मध्यंतरी आपल्या अंकात तुम्ही वाचली असेल. धनवंती हर्डीकर यांनी ती आपल्या 'क्लासिक' सदरात मराठीत रूपांतरित केली होती.

एक एकदम आगळे पुस्तक माझ्या हाती लागले. त्या पुस्तकात फेमस परीकथा होत्या. मात्र त्यात सर्वांच्या लिंगांची अदलाबदल केलेली होती. एका कथेत रापुंझेल ही परी नाही, तर परा- म्हणजे मुलगा होता आणि त्याला लांबलचक दाढी होती! त्यातल्या दुसऱ्या गोष्टीत मोठ्या व्यापारी जहाज मालकाच्या भूमिकेत एक धाडसी बाई होती आणि मुले शाळेतून परत येण्याची वाट बघत, विणकाम करत खिडकीत बसलेला पुरुष... स्त्री-पुरुष समानता रुजवणाऱ्या या आगळ्या परीकथा होत्या!

गंमत म्हणजे इथे एका वेळी एका सभासदाला किती पुस्तके घेता येत असतील? -कितीही, अगदी १०० सुद्धा! आणि बाजारात पुस्तके, मासिके सर्रास सर्वत्र विकत मिळतात- सुपरमार्केटमध्ये, चॉकलेटच्या दुकानात, रेल्वे स्टेशनवर. ट्रेनने-बसने प्रवास करताना वाचणारी मुले (आणि वाचणारे पालकही), हे चित्र सर्रास बघायला मिळाले.

तिथल्या मुलांकडेही स्मार्ट फोन आहेत, त्यांनाही सर्व प्रकारच्या स्क्रीनचे आकर्षण आहेच; त्यामुळे तिथल्या मुलांचे पालक व शिक्षकही चिंतेत आहेत. मात्र तिथल्या पालकांनी मुलांना काही नियम करून दिलेले आहेत, जे बहुतांश मुले पाळतात. रात्री ७-८ नंतर मुलांनी स्मार्ट फोन बाळगायचा नाही, अभ्यास करताना फोन दूर ठेवायचा, जेवताना फोन जवळपासही असू नये, रोजचा स्क्रीन-टाइम किती असावा, असे काही नियम शाळकरी मुले-पालक मिळून ठरवून घेतात.

"अशी शिस्त आणि नियम मुले पाळतात?" मी त्या लायब्ररीयनला विचारले.

"इथे येणारी, वाचणारी मुले इतपत शहाणी असतात ना!" ती खांदे उडवत म्हणाली!

मी मनातल्या मनात टाळी दिली! आपल्या 'वयम्'च्या ब्रीदवाक्याची प्रचीतीच जणू- 'वाचनातून विचार, विचारातून विकास.' वाचणाऱ्या

मुलांना स्वतःच्या विकासाचा विचार करता येतो. कोणत्या सुविधेचा वापर किती करायचा, स्वतःच्या मनाला शिस्त कशी लावायची, याचा विचार वाचत्या मुलांना करता येतो. तुमच्यासारख्या वाचत्या मुलांशी असे विचार शेअर करताना खूप समाधान वाटते, कारण तुम्ही समंजस आहात.

यावेळचा आपला दहावा दिवाळी अंक! दरवर्षीप्रमाणे याही अंकात भरपूर वैविध्य आहे. सर्व साहित्यिकांनी फार विचारपूर्वक साहित्य लिहिले आहे. विनोद, विस्मय, संवेदनशील, विचारी, विज्ञानविषयक, कलात्मक, मनोरंजक अशा सर्व रसांनी युक्त असे साहित्य या अंकात वाचायला मिळेल.

आपल्या सर्व चित्रकारांनी आशय समजून घेऊन छान चित्रे साकारली आहेत. संपादकीय टीमने खूप मेहनतीने साहित्यावरील संस्करण, शुद्धलेखन, सजावट यांवर काम केले आहे. कामात बुडून किंवा गुंतून जाण्याची मजा आपल्या पूर्ण टीमने पुरेपूर अनुभवली आहे.

तुम्हांला वाचताना मजा आली का, हे पत्र किंवा इमेल पाठवून कळवा.

तुम्हा सर्व कुटुंबीयांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!

**-शुभदा चौकर**
*cshubhada@gmail.com*

एक आठवण- दिवाळीत आपण पणत्या लावतो. घरात, दारात, दाराबाहेरही आणि आवारातही. कारण ज्योत म्हणते- ‘एकच ठावे काम मला, प्रकाश द्यावा सकलांला...’ (वि. म. कुलकर्णी यांच्या ‘ज्योत’ कवितेतून-) यंदा या सणाला तुम्ही कोणाच्या आयुष्यात आनंदाची ज्योत लावायचं ठरवलंय?

## दिवाळी अंक प्रतिक्रिया स्पर्धा

यंदा आपला दहावा दिवाळी अंक! दरवर्षीप्रमाणे याही अंकात भरपूर वैविध्य आहे. तुमचा हा ‘वयम्’ दिवाळी अंक वाचून झाला की, जरा १० मिनिटं वेळ काढा. या अंकासाठी आपल्या ‘वयम्’ कुटुंबातले अनेक साहित्यिक आणि कलाकार अत्यंत आस्थेने एकत्र आलेत. आमची सर्वांची छान मैत्री आणि एकजूट असल्याने आम्ही हे काम जाम एन्जॉय करतो. आमचा हा प्रयत्न तुम्हांला कितपत आनंददायी वाटतोय, ते आम्हांला नक्की कळवा.

- तुमच्या प्रतिक्रिया कागदावर सुवाच्य अक्षरात मराठी किंवा इंग्लिशमध्ये लिहा.
- शब्दमर्यादा २००.
- पाठवण्याची अंतिम तारीख- ३० नोव्हेंबर.
- प्रतिक्रिया पाठवण्याचा पत्ता- ‘वयम्’ मासिक, न्यू वंदना को. ऑप.हा.सो., ३रा मजला, लालबहादूर शास्त्री मार्ग, वंदना सिनेमाजवळ, ठाणे- ४००६०२, दूरध्वनी- ०२२ २५९८६२७० या पत्त्यावर पाठवा किंवा तुमच्या प्रतिक्रिया *ahamawamwayam@gmail.com* या इमेलवर पाठवा.

# डगर चलत मोसे...

## आजच्या काळातली ताजी, उत्कंठावर्धक गोष्ट-

**सप्तकच्या** घरात गेले तीन दिवस अस्वस्थता पसरलेली होती. कुणीच कुणाशी फार बोलत नव्हते, एकमेकांकडे थेट बघतसुद्धा नव्हते. खरं तर दर तासाला कुणाचा ना कुणाचा अभिनंदनाचा फोन येत होता. फोनवर बोलताना प्रत्येक जण अगदी आनंदाने बोलत असल्याचा आव आणून 'थँक यू' वगैरे म्हणत होते, परंतु फोन संपला की पुन्हा घरात अस्वस्थतेनं भरलेली शांतता पसरत असे. आनंद होण्याला तसंच मोठं कारण असूनही ही अस्वस्थता का होती घरात? येत्या महिन्यात वयाची पंधरा वर्षं पूर्ण करत असलेल्या सप्तकच्या मनात, त्याच्या आई-बाबांच्या मनात, त्याची धाकटी बहीण स्वराच्या मनात अशी कुठली वादळं घोंघावत होती? याचं कारण जाणून घेण्यासाठी वर्षभर मागे जावं लागेल. सिनेमात जसा फ्लॅशबॅक तंत्राने भूतकाळ दाखवला जातो, तसा भूतकाळ पाहावा लागेल.

सप्तकचे बाबा अजय हे बँकेत मोठ्या पदावर आणि त्याची आई मंजिरी ही एका पर्यावरणविषयक सामाजिक संस्थेची प्रमुख. दोघांच्याही घरी संगीताचा मोठा वारसा. सप्तकचे आजोबा म्हणजे त्याच्या बाबांचे बाबा हे उत्तम तबलावादक होते. आईची आई मोठमोठ्या गायकांना हार्मोनियमवर साथ करीत असे. संगीताची, गाण्याची आवड आणि समज अजय-मंजिरी यांनाही होती, मात्र त्यांची नोकरीची, काम करण्याची क्षेत्रं संगीताबाहेरची होती. आपण नाही तर किमान आपली मुलं तरी या



क्षेत्रात यावी, घराण्याची खुंटलेली परंपरा पुन्हा सुरू व्हावी अशी मंजिरी-अजय दोघांचीही इच्छा होती. सप्तक आणि स्वरा ही मुलांची नावं त्याच इच्छेतून ठेवली गेली होती. दोन्ही मुलांना लहानपणापासून संगीताचे धडे दिले गेले होते. गायक व्हा, वादक व्हा, काहीही व्हा, परंतु घरात पुन्हा गाण्यांचे स्वर आणि गाण्याचा ताल दरवळला पाहिजे, अशी त्यांची इच्छा होती. सुदैवाने सप्तक-स्वरा दोघांमध्येही संगीताची आवड चांगलीच रुजली. सप्तकचा आवाज फार गोड होता आणि त्याची सुरांची समज चांगली होती. स्वराला बासरीचा लळा लागला आणि त्यात ती रमली. अजय-मंजिरी दोघांनाही आनंद झाला. आपली मुलं एकाच वेळी अभ्यास आणि संगीताची आवड या दोन्हींचा मेळ चांगला साधत आहेत, हे पाहून आई-बाबांना समाधान वाटू लागलं. या समाधानात गेल्या वर्षी एक अनपेक्षित वळण आलं.

एका चॅनेलनं शास्त्रीय गायनाचा रिॲलिटी शो जाहीर केला. १४ ते १६ वयाची मुलं त्या स्पर्धेत भाग घेऊ शकत होती. या आधी दहा वर्षांखालील मुलांसाठीही अशी स्पर्धा झाली होती, तेव्हा सप्तकचे गुरुजी पंडित दिनकर शास्त्री यांनी त्याला स्पर्धेत भाग घ्यायला मनाई केली होती. एवढ्या लहान वयात अशी मानसिक ताण देणारी स्पर्धा नको, असं ते म्हणाले होते. घरात सर्वांनीच ते तेव्हा मान्य केलं होतं. यावेळी मात्र सप्तक चौदावं वर्ष पूर्ण करून पंधराकडे जात होता, त्यामुळे 'आता भाग घेऊ का मी?' असं त्याने आई-बाबांना विचारलं. अजय-मंजिरी दोघं पंडित दिनकर शास्त्रींना जाऊन भेटले आणि विचारलं की, सप्तकला स्पर्धेत भाग घेऊ द्यायचा का?

पंडितजी थोडा वेळ काहीच बोलले नाहीत, तेव्हा त्यांचा नकार आहे, असं समजून अजय-मंजिरी यांनी, 'हा विषय आता बंद करू या' असं एकमेकांना खुणावलं. तेवढ्यात पंडितजी म्हणाले, "सप्तक फार हळवा आणि विचारी आहे, गातानाही तो त्याच हळुवारपणे स्वरांच्या लडी उलगडतो, अतिशय नजाकत आहे त्याच्या गाण्यात. स्पर्धा हा शब्दच एवढा क्रूर आहे, की त्यामुळे सुरेल स्वरांवर ओरखडा उमटल्यासारखं वाटतं. आमच्या काळात स्पर्धा होत्या त्या एखाद्या शहरापुरत्या, एखाद्या परिसरापुरत्या. चॅनेल्स नव्हती, अशी प्रसिद्धी नव्हती, कौतुकाच्या अशा लाटांवर लाटा नव्हत्या. त्यामुळे आपल्या पिढीने अशा स्पर्धांना विरोध केला तर तुमच्या वेळी नव्हतं म्हणून आम्हांलाही मिळू नये का, असे प्रश्न मुलांच्या मनात येतात आणि त्यात काही गैर नाही. मला वाटतं, आपण सप्तकला नोंदणी करायला परवानगी देऊ या. पण मला त्याआधी सप्तकशी एकान्तात बोलायचं आहे."

अजय-मंजिरी यांनी सप्तक आणि पंडितजींना एकटं सोडलं आणि ते आत गेले. या स्पर्धेत भाग घेण्याची सप्तकची इच्छा त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती. पंडितजी हसऱ्या मुद्रेनं त्याला म्हणाले, "माझ्या तुला मनापासून शुभेच्छा. माझी फक्त एक अट आहे. या स्पर्धेसाठी जर तुझी निवड झाली नाही किंवा निवड झाल्यानंतरही तू पहिल्या किंवा दुसऱ्या फेरीतच हरलास, तर अगदी त्या क्षणापासून तू आणि तुझ्या घरच्यांनीही स्पर्धेचा विषय डोक्यातून अजिबात काढूनच टाकायचा, जणू अशी कुठली स्पर्धा झालीच नाही. बोल, आहे का तयारी?" सप्तकच्या चेहऱ्यावर स्मित फुललं, त्याने पंडितजींना वाकून नमस्कार केला, पंडितजींनी त्याला मनापासून आशीर्वाद दिला.

मग पुढलं सगळं भराभर पार पडलं. नोंदणी, प्रवेशफेरी, प्रश्नोत्तरं, शेकडो स्पर्धकांच्या गर्दीत दिवसभर न थकता, आपली पाळी कधी येते याची वाट बघत बसून राहायचं. कधी बाबा सोबतीला असत, तर कधी आई. क्वचित दोघांनाही ते जमलं

नाही तर खुद्द पंडितजी त्याच्या सोबत जात असत. देशभरातील विविध शहरांत प्राथमिक फेऱ्या झाल्या, त्यातून मुलं निवडली गेली. निवडक मुलांना फाइव्ह स्टार हॉटेलमध्ये खास ट्रेनिंग दिलं गेलं. त्यांनी कोणते कपडे घालावेत, कशी उत्तरं द्यावी, काय गावं याविषयी मार्गदर्शन केलं गेलं.

सप्तकची अखेरच्या पंचवीस स्पर्धकांत निवड झाली. त्यानंतर एकेका मार्गदर्शकाकडे पाच-पाच स्पर्धक सोपवले गेले आणि त्यांनी शिकवायला सुरुवात केली. अशाच एक सेशनला पंडितजी सप्तकला सोबत म्हणून गेले. चॅनेलनं नेमलेल्या मार्गदर्शकाने सप्तकला तिलक कामोद या रागातली 'नीर भरन कैसे जाऊ सखी अब' ही चीज शिकवायला घेतली, तिथेच पहिली ठिणगी पडली. चीज गाऊन दाखविणाऱ्याने 'दगर चलत मोसे करत रार अब' अशी ओळ सप्तकला म्हणून दाखवली आणि 'आता हीच ओळ तू गाऊन दाखव' असं फर्मान सोडलं. सप्तकनं हळूच आपल्या गुरुजींकडे पाहिलं; आणि मग 'डगर चलत मोसे करत रार अब' असं तो खास त्याच्या नजाकतदार शैलीत गायला. मार्गदर्शकाने त्यावर नकारार्थी मान हलवत, 'दगर चलत मोसे करत रार अब' पुन्हा गाऊन दाखवलं आणि म्हणाला, "सप्तक, इट इज नॉट डगर, इट इज दगर... दगर चलत मोसे...."

हे ऐकून गुरुजी वैतागले. ते जागेवर उभे राहिले आणि मार्गदर्शकाला म्हणाले, "यू मस्ट हॅव रिटन दीज वर्डस इन रोमन, नॉट इन देवनागरी, इट इज नॉट दगर, इट इज सर्टनली डगर. डगर मिन्स रस्ता...रोड.. वे.' हे ऐकल्यावर मार्गदर्शकाचा पापड मोडला आणि तो 'द' साठी हटून बसला. अखेर आयोजकांनी गुरुजींना बाहेर जाऊन बसण्याची विनंती केली. इथपर्यंत

चित्रं- निलेश जाधव



पोहोचल्यावर सप्तकला विनाकारण माघार घेण्याची वेळ येऊ नये म्हणून काळजावर दगड ठेवून गुरूजी बाहेर बसून राहिले. त्यानंतर ते बरेचदा सप्तकला सोबत म्हणून गेले, परंतु आत जाऊन मनस्ताप करून घेण्यापेक्षा बाहेरच बसून राहिले.

स्पर्धा एकेक टप्पा पुढे जात राहिली. २५ स्पर्धकांतून पंधराजण पुढे गेले, दहांनी घरचा रस्ता धरला. सप्तकचं व्यक्तिमत्त्व आरपार बदलून गेलं. तो अधिक स्मार्ट दिसू लागला. त्याच्या कपड्यांचं डिझाइन करण्यासाठी खास माणूस होता आता. त्याचं इन्स्टा अकाउंट चॅनेल्सची माणसं हँडल करू लागली आणि त्याचे फॉलोअर्स भराभरा वाढू लागले. सप्तकच्या रिल्सनाही हजारो व्ह्यूज मिळू लागले. सप्तकनं आपले गुरू म्हणून पंडित दिनकर शास्त्रींचं नाव कार्यक्रमात घेतलं, तेव्हापासून गुरुजींना शिकविण्यासाठी एवढ्या विनंत्या येऊ लागल्या की, त्यांना फोन बंद ठेवावा लागला. टीव्हीवरील लोकप्रियता किती जबरदस्त असते, याचा प्रत्यय सप्तकच्या घरीही सगळ्यांना येऊ लागला. सप्तक सेलिब्रिटी झाला, त्याच्यासोबतच अख्खं कुटुंब सेलिब्रिटी झालं. कुठल्याही कौटुंबिक सोहळ्यात, लग्नसमारंभात ते जणू प्रमुख पाहुणे झाले. सप्तकने त्याच्या आजी-आजोबांचं नाव राखलं, असं कौतुक होऊ लागलं.

या कौतुकात वाहवून न जाता सप्तक गाण्यावर मेहनत करत होता, त्यामुळे पंधराचे दहा आणि अखेर दहाचे पाच स्पर्धक होऊन स्पर्धेची अंतिम फेरी आली, त्यात सप्तकचा समावेश झाला. आता अगदी तोडीस तोड स्पर्धा सुरू झाली. पाचही स्पर्धकांच्या नावाने मतदान करण्याचं आवाहन करण्यात आलं. शेवटच्या टप्प्यातील पाच स्पर्धकांमधली स्पर्धा आता केवळ गाण्याची राहिली नाही. सप्तकच्या घरातील अस्वस्थतेचं कारण नेमकं तेच होतं.

पाचही स्पर्धकांचे मार्गदर्शक वेगवेगळे होते, त्यांना आपापला चेला अव्वल यावा असं वाटत होतं. गाण्याची तयारी करून घेता घेताच ते प्रेक्षकांची सहानुभूती कशी मिळेल याची गणितंही मांडत होते. जेवढी जास्त सहानुभूती तेवढी जास्त मतं मिळणार होती.

आयोजकांनी एक दिवस सप्तकच्या आई-बाबांना बोलावून घेतलं. सप्तकचे मार्गदर्शक त्या तिघांना घेऊन फाइव्ह स्टार हॉटेलच्या शानदार खोलीत बसले. सप्तक किती छान गातो, किती छान दिसतो, त्याला प्रेक्षकांचा किती पाठिंबा आहे, अशी सगळी कौतुकं संपली आणि मग मार्गदर्शक मुख्य मुद्द्याकडे वळला. तो म्हणाला, "हे बघा, पाचही मुलं उत्तम गातात, त्यांच्यात डावं-उजवं करणं कठीण आहे."

अजय-मंजिरी दोघेही म्हणाले, "अहो, पाचातला कोणीतरी एकच जिंकणार ना? सप्तक इथपर्यंत पोहोचला, त्यातच आम्हांला आनंद आहे, तो नाही जिंकला तरी आमची काही हरकत नाही."

"पण माझी हरकत आहे," मार्गदर्शक म्हणाले, "तो माझा चेला आहे, त्याचा पराभव हा माझा पराभव असेल. माझ्याही करियरचा तो प्रश्न आहे." यावर काय बोलावं हे अजय-मंजिरी यांना कळेना, तेव्हा मार्गदर्शकाने पुढची योजना सांगितली. फायनलच्या पहिल्या राऊंडला प्रत्येक स्पर्धक स्वतःची स्टोरी सांगेल. त्यात सप्तक सांगेल की, त्याने संगीत शिकण्यास त्याच्या आई-बाबांनी खूप विरोध केला. तो चार दिवस उपाशी राहिला, तेव्हा तुम्ही त्याला परवानगी दिलीत. मग तुम्ही त्याला एका संगीत शिक्षकाकडे घेऊन गेलात. सप्तकला त्याने गाऊन दाखवण्यास सांगितलं आणि त्याचं गाणं ऐकून हाकलून दिलं. तू जन्मात कधीही गायक होऊ शकणार नाहीस, असं ते म्हणाले...

अजय-मंजिरी आणि स्वतः सप्तकही ते ऐकून जागच्या जागीच थिजले. "अहो, यातलं काहीच

घडलेलं नाही. असं कसं खोटं सांगणार तो?"

मंजिरीच्या या प्रश्नावर मार्गदर्शक म्हणाले, "खोटं तर आहेच, पण असं खोटं सांगावंच लागतं. अन्यथा प्रेक्षकांची मतं मिळत नाहीत. आम्ही याला सोब-स्टोरी म्हणतो. पाचही मुलं आपापल्या सोब-स्टोरीज तयार करत आहेत. ज्याची स्टोरी अधिक प्रभावी, त्याला मतं जास्त मिळतील आणि तो जिंकण्याची शक्यता वाढेल. तुम्हांला यापेक्षा अधिक चांगली स्टोरी तयार करता येत असेल तर मला अवश्य सांगा. यावर विचार करायला तीन दिवस आहेत तुमच्याकडे. तीन दिवसांनी फायनलच्या पहिल्या राऊंडचं शूटिंग सुरू होईल." मार्गदर्शकाने सप्तककडे पाहिलं आणि म्हणाला, "सप्तक, आय ॲम काउंटिंग ऑन यू, यू आर अ ग्रेट सिंगर, डोंट लेट धिस चान्स गो फार द सिली रिझन्स."

आणि त्या दिवसापासून घरातलं वातावरण तंग होतं. पंडितजी घरी आले. त्यांनाही अजय-मंजिरी यांनी सगळं सांगितलं. सप्तक आता शहरात, जिल्ह्यात फेमस झाला होता. तो स्पर्धेत पहिला यावा यासाठी गावात यज्ञ-प्रार्थना चालू होत्या. या सर्व लोकांच्या अपेक्षांना बळी पडून आई-बाबांना, गुरुजींना व्हिलन ठरवायचं की शिखरावर पाऊल ठेवण्यापूर्वीच माघार घ्यायची?..

..इथे फ्लॅशबॅक संपला. आपण वर्तमानात आलो.

गेले तीन दिवस घरात अस्वस्थता पसरलेली होती, ती या तिढ्यामुळेच. आज यासंबंधी निर्णय घ्यायचा होता. सप्तकने खूप मेहनत घेऊन ही फेरी गाठली होती. हे सगळं करताना अभ्यासही सांभाळला होता आणि तिथेही नंबर कायम राखला होता. पंडितजींनी हे सगळे ऐकलं तेव्हा ते म्हणाले, "माझ्या मते सप्तकला स्वतःलाच याचा निर्णय घेऊ द्यावा."

अजय-मंजिरी यांनाही ते पटलं. त्यांनी सप्तकला समोर बसवलं आणि म्हणाले, "आपल्या घरात आपण सगळ्यांनाच निर्णयाचं स्वातंत्र्य देत आलो आहोत. तू आता पंधरा वर्षांचा होणार आहेस, आणि समज येण्याचं वय आहे हे. तू निर्णय घे, आम्हांला तो मान्य असेल."

सप्तकने रात्र तळमळत काढली. सकाळी आई-बाबांनी तयारी केली, कारण १० वाजता शूटिंगसाठी हजर राहायचं होतं. सप्तकने ठरलेली स्टोरी तिथे सांगितली तर आपण जाहीरपणे सप्तकची माफी मागू आणि डोळ्यांत पाणी आणून त्याला मिठीत घेऊ, असं दोघांनी ठरवलं. सप्तक तयार होऊन, त्याची बॅग घेऊन बाहेर आला. पंडितजी त्याला शुभेच्छा द्यायला आले होते. सप्तक आधी पंडितजींच्या, मग आई-बाबांच्या पाया पडला आणि मग हसऱ्या चेहऱ्यानं सगळ्यांकडे पाहात म्हणाला, "मी माझा प्रवास सगळा खरा खरा सांगणार आहे, फायनलच्या पहिल्याच फेरीत बाद झालो तरी चालेल."

अजय-मंजिरी, स्वरा सगळ्यांच्याच डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले. त्यांचा गेलेला उत्साह परतला. पंडितजींनी सप्तकला मिठीत घेऊन कुरवाळलं. त्याच्या केसांमधून प्रेमाने हात फिरवित त्याची पप्पी घेतली आणि म्हणाले, "माझ्यासाठी तर तूच विजेता आहेस." अजय-मंजिरी म्हणाले, "आमच्या मनावरचं ओझं उतरलं बघ, आम्हांला आमच्या संस्कारांचा पराभव होणार की काय असं वाटू लागलं होतं."

चॅनेलची गाडी घ्यायला आली तेव्हा सगळे हसतमुखानं बाहेर पडून फायनलच्या पहिल्या राऊंडच्या शूटसाठी निघाले. पंडितजींनीही त्याला मनापासून आशीर्वाद दिला. गाडीत बसल्यावर तिलक कामोदची चीज सप्तक मनात गात होता...
डगर चलत मोसे करत रार अब!

**-श्रीकांत बोजेवार**
*shrikant.bojewar@gmail.com*
*(ज्येष्ठ संपादक आणि लेखक)*

## शब्दांचं बारसं

**मॅगेझिन (Magazine)**– Magazine म्हणजे मासिक. कुणाला आठवेल बंदूक!

खजिना हा शब्द आपण लहानपणापासून ऐकतो. खजिना ही एक प्रकारे साठवण्याची जागा झाली. 'अरेबिक'मध्ये हा मूळ शब्द खजाना असा होता आणि त्याचा अर्थ 'साठवणे' असा होता. जे काय साठवायचे, त्यासाठी काही जागा नेमून द्यायला हवी. तिचे नाव makhzan. म्हणजे आजच्या भाषेत गोडाऊन किंवा स्टोअर हाऊस. makhazin हे त्या शब्दाचे अनेकवचनी रूप.




भूमध्य समुद्रातून दर्यावर्दी प्रवासी makhazin हा शब्द इटलीत घेऊन आले. ते व्यापारी. त्यामुळे गोडाऊनशी नेहमी संबंध असणार. तेव्हा त्या makhazinचे इटालियन रूप झाले magazzino. यानंतर हा शब्द यथावकाश फ्रान्समध्ये पोहोचला आणि झाला maga-sin. या साऱ्या प्रवासात या शब्दाचा मूळ अर्थ– स्टोअर हाऊस– हा मात्र टिकून होता. सर्वसामान्यपणे मिलिटरीच्या स्टोअर हाऊससाठी तो वापरला जाई. त्यामुळे बंदुकीच्या गोळ्या साठवणे आणि सलगपणे बंदुकीत भरल्या जाणे यासाठी जी तजवीज केलेली असते, तिला मॅगेझीन (magazine) असे नाव मिळाले. फ्रेंच magasin ब्रिटनमध्ये पोहोचल्यावर 'स' जाऊन तिथे 'झ' आला, magazine हा शब्द तयार झाला.

सैन्याशी संबंधित झालेला हा शब्द अठराव्या शतकात, 'ठरावीक काळाने प्रसिद्ध करायच्या छापील मजकुराशी' जोडला गेला. माहितीचा खजिना या अर्थाने! राजकारण, बागकाम, शेतीमालाचे भाव अशी माहिती देणारे मजकूर ठरावीक काळाने छापून (periodically) ते सुशिक्षित लंडनवासियांना विकावेत, असा विचार एडवर्ड केव्ह यांनी प्रत्यक्षात उतरवला. जानेवारी १७३१ मध्ये विविध माहिती आणि रोचक कथा असणारे पहिले मॅगेझीन त्यांनी प्रसिद्ध केले. त्याचे नाव होते– The Gentleman's Magazine or Trader's Monthly Intelligencer. एकदम भारदस्त नाव! हा प्रयोग खूपच यशस्वी झाला. खासकरून त्यातील कोर्ट केसेस, कबुलीजबाब अशा मजकुरावर वाचक खूश असत. डिसेंबर १७३३ मध्ये मूळ भारदस्त व लांबसडक नाव सोडून Gentleman's Magazine असे सुटसुटीत नाव कायम करण्यात आले. त्यानंतर विविध माहितीचा खजिना, ठरावीक काळाने छापण्याचा व्यवसाय हळूहळू बहरला. कित्येक मॅगेझीन्स जन्माला आली. मॅगेझीन्सच्या जन्माला तीनशे वर्षे व्हायला आली, तरीही मॅगेझीन या प्रकाराची लोकप्रियता आजही टिकून आहे.

**-वसुंधरा देवधर**
*vasudeo55p@gmail.com*

लेख

# उत्सवाचं रसायन

**कुठलाही सण, उत्सव आपल्याला आनंद देतो. का होतो तो आनंद? का हवे असतात आपल्याला सण आणि उत्सव? असं काय अजब रसायन आहे या उत्सवप्रियतेत? काय आहे त्यामागचं विज्ञान?**

**'आली** दिवाळी, भुवन उजळी, आनंद घे अवतार.' दिवाळी, नवरात्र, होळी कुठलाही सण आपल्यासोबत आनंद घेऊन येतो. का होतो तो आनंद? का हवे असतात आपल्याला सण आणि उत्सव?

अगदी आदिमानवाच्या काळापासून उत्सव ही माणसाच्या मनाची गरज आहे. आदिमानव शोधीपारधी होता. अन्नाच्या, शिकारीच्या शोधात वणवणताना त्याला सगळीकडून शत्रूंचं, संकटांचं भय असे. त्या वेगवेगळ्या संकटांवर लक्ष ठेवायची जबाबदारी त्याच्या मेंदूतल्या एका केंद्राची होती. मेंदूच्या बुडाशी असलेलं हे बदामाच्या आकाराचं केंद्र (Amygdala) सतत धोक्याची घंटा वाजवत राही. मेंदूच्या इतर सगळ्या कर्त्याकरवत्या केंद्रांचं लक्ष नेहमी त्या बदामकेंद्रावरच खिळून असे. पण माणसाला जर कधी मोठी शिकार मिळाली तर काही काळ पोटाची निश्चिंती, थोडासा आराम, गुहेचा निवारा असं सुख लाभे. बदामकेंद्राला सक्तीची सुट्टी मिळे. इतर केंद्रांना मोकळीक मिळे. मग मेंदूतला कलाकार जागा होई. गुहेच्या भिंतीवर शिकारीची चित्रं काढली जात. खाणं-पिणं-नाचणं असा उत्सव साजरा होई. मेंदूच्या गाभ्यात आनंद-रसायनांचा पाझर होई.




मेंदूच्या गाभ्याला लागूनच, त्याच्या पुढ्यात Nucleus accumbens नावाचं एक केंद्र असतं. त्याला आपण 'शेजारी' केंद्र म्हणू. कुठल्याही अनुभवावर 'हवाहवासा' किंवा 'नकोनकोसा' असा शिक्का मारणं, हे त्या केंद्राचं काम. शिकारीनंतरच्या उत्सवात पाझरणाऱ्या 'डोपामीन' नावाच्या आनंदरसायनामुळे त्या 'शेजारी' केंद्राला जाग येई. त्या उत्सवाच्या सुरक्षित, आनंदी अनुभवावर 'झक्कास' असं शिक्कामोर्तब होई. आदिमानवाला तोच अनुभव पुन्हा पुन्हा घ्यायची इच्छा होई. म्हणून आधीच्या शिकारीची बेगमी संपण्यापूर्वीच त्याला नव्या शिकारीचे वेध





**तुम्हांला कोणकोणते सण आवडतात? त्यातील कोणकोणत्या कृतींनी तुम्हांला खरा आनंद होतो? बघा, या लेखातले विचार तुम्हांला पटतायत का?**

लागत. आनंद-रसायनांना पूर यायला नुसती नव्या शिकारीची, त्यानंतरच्या श्रमसाफल्याच्या उत्सवाची कुणकुणदेखील पुरेशी असे.

असं होता होता मानवाला त्या आनंदाची चटक लागली. श्रमसाफल्याचा उत्सव मानवी संस्कृतीचा अविभाज्य हिस्सा बनला. पुढे शोधीपारधी स्थिरावला, शेतकरी झाला. सुगीचा, धान्यसमृद्धीचा उत्सव सुरू झाला.

प्राचीन रोममध्ये 'सॅटर्नालिया' हा धान्यसमृद्धीचा उत्सव असे. दिवाळी, थँक्सगिव्हिंग, हॅलोवीन हे सुगीचे उत्सव अजूनही साजरे होतात. मळणी होऊन धान्य घरात आलं की, रोजच्या धकाधकीच्या अनिश्चिततेपासून थोडासा आराम मिळतो. सणाच्या दिवशी काय करायचं तेही, म्हणजे अभ्यंगस्नान, कारीट फोडणं, भाऊबीजेला ओवाळणी असं सगळं आधीपासूनच निश्चित ठरलेलं असतं. बदामकेंद्राची भुणभुण नसते.

मग मेंदूतली कलाकार केंद्रं सुंदर रांगोळ्या, रंगीबेरंगी आकाशकंदील, आरास, किल्ल्यांची सजावट वगैरेंमध्ये गुंगतात. तशा कलाकृती हातून साकारल्या की मेंदूच्या गाभ्यात नवी आनंदरसायनं तयार होतात. आनंदचक्रच सुरू होतं. नवे कपडे, गोड खाऊ, फटाके अशा सगळ्या छान अनुभवांनी, लक्ष्मीची, हिशेबाच्या चोपड्यांची पूजा, प्रार्थना यांनी 'शेजारी' केंद्राचा 'पुन्हा पुन्हा हवं' असा शेरा ठळक, अधोरेखित होतो.

आईने उटणं लावून न्हाऊ घालणं, पाडव्याची ओवाळणी, भाऊबीज हे नात्यांचे उत्सव असतात. त्या प्रेमाच्या जवळिकीमुळे 'ऑक्सिटोसिन' नावाचं ममता-रसायन मेंदूच्या गाभ्यात पाझरतं. ते ती नाती तर पक्की करतंच; शिवाय हृदयाचं काम, रक्तदाब यांनाही सुरळीत ठेवतं. शेजारीपाजारी, गल्लीतली मित्रमंडळी, समस्त गावकरी अशांनी मिळून सांघिक उत्सव साजरा केला, की त्या सगळ्या समुदायात तशा ममता-इफेक्टमुळे एकोपा निर्माण होतो. लोकमान्यांच्या सार्वजनिक गणेशोत्सवाने समाजात तशीच एकात्मता आपसूक निर्माण झाली.

ईश्वरावर भिस्त टाकणाऱ्या वटसावित्रीच्या, हरितालिकेच्या भक्तिभावानेदेखील 'पुन्हा पुन्हा हवं' हा शेरा ठळक होतो. 'होळी' हा मनातल्या दुष्ट प्रवृत्ती जाळून टाकायचा सण. वर्षभर मालकांसाठी खपणाऱ्या बैलांचा सन्मान करायला बैलपोळ्याचा



बर्फापासून सुंदर शिल्प

**सण, सुट्टी, खाऊ, कलाकुसर हे सगळं एकत्र का येतं? त्यामागचं विज्ञान समजलं नं?**

सण असतो. 'सॅटर्नालिया'च्या (प्राचीन रोमन सण) दिवशी मालक गुलामांची बडदास्त ठेवत. तशा सात्त्विक, उदात्त विचारांनी देखील मेंदूत आनंद-रसायनं पाझरतात.

ईशान्य चीनमध्ये रक्त गोठवणाऱ्या थंडीत लोक बर्फापासून सुंदर शिल्पं घडवतात. तशा नवनिर्मितीत मन रमलं की मेंदूत 'मॉर्फीन' या अमली पदार्थाचे चुलतभाऊ, 'एन्डॉर्फिन' नावाची आनंद-रसायनं पाझरतात. ती त्यांना त्यांच्या हालअपेष्टा विसरायला लावतात. मग 'डोपामीन' आणि 'शेजारी केंद्र' त्या हिमशिल्पोत्सवावर देखील 'हवाहवासा' असं ठळक शिक्कामोर्तब करतात.

सण, उत्सव हे जीवनाच्या ओढगस्तीतले सुखद स्वल्पविराम आहेत. खरोखरच ती माणसाची मानसिक, भावनिक, सामाजिक चॉकलेटं आहेत!

**-डॉ. उज्ज्वला दळवी**
*ujjwalahd9@gmail.com*
*(वैद्यकतज्ज्ञ व नामवंत साहित्यिक)*

# खूप वेगळे



*चित्र- शुभांगी चेतन*

त्या घरात शिरताना
गंज चढलेल्या लोखंडी फाटकाचा
खूप मोठा आवाज होतो.
अंगणात हातभर वाढलेलं गवत
पायांना बोचतं..
अन् खूप कर्कशपणे वाजते
दारावरची तुटकी बेल.
पण मुलांनो एक सांगू?
या सगळ्याहून खूप वेगळे आहेत
दार उघडणारे पांढरेशुभ्र
आजोबा..

**-प्रशांत असनारे**
*abhinandan_prashant@*
*yahoo.com*

# कल्पक कला

## गिफ्ट बॅग



**मुलांनो, आपल्याकडे एखादी पेपर बॅग असते, ज्यावर दुकानाचे नाव लिहिलेले असते. त्या बॅगेलाच आपण पुन्हा नवीन करून गिफ्ट देताना वापरू शकतो.**

**साहित्य-** पेपर बॅग, जाडसर रंगीत कागद, गोंद

**कृती-** तुम्हांला आवडणारं एखादं चित्र किंवा कार्टून एका कागदावर काढून घ्या. (हे चित्र पेपरबॅगवर, आधीचे दुकानाचे नाव कव्हर करेल, इतकं मोठं असायला हवं.) आता फोटोत दाखविल्याप्रमाणे, कार्टूनचा चेहरा, डोळे, नाक, दात, कान इत्यादी (तुम्हांला हवे तसे) निरनिराळ्या रंगीत कागदावर काढून ते आकार कापून घ्या. आता हे आकार पेपरबॅगवर तुम्ही काढलेल्या कार्टूनच्या चित्राप्रमाणे चिकटवा.

ही नवीन बॅग पुनर्वापर करायला तयार होईल. ह्या बॅगेत गिफ्ट घालून देणाऱ्याला, आणि ते गिफ्ट घेणाऱ्याला, दोघांनाही आनंद होईल.

**-स्वरूपा वक्नाली**
*swarupamv@gmail.com*




▸ शिक्षक- '**Anu is riding a horse**.' याचा मराठीत अनुवाद करा.
गंपू- 'घोड्यां'
शिक्षक- 'असं काय?'
गंपू- 'घोड्या'वर अनु स्वार!




**'फास्टर फेणे', 'रमा माधव', 'YZ', 'मिडियम स्पाईसी' या चित्रपटांतील लक्षणीय अभिनेत्री, अनेक चांगल्या नाटकांतली कलाकार आणि भाडिपाच्या 'आई, मी आणि सिरीज'मधली 'बबडू' म्हणजे अभिनेत्री पर्ण पेठे. क्लिनिकल सायकॉलॉजी घेऊन M.A. झालेल्या या गुणी अभिनेत्रीचं किशोरवय कसं होतं ते तिच्याकडून जाणून घेऊ या–**



# पर्ण पेठे

**माझा** जन्म, शालेय शिक्षण, कॉलेजचं शिक्षण सगळं पुण्यात झालं. पुण्यातली अभिनव विद्यालय ही माझी शाळा. माझ्या घरी मी, आई-बाबा आणि आजी-आजोबा (बाबाचे आई-बाबा) असं आमचं कुटुंब होतं. माझी आई रोहिणी पेठे ही तेव्हा शासकीय सेवेत होती. शासनाच्या आरोग्य योजना गावोगावी लोकांपर्यंत पोहोचवणं हे तिचं प्रमुख काम होतं आणि माझा बाबा अतुल पेठे म्हणजे एक उत्तम दिग्दर्शक, अभिनेता असल्याने नेहमी तालमी, नाटकाचे प्रयोग यात व्यग्र असायचा.

त्यामुळे मी लहान असताना आई-बाबा दोघेही बऱ्याचदा फिरतीवर असायचे. बाबा तर काही काळ मुंबईत राहिला होता. बाबामुळे घरी कलेच्या क्षेत्रातले आणि सामाजिक क्षेत्रातले खूप लोक येत. घरात सतत नाटकाच्या चर्चा चालत. माझी आई तेव्हा वेगवेगळ्या सामाजिक संस्थांशी निगडित होती. माझे मामा-मामी लेखक. त्यांचंही एक वैशिष्ट्यपूर्ण सर्कल होतं. असं सगळं समृद्ध वातावरण माझ्या घरात, माझ्याभोवती होतं.

माझी शाळा पण खूप चांगली होती. शाळा सुरू

करण्यात ज्यांचा सक्रिय सहभाग होता, त्या मीना चंदावरकर मॅडम खूप वेगळ्या आणि मोकळ्या विचारांच्या असल्यामुळे 'शाळेत मुलांना मारायचं नाही', 'त्यांना कोणत्याही कारणाने प्रेशराइज करायचं नाही', 'सगळ्यांना सारखी वागणूक द्यायची' असे संकेत पाळले जायचे. इतर शाळांमध्ये असतात तशा A, B, C, D अशा तुकड्या आमच्या शाळेत नव्हत्या. 'रोझ', 'ॲस्टर' वगैरे फुलांची नावं तुकड्यांना असायची. 'A' तुकडी म्हणजे हुशार मुलांची तुकडी, त्यानंतरच्या तुकड्या म्हणजे कमी हुशार मुलांच्या तुकड्या वगैरे फरक केला जाऊ नये म्हणून ही पद्धत होती. मला आठवतंय, एकदा 'ॲस्टर' तुकडीतल्या मुलांनी '4th Aster' असं लिहिण्याऐवजी '4th A' असं लिहायला सुरुवात केली होती. तेव्हा त्या तुकडीचं नाव बदलून 'डेलिया' असं केलं गेलं होतं, इतकी आमची शाळा समानतेच्या बाबतीत जागरूक होती.

साधारणतः मोठ्या माणसांना वाकून नमस्कार करायचा असं लहान मुलांना शिकवलं जातं, पण चंदावरकर मॅडमना कोणी मुलं स्टेजवर नमस्कार करायला लागली तर त्या तसं करू देत नसत. एकदा भाषणात त्या म्हणाल्या होत्या की, सरसकट सगळ्या मोठ्या माणसांना वाकून नमस्कार करण्याची गरज नसते, तुम्हांला ज्या व्यक्तींना मनापासून वाकून नमस्कार करावासा वाटेल, त्यांनाच करा!

असे खूप वेगळे विचार शाळेने दिले. शाळेत खूप ॲक्टिव्हिटीज असायच्या. मी मात्र अगदी दहावीपर्यंतच्या गॅदरिंगजमध्ये प्रत्येक वर्षी फक्त नाचच केला! मी आठ वर्षांची असल्यापासून माझ्या गुरू अश्विनी एकबोटे यांच्याकडे भरतनाट्यम् शिकत होते आणि मला नृत्य मनापासून आवडत होतं.



नृत्य ही माझ्यासाठी माझी 'स्पेस' होती. माझ्या एकटेपणातून बाहेर यायला मला नृत्याने खूप मदत केली आणि माझी डायरी... माझा एकटेपणा, माझ्यातले कॉम्प्लेक्सेस सगळं मी त्या डायरीत लिहायचे.

माझ्या घरचं वातावरण आणि शाळेतलं वातावरण खूप समृद्ध असलं तरी त्यात खूप फरक होता. मला शाळेत कोणाशी रिलेटच करता यायचं नाही. मला कोणाशीच शेअरिंग जमायचं नाही. कारण घरातलं नाटकाचं वातावरण, माझं अनुभवविश्व हे मी ज्यांच्यापाशी व्यक्त करू शकेन असं शाळेत कुणीच नव्हतं. त्यामुळे मला मित्र-मैत्रिणी नव्हते. मी खूप दबली गेले होते. सतत एकटी असायचे - विशेषतः पाचवी ते दहावीच्या वर्षांमध्ये. मी कोणत्याच ग्रुपमध्ये किंवा ग्रुप ॲक्टिव्हिटीमध्ये नसायचे. प्रचंड इन्ट्रोव्हर्ट होते. मी नववीत असताना तर माझ्या या स्वभावाची आई-बाबांना खूपच काळजी वाटायला लागली होती. त्यांनी मला वाचायला खूप पुस्तकं आणून दिली होती, वयात येण्याबद्दल सगळं सांगितलं होतं.

तरीही माझा एकटेपणा दूर होत नव्हता. त्या वयात शाळेत अशी इमेज होती, की ज्या मुलींना शिव्या माहीत असतात किंवा वाढत्या वयातल्या गोष्टी माहीत असतात त्या मुली म्हणजे 'पोचलेल्या' असतात. मला वाटायचं की आपल्याला नाही तसं पोचलेली मुलगी व्हायचं. मुलींनी नेहमी साधं राहावं, चारचौघांत नजरेत भरण्यासारखं काही करू नये, मुलींना चुका करायला फार स्कोप नसतो, त्यांनी नेहमी नीटच वागायचं, वगैरे अशा 'गुड गर्ल सिंड्रोम'मध्ये मी फार अडकले होते. त्यामुळे मला सोशलायझेशन नको वाटायचं.

तेव्हा मी बास्केटबॉल उत्तम खेळायचे. पण मी तेव्हा बुटकी, बारीक होते. त्या दिसण्याविषयीचा एक कॉम्प्लेक्स माझ्या मनात होता. त्यामुळे बास्केटबॉल येत असून, आवडत असून तो खेळायला मी पुढे गेले नाही. माझ्यावर 'गुड गर्ल' असण्याचं प्रेशर नसतं तर मी कदाचित बास्केटबॉल खेळायला गेले असते आणि माझं आयुष्य वेगळं झालं असतं. पण मग बास्केटबॉल आणि डान्स यातून मी डान्सची निवड केली आणि मी केलेली ही निवड हा माझ्यासाठी टर्निंग पॉईंट ठरला.

नृत्य ही माझ्यासाठी माझी 'स्पेस' होती. मला तिथे सोशलायझेशन नाही करावं लागलं. नृत्यातून मी स्वतःला व्यक्त करायला लागले. माझ्या एकटेपणातून बाहेर यायला मला नृत्याने खूप मदत केली. घरात एवढं नाटकाचं वातावरण असूनही मी नाटक किंवा अभिनय करेन, असं मला कधीच वाटलं नव्हतं, कारण त्यासाठी खूप लोकांमध्ये जावं लागतं. त्यापेक्षा मला नृत्य करणं नेहमीच जास्त जवळचं वाटलं.

तेव्हा माझ्या मनात जे काही सुरू असायचं, ते मी डायरीमध्ये लिहायचे. माझा एकटेपणा, माझ्यातले कॉम्प्लेक्सेस सगळं मी त्या डायरीत लिहायचे. डायरी ही सुद्धा माझी व्यक्त होण्याची हक्काची जागा होती. आता कधी त्या डायऱ्या वाचल्या तरी अंगावर काटा येतो, इतका टोकाचा एकटेपणा त्या वयात माझ्या मनात होता!

पुढे फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रवेश घेतल्यावर धर्मकीर्ती सुमंतशी (आजचा प्रसिद्ध नाट्यलेखक) ओळख झाली. मी त्याचं एक वर्कशॉप केलं. निपुण धर्माधिकारी, मोहित टाकळकर (आजचे आघाडीचे कलाकार) असे मित्र भेटत गेले. मी अकरावीत असतानाच मोहितने मला 'पुरुषोत्तम करंडक'साठी एकांकिकेत काम करण्याबद्दल विचारलं. 'झूम बराबर झूम' नावाची ती एकांकिका वरुण नार्वेकर दिग्दर्शित करत होता. मी आधी नाहीच म्हटलं होतं, मला हे काही जमणार नाही, असाच माझा सूर होता. पण मोहित म्हणाला की, तुला काय जमेल आणि काय नाही ते पाहणं, तुझ्याकडून काम करून घेणं हे दिग्दर्शकाचं काम आहे! तेव्हा मग मी एकांकिकेत काम करायला तयार झाले. ती एकांकिका कॉमेडी होती. माझ्या स्वभावाच्या अगदी विरुद्ध भूमिका मला मिळाली होती. त्या एकांकिकेने मला मोकळं व्हायला खूप मदत केली.

त्या एकांकिकेत आलोक राजवाडे होता. त्यावेळी माझी आलोकशी अगदी घट्ट मैत्री झाली. आलोकशी मैत्री होणं हा सुद्धा माझ्या आयुष्यातला खूप महत्त्वाचा भाग होता. कारण तिथे मला एक मित्र मिळाला जो अजूनही माझा सगळ्यात जवळचा मित्र आहे. मी 'आसक्त' आणि 'नाटक कंपनी' या ग्रुप्सचाही भाग झाले. फर्ग्युसनमध्ये गेल्यावर अगदी पहिल्या वर्षीच मला 'सायकॉलॉजी' हा विषय खूप आवडला.

मी त्यातच ग्रॅज्युएशन केलं. मग क्लिनिकल



*पर्णचे कुटुंबीय- आई-वडील, पर्ण, तिची आजी आणि आलोक*

सायकॉलॉजीमध्ये M.A. केलं. मला काउन्सेलर म्हणूनच काम करायचं होतं. मी के.इ.एम. हॉस्पिटलमध्ये इंटर्नशिपसुद्धा केली, पण मग 'रमा-माधव' चित्रपटात भूमिका करायला मिळाली आणि तेव्हापासून मी अभिनयाच्या क्षेत्रातच करियर करायचं ठरवलं.

मी किशोरवयात असताना माझे आई-बाबा बऱ्याचदा कामानिमित्त घरापासून लांब असत. त्या काळात मी माझ्या आजी-आजोबांशी खूप कनेक्ट झाले. आईच्या आईशी माझं खूप छान बॉण्डिंग होतं. माझे दोन्हीकडचे आजी-आजोबा खूप धडपड करून, खूप कष्टातून वर आलेले आहेत. माझ्या आजीचं पाळणाघर होतं. आजी नेहमी माझ्या आईला, काकूला सांगायची की संसार, मुलं यासाठी तुम्ही पूर्णवेळ घरी राहू नका. तुम्ही शिका, नोकरी करा, स्वतःच्या पायांवर उभ्या राहा. आजीने नातवंडांची जबाबदारी घेतली आणि सुनांना त्यांचं काम करायला मोकळीक दिली.

माझा बाबा पूर्णवेळ नाट्यक्षेत्रात काम करायचा आणि तेव्हा काही काळ आईने घर चालवलं. माझ्या दोन्ही आज्या अगदी प्रागतिक विचारांच्या होत्या. त्यांनी कर्मकांडं, कपडे कोणते घालायचे असल्या कुठल्याही गोष्टींत सुनांना अडवलं नाही. माझं मराठी वाचन आजीमुळे सुधारलं. माझ्या एका आजीला दिसायचं नाही. तेव्हा मी तिला पुस्तकं मोठ्याने वाचून दाखवायचे. त्यामुळे माझं मराठी खूप चांगलं झालं.

मोठ्याने वाचणं, स्वतःचं काही लिहिणं हे मी आजीमुळे शिकले. शांता शेळके यांनी अनुवादित केलेलं 'चौघीजणी' हे पुस्तक आजीसाठी वाचल्याचं मला अजूनही आठवतंय. आमच्या घरात भरपूर पुस्तकं होती. एक लेखक घेऊन त्या लेखकाचं उपलब्ध असेल ते सगळं साहित्य वाचायचं, असं तेव्हा आमचं असायचं. त्यामुळे जयवंत दळवी, विजय तेंडुलकर, श्याम मनोहर अशा लेखकांचं साहित्य वाचून झालं.

माधुरी पुरंदरे यांची 'वाचू आनंदे' आणि मग 'लिहावे नेटके' ही पुस्तकंही मला खूप आवडली. Enid Blytonचं 'सिक्रेट सेव्हन', Roald Dahlचं 'चार्ली अँड द चॉकलेट फॅक्टरी' अशी पुस्तकं वाचायला मला खूप आवडायचं. पुढे कॉलेजमध्ये गेल्यावर मी सुधा मूर्ती यांच्या कथेवर आधारित 'काशीयात्रा' हे नाटक लिहिलं आणि ते माझ्या दोन्ही आज्यांना अर्पण केलं. माझी एक आजी

अगदी त्याच वर्षी वारली, त्यामुळे माझं ते नाटक तिच्यासाठी आणि माझ्यासाठीही अनमोल ठरलं.

मी माझ्या आई-बाबांशी खूप जास्त कनेक्टेड आहे. आम्ही आता एकाच शहरात राहत नाही. मी आणि आलोक मुंबईत असूनही आमच्या प्रोजेक्ट्सच्या निमित्ताने वेगवेगळ्या ठिकाणी राहतो. अनेक महिने आम्ही सगळेजण वेगवेगळ्या शहरांमध्ये असतो, पण तरीही आमच्या आयुष्यात काय चाललंय हे आम्हांला नीट माहीत असतं. आलोकचे आई-बाबासुद्धा खूप समजून घेणारे आहेत. ते आलोकला कुठल्याच बाबतीत प्रेशराइज करत नाहीत. आलोकचे बाबा मर्सेडिझ बेंझ कंपनीचे भारतातले जनरल मॅनेजर म्हणून काम करत होते. तरीही त्यांनी त्याला 'हे कर किंवा ते करू नको' असं कधीही प्रेशराइज केलं नाही. आलोकची आईसुद्धा काळाच्या बरोबर आहे. एरव्ही आम्ही आपापली स्वतंत्र आयुष्य जगत असतो, मात्र काही खास निमित्त असेल तर आणि कुणालाही मदतीची गरज असेल तर, आम्ही सगळे नेहमीच एकमेकांसाठी असतो. आमच्या कुटुंबातील नाती खूप घट्ट आहेत. आम्ही घरचे सगळेजण दिवाळीत आवर्जून एकत्र जमतो. माझ्या आई-बाबांबरोबर दिवाळी साजरी करताना उटणं लावून अभ्यंगस्नान हा आमचा आवडता सोहळा असतो.

दिवाळीत फटाके मात्र मी अजिबात उडवत नाही. तिसरी-चौथीत असताना मी तेव्हा खूप मस्तीखोर होते. तेव्हा मला फटाके उडवायला प्रचंड आवडायचं. लक्ष्मीबॉम्ब उडवला म्हणजे आपण खूप पराक्रम केला, असं मला वाटे. आई-बाबांना हे असं फटाके लावणं फारसं पटायचं नाही, पण त्यांनी मला 'हे करू नकोस' असं कधी सांगितलं नाही, माझ्या मला गोष्टी कळू दिल्या. तिसरीत असताना मी उडवलेल्या फटाक्यांच्या धुरामुळे आमच्या कॉलनीतल्या एका मुलाला खूप त्रास झाला होता. तेव्हा मला खूप वाईट वाटलं आणि आपल्या फटाक्याच्या धुरामुळे कुणाला तरी इतका त्रास होऊ शकतो, याची जाणीव झाली. त्यानंतर मी कधीच फटाके उडवले नाहीत. पण दिवाळीतला आकाशकंदील, ते उत्सवी वातावरण हे मला, आम्हांला सगळ्यांनाच खूप आवडतं. आमचं कुटुंब कर्मकांडात अडकणारं नाही. बाकी वर्षभरातले सण-उत्सव आमच्याकडे फारसे नसतात, पण दिवाळी मात्र आम्ही आनंदाने आणि एकत्र येऊन साजरी करतो.

दिवाळीसारख्या सणाला किंवा एकूणच आयुष्यात आपण खूप साऱ्या 'जिवंत' गोष्टी केल्या पाहिजेत, असं मला वाटतं. पालकांनी वेगवेगळ्या गोष्टींशी मुलांची लहानपणापासून ओळख करून देणं, त्यांना स्वतः करून पाहायची संधी देणं, निर्णय आणि निवड करायची संधी देणं हे खूप गरजेचं आहे. फक्त सोशल मीडिया, सतत स्मार्टफोनचा वापर हे टाळून प्रत्यक्ष अनुभव त्यांना मिळायला हवेत. त्यातून स्वतःशी comfortable असणं, स्वतःशीच आपली मैत्री असणं, हे नक्कीच जमू शकेल. आपण जसे असतो तसं आपल्याला स्वीकारून, समाजात वावरता येणं हे खूप महत्त्वाचं आहे. उगाचच बाहेरच्या गोष्टींमुळे किंवा समाजात असं वागावं लागतं, म्हणून स्वतःचं वागणं न बदलता आपलं व्यक्तिमत्त्व जाणून घेऊन तसं वागायला न घाबरणं, ही माझी प्रोसेस अजूनही चालू आहे. I am trying to be myself !

**-शब्दांकन : अंजली कुलकर्णी-शेवडे**
*anjalicoolkarni@gmail.com*
*(प्रसिद्ध निवेदिका)*

# काजव्यांच्या गावात

काजव्यांच्या गावात
काळेकुट्ट आकाश
काजव्यांच्या पोटात
हिरवट निळा प्रकाश

हिरव्याकंच झाडावर
काजव्यांची शाळा
काजव्यांचे संमेलन हा
वनदेवीचा सोहळा

मिट्ट काळोखात जणू
लुकलुकणारे तारे
काजव्यांचे नर्तन बघून
स्तब्ध होतात वारे

ढग दाटून आल्यावर
काजवे नाचू लागतात
बहुरूपी निसर्गाचे
पुस्तक वाचू लागतात

निशाचर काजवे काढती
नक्षत्रांची रांगोळी
दमट वातावरणात होते
काजव्यांची दिवाळी

इटुकला सोनकिडा
हे वनराणीचे विमान
जंगलात साकारली
उजेडाची कमान

काजव्यांच्या गावात
चाललेली लगीनघाई
काजव्यांनी मिळून केली
विजेशिवाय रोषणाई!

-डॉ. सुरेश सावंत
*sureshsawant2011@yahoo.com*











## गंमतकोडी

-ज्योती कपिले
*jyotikapile@gmail.com*

१) दूर, खोल समुद्रात जातो.
याला वाटत नाही भीती,
पोटासाठी गोळा करतो,
हा जाळ्यात दर्याची संपत्ती.
त्रिकोणी लुंगी नि गोंड्याची टोपी,
नेहमी यांची गाणी
ठेका धरायला लावती.
ओळखा कोण?

२) सकाळी दारी येतो.
देवाचे गाणे गातो.
घरोघरी दान मागतो.
मोरपिसाची टोपी,
अन् पायघोळ झगा
पण आताशा हे दृश्य
दुर्मीळ झालं बघा!
ओळखा हा कोण ?



**आठवीत** शिकणाऱ्या श्यामच्या जगन्नाथ शंकरशेट विद्यामंदिरातलं कॅन्टीन शाळेच्या दोन विंगच्या मधोमध होतं. खरं तर या दोन शाळा होत्या. एका विंगमध्ये मुलांची शाळा, तर दुसऱ्या विंगमध्ये मुलींची. समोरच्या बाजूला भलंथोरलं ग्राऊंड होतं. मागच्या बाजूला ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिस.

ऑफिसमध्ये आलेल्या पालकांना बसायला बाहेर काही बाकं होती. दोनतीन मोठाल्या झाडांच्या सावलीत असूनही बाकं बहुधा रिकामीच असत. मोठ्या रिसेसमध्ये या बाकांवर बसून पुस्तकं वाचायला श्यामला जामच आवडायचं. हा भाग रिकामा, शांत असला, तरी त्याला लागून असलेलं कॅन्टीन गच्च भरलेलं असायचं. शाळा वेगळ्या असल्या तरी कॅन्टीनमध्ये मात्र मुलामुलींना एकत्र प्रवेश होता. ते भरून जाण्याचं तेवढं एकच कारण नव्हतं, तरी त्याचं आकर्षणही होतंच. अशीच, किंवा याहून जास्त गर्दी ग्राउंडमध्येही असे. काही वेळा खेळण्यासाठी जागादेखील उरत नसे, मग सगळे मैदानात नुसतेच चक्कर मारायचे. कधी एकेकटे तर कधी गटागटाने. गट बहुधा मुलांचे वेगळे आणि मुलींचे वेगळे असले, तरी क्वचित एकत्र फिरणाऱ्या मुलामुलींच्या जोड्याही असत. श्यामला मात्र असं निरुद्देश फिरण्यात इन्टरेस्ट नसायचा. त्याची एक कझिन मुलींच्या शाळेत होती. कधी लहर आली, तर दोघं एकत्र बसून डबा खात, पण ते क्वचित. एरवी श्याम शांतपणे वर्गातच आपला डबा संपवायचा. मग बॅगमधून सध्या वाचत असलेलं पुस्तक काढायचा आणि इथल्या एखाद्या रिकाम्या बाकावर बसून आपलं वाचन सुरू करायचा, ते थेट रिसेस संपल्याची बेल होईपर्यंत. आजची गोष्ट मात्र थोडी वेगळी होती. आज डब्यात आवडती साबुदाण्याची खिचडी असल्याने श्यामचा डबा छोट्या रिसेसमध्येच संपलेला होता. चौथा तास संपल्याची बेल झाली, तसा श्याम खाली आला. नेहमीप्रमाणे ऑफिसबाहेरच्या एका बाकावर बसला. हातात पुस्तक होतंच. पुस्तक काही मुलांचं नव्हतं, पण मुलांनी मुलांची पुस्तकंच वाचायला हवी, असा नियम थोडाच आहे. समोर कॅन्टीनमध्ये चिकार गर्दी दिसत होती. थोडाफार आवाजही होताच, पण श्यामला या आवाजाचा त्रास होत नसे. त्रास कधी होतो, जेव्हा काय बोललं जातंय हे कानावर पडेल तेव्हा, वाक्यांचा अर्थ आपल्या डोक्यात पोचेल तेव्हा. इथे तसं होण्याची शक्यताच नव्हती. इथे येणारा आवाज हा नुसता गोंगाट होता. श्यामने तो ट्यून आउट करून टाकला. बरोबर आणलेलं रे ब्रॅडबरीचं 'फॅरेनहाईट ४५१' उघडून वाचायला लागला. मध्येच अचानक कोणीतरी मोठ्याने ओरडल्याचा आवाज आला आणि श्याम भानावर आला. पुस्तक खाली करत त्याने आजूबाजूला पाहिलं. आवाज समोरच्या कॅन्टीनमधून आला होता. तिथे एकच गदारोळ सुरू होता. आपण उठून कॅन्टीनशी जावं का, अशा विचारात श्याम असतानाच तीन-चार मुलं धावतच बाहेर आली आणि समोरच बसलेल्या श्यामला पाहून थबकली. मग धावतच त्याच्याकडे आली. त्यांच्या मागोमाग काही मुलीही बाहेर आल्या होत्या. त्यांच्यातल्या एकीने आपला हात कपाळावर घट्ट धरला होता, पण तरी खालून रक्ताची धार बाहेर आलेली दिसत होती.



चित्रं- निलेश जाधव

तिच्या बरोबरची मुलगी हातातला रुमाल तिच्या जखमेवर दाबून धरण्याचा प्रयत्न करत होती. तर इतर दोघी त्या मुलांबरोबरच पुढे आल्या.

'इथून कोणी...', 'कुठे गेला...', 'पाहिलंस तू...' अशी वेगवेगळी सुरुवात करून बोलण्याचा प्रयत्न केल्यावर ते सगळेच थांबले. मग एकच जण बोलायला लागला.

"तू पाहिलंस इथून आत्ता कोण पळालं ते?"

पण श्यामचं त्या मुलांकडे फारसं लक्ष नव्हतं. तो पाहात होता तो मागे थांबलेल्या त्या दोघींकडे.

कपाळाला जखम झालेली मुलगी त्याला माहीतच होती. शर्वरी. तिच्याबरोबर तिची कोणीतरी मैत्रीण होती. तिला येताजाता पाहिलं असलं, तरी तिचं नाव मात्र श्यामला माहीत नव्हतं. शर्वरीला तसे सगळेच ओळखायचे. चौथी, पाचवीत असल्यापासूनच नाटकात कामं करायची ती. अलीकडेच 'माझिया प्रियेचे झोपडे' नावाच्या एका मराठी डेली सोपमध्येही दिसायला लागली होती. श्यामने काही ती सिरियल पाहिली नव्हती. तो प्राइम आणि नेटफ्लिक्स सोडून बाकी काहीच पाहात नसे, पण वर्गातल्या मुलांकडून या गोष्टी कानावर येतच असत. त्यांच्या वर्गात तिच्यावरून बरीच थट्टामस्करी चालत असे. दर काही दिवसांनी कोणाला तरी चिडवण्यासाठी ते नाव वापरलं जायचं. मग त्यावर विनोद केले जात, काही साधेच, तर काही अगदी ऐकवणारही नाहीत असे. श्यामला तसेही ते ऐकण्यात अजिबातच रस नसायचा, पण आपण काही बोललो तर पुढलं टारगेट आपण असू, एवढं न कळण्याएवढा तो बावळट नव्हता.

श्यामच्या कानावर आलं होतं की गेले काही दिवस हे प्रकरण आणखीनच वाढलं होतं. मध्यंतरी कोणीतरी शर्वरीचे मोबाइलवर फोटो काढून कुठल्यातरी हिरॉईनच्या चेहऱ्याच्या जागी फोटोशॉप करून फेसबुकवर टाकल्याचं त्याने ऐकलं होतं. एकदा ती शाळेच्या जिममध्ये असताना तिचा लॉकर फोडून तिच्या काही वस्तू पळवल्या होत्या म्हणे. श्यामच्याच वर्गातला भोकरे यात पुढे असल्याचं श्यामने ऐकलं होतं, पण ती नुसती अफवाही असू शकली असती. त्या अफवेची शहानिशा करण्यात श्यामला बिलकूल रस नव्हता. भोकरेचे एकूण उद्योग पाहाता तसं खरोखर असेल तर त्यात फारसं आश्चर्यही नव्हतं.

श्यामला काही माहीत नाहीसं पाहून कॅन्टीनमधून आलेली मुलं पुढे पळाली. आता कॅन्टीनमधून बरेच जण बाहेर येऊ लागले होते. रिसेस संपल्यात जमा होती. त्यांच्या वर्गातला सुशांत बाहेर आला, तेव्हा श्यामने त्याच्याकडून नक्की काय झालं याची माहिती काढली. त्याच्या म्हणण्याप्रमाणे शर्वरी आणि तिची मैत्रीण कॅन्टीनमध्ये बसल्या होत्या. नेहमीप्रमाणे कॅन्टीन भरलेलंच होतं. त्यामुळे गर्दीत नक्की काय झालं हे कोणाला कळलं नाही; पण शर्वरीच्या किंचाळण्याचा आवाज ऐकून सगळी हालचाल थांबली. नक्की काय झालंय हे कळेपर्यंत दोन-तीन सेकंद गेले, पण तिला काहीतरी लागलंय हे दिसतच होतं. तिने कपाळावर दाबून धरलेला हात खाली घेतला तेव्हा तो लाल झालेला सर्वांनीच पाहिला. तेवढ्यात कोणीतरी म्हणालं की, या बाजूने दगड आला, तोच लागला असणार.

शर्वरीच्या किंचाळण्याचा आवाज ऐकून सगळी हालचाल थांबली. नक्की काय झालंय हे कळेपर्यंत दोन-तीन सेकंद गेले, पण तिला काहीतरी लागलंय हे दिसतच होतं. तिने केसांवर दाबून धरलेला हात खाली घेतला, तेव्हा तो लाल झालेला सर्वांनीच पाहिला. तेवढ्यात कोणीतरी म्हणालं की, या बाजूने दगड आला, तोच लागला असणार. मग सगळी धावपळच सुरु झाली.

मग सगळी धावपळच सुरू झाली. काही मुलींनी तिथून एकदोघांना पळताना पाहिलं होतं. मग सगळे त्या दिशेला धावले.

'तू पाहिलंस कोणाला?' सुशांतने विचारलं. त्यावर श्याम काही बोललाच नाही. त्याचं लक्ष शर्वरीकडेच होतं. ती तिथेच एका बाकावर बसली होती. तिची मैत्रीण बहुधा स्कूल नर्सला बोलवायला गेली असावी. शर्वरीचा चेहरा निर्विकार होता. डोळेही बंद होते. कपाळावर धरलेला हात मात्र तसाच होता. कपाळावरचा लाल ओघळ सुकायला लागला होता.

***

दुसरा दिवस खूपच गोंधळाचा गेला. सकाळी सकाळीच दोन्ही शाळांच्या मुख्याध्यापकांची मुलींच्या शाळेत एक जंगी मिटींग झाली, त्यानंतर दोघांनी काही शिक्षकांना बोलावून त्यांच्याशी चर्चा केली. खास उनाड समजल्या जाणाऱ्या मुलांची वेगळी चौकशी करण्यात आली, ज्यात श्यामच्या वर्गातला भोकरेही होता. पण हे सगळं करूनही कोणी दगड मारला हे कळायला मार्ग नव्हता. शाळेत सीसीटीव्ही कॅमेरे होते, पण कॅन्टीनमधे ते लावण्याची कोणाला आवश्यकता वाटली नव्हती. शर्वरी, तिच्या बरोबर असलेली मैत्रीण प्रिया, आणि ज्यांनी त्या दोन मुलांना पळताना पाहिलं त्या दोघी, संजना आणि रिया, यांनाही प्रिन्सिपल्सनी केबिनमध्ये बोलावलं आणि कॅन्टीनमध्ये नक्की काय झालं, याबद्दल चर्चा केली.

श्यामला कळलं, की केबिनमध्ये असताना शर्वरी बरीच रडली. तिच्या कपाळाला मलमपट्टी केल्याने ती आधीच बिचारी दिसत होती. गेले काही दिवस ती खूपच त्रासली होती. एरवीही तिला अभ्यासाचं टेन्शन होतंच. सिरियलचं शूट, नाटकाचे प्रयोग यांच्या तारखा जमवायच्या, अटेन्डन्स ७५ टक्क्यांखाली जाऊ द्यायचा नाही आणि तरी चांगले मार्क मिळवायचे. त्यात काही गुंड मुलांकडून होणारा त्रास वाढत चालला होता. गेल्याच आठवड्यात ती चालत घरी निघाली असताना तिच्या मागे शाळेतलाच एकजण सायकलवरून येत राहिला होता. त्याआधी दोनतीन दिवस ती घरी पोचायच्या वेळी बाहेर काही मुलं उभी असायची आणि तिला पाहून हिंदी सिनेमातली गाणी म्हणायला लागायची. या सगळ्या कटकटीत तिचं कशातच लक्ष लागेनासं झालं होतं.



दोन्ही प्रिन्सिपल्सनी हे सगळं शांतपणे ऐकून घेतलं, आणि जर ही मुलं सापडली तर त्वरित ॲक्शन घेतली जाईल असं प्रॉमिस केलं. शेवटी प्रश्न शिस्तीचा होता. मग असं ठरलं की शर्वरी आणि कॅन्टीनमध्ये त्या मुलांना पळताना पाहिलेली रिया, यांना काही वर्गांमध्ये नेऊन आणायचं. हे सारे प्रकार करणाऱ्या मुलांमधलं कोणी सापडतंय का ते पाहायचं. आधी मुलींमधलं कोणीच याला तयार होईना. पण हे प्रकार थांबायचे, तर कोणीतरी पुढाकार घ्यायलाच हवा होता, त्यामुळे शर्वरी तयार झाली. तिने रियाला पटवलं. आणि मोठ्या रिसेसनंतर, पाचव्या पिरीअडला, ही ओळख-परेड घेण्यात आली.

श्यामच्या वर्गात जेव्हा शर्वरी आणि रिया पोचल्या तेव्हा सर्वांचे डोळे चोरून चोरून सारखे भोकरेकडे वळत होते. भोकरे थिजून गेल्यासारखा बसला होता. डोळे जमिनीच्या दिशेने लावून.

दोघीजणी बराच वेळ त्याच्या बाकासमोर उभ्या होत्या आणि सर्वांची खात्रीच होती, की आता त्या भोकरेचं नाव घेणार आणि त्याची शाळेतून हकालपट्टी होणार. कोणी सांगावं, कदाचित पोलिस कम्प्लेन्टही होईल. पण शेवटी तसं काहीच झालं नाही. दोघी गेल्या आणि भोकरेने पुन्हा श्वास घ्यायला सुरुवात केली.

शर्वरी आणि रिया या दोघींनी त्या दिवशी कोणाचंच नाव घेतलं नाही. आता त्यांना खरंच तो मुलगा दिसला नाही किंवा ओळखता आला नाही म्हणून घेतलं नाही, का ते घ्यायचंच नाही असं त्यांनी

ठरवलं होतं आणि 'वेळ आली तर आम्ही ते नाव घेऊ शकतो' एवढीच जाणीव त्या मुलांना करून देण्यासाठी ही परेड करण्यात आली होती, यावर वर्गात खूप चर्चा झाली. पण जे घडलं त्याचा परिणाम झाला. वर्गातली मुलं भोकरेकडे थोडी अधिकच संशयाने पाहायला लागली, आणि शर्वरीच्या वाटेला कोणी जाईनासं झालं.

***



श्यामच्या वर्गात जेव्हा शर्वरी आणि रिया पोचल्या तेव्हा सर्वांचे डोळे चोरून चोरून सारखे भोकरेकडे वळत होते. भोकरे थिजून गेल्यासारखा बसला होता. डोळे जमिनीच्या दिशेने लावून. दोघीजणी बराच वेळ त्याच्या बाकासमोर उभ्या होत्या आणि सर्वांची खात्रीच होती, की आता त्या भोकरेचं नाव घेणार आणि त्याची शाळेतून हकालपट्टी होणार.

'थँक्स अ लॉट', शर्वरीचा आवाज आला, तसा श्याम आधी दचकलाच. ती स्वतः येईल अशी त्याने कल्पना केली नव्हती. इन फॅक्ट, नकोच होती यायला. या पार्कमध्ये तो रियाला भेटण्यासाठी आला होता; शर्वरीला नाही. त्याला रियाबरोबर कोणीही पाहून काहीच फरक पडला नसता, त्याची कझिनच होती ती. पण शर्वरीबरोबर त्याला पाहिलं असतं तर मात्र.. म्हणजे खूप काही झालं नसतं, पण त्या सगळ्या राड्याला जेमतेम तीन आठवडे होत होते. आत्ता कुठे शाळेत गोष्टी स्थिरस्थावर होत होत्या. उगाच शंकेला वाव का द्या?

श्यामने आजूबाजूला पाहिलं. अजून अंधार झाला नव्हता. पार्क लहान असलं, तरी गर्दी होती. आणि शर्वरीला कोणी ओळखलं असतं, तर लोक सेल्फी वगैरे काढायला लागले असते. पण तसं काही अजून झालं नव्हतं.

"बस ना," श्याम हळू आवाजात म्हणाला. "सो डीड इट वर्क?"

"परफेक्टली." शर्वरी म्हणाली. "कोणी माझ्या वाट्याला येत नाही आता. मी कम्प्लेन्ट करेन आणि एकेकाला स्कूलमधून रस्टीकेट करतील म्हणून टरकलेत सगळे." शर्वरी मोठ्याने हसली. "मला खरं म्हणजे वाटलंच नव्हतं हे वर्क होईल असं. एवढ्या गर्दीत कोणीतरी दगड मारला आणि पळून गेलं यावर कोणी विश्वास कसा ठेवेल? एकाही माणसाला दगड किंवा तो मारणारा न दिसता!"

श्यामलाही मग बरं वाटलं. हे सारं त्याने प्लॅन केलं तेव्हा ते सगळं असंच होणार याबद्दल त्याच्या मनात शंकाच नव्हती, पण कन्फर्मेशनचा एक वेगळा आनंद असतो. गर्दीत हे नाटक कसं जमेल अशी शंका त्याला कधी वाटलीच नव्हती. उलट ते जमलं तर गर्दीतच, अशी त्याची खात्री होती. गर्दीत कोणालाच सगळं दिसत नाही. जे थोडंसं दिसतं तेही तुकड्यातुकड्यांत. शर्वरीचं ओरडणं आणि रक्त, हा तिला जखम झाल्याचा पुरावा म्हणून पुरेसा होता. तेवढं पाहूनच कोणीतरी खरंच दगड मारला असं सगळ्यांना वाटायला लागलंच होतं. तरीही थोडी सावधगिरी म्हणून पळणाऱ्या मुलाला पाहणारा एक साक्षीदारही असायला हवा, असं त्याने ठरवलं होतं. त्या रोलमध्ये रिया फिट बसली होती. मदत लागलीच, तर तो स्वतःही जवळच असणार होता. त्यामुळे साक्षीदाराचा रोल तो स्वतःही करू शकला असता. पण ते रिस्की होतं. त्याने स्वतःच्याच शाळेतल्या मुलाला पाहूनही ओळखलं नाही, हे कोणाला पटलं नसतं.

'तू ते रक्ताचं छान मॅनेज केलंस,' श्यामही

आता मोकळेपणाने बोलायला लागला. शर्वरीशी त्याची आजवर प्रत्यक्ष गाठ पडलीच नव्हती. लांबून ती भयंकर शिष्ट वाटायची. त्यामुळे रियाने बोलताबोलता तिला शाळेतली मुलं कसा त्रास देतायत हे त्याला सांगितलं, तेव्हा 'असल्या शिष्ट मुलीला असंच पाहिजे' हीच त्याची पहिली प्रतिक्रिया होती. रियाने कितीतरी वेळ सांगायचा प्रयत्न केला, तेव्हाही श्यामचा विश्वास नव्हताच बसला. तरीही त्याने आयडिया काढली, ती केवळ रियासाठी. एकदा काय करायचं हे नक्की ठरलं, की ते करणं अगदी सोपं होतं. त्रास देणाऱ्यांना एकदा कायमचा धाक बसायची गरज होती. त्यासाठी शर्वरीला प्रत्यक्ष धोका तयार न होताच तो झालाय, असं सगळ्यांना वाटायला हवं होतं. मग बाकी काम शाळेकडून आपोआपच झालं असतं.

"छे रे, रक्ताचं काय एवढं. ती साधी ट्रिक आहे. दोन वर्षांपूर्वी एका नाटकात वापरली होती आम्ही. फक्त फार वेळ तिथे गर्दीत थांबले असते तर ते खोटं वाटलं असतं, त्यामुळे पटकन बाहेर पडणं आवश्यक होतं एवढंच."

"पण स्कूल नर्सला कसं पटवलंस? तिने येऊन ड्रेसिंग वगैरे केलं असं म्हणाली रिया!"

"त्यात काय! तिला शूट पाहायला नेणार आहे पुढल्या महिन्यात, 'माझिया प्रियेचे झोपडे'च्या सेटवर. विथ फॅमिली." शर्वरी हसत म्हणाली. "आता हे डोक्याचं खोटंखोटं ड्रेसिंग काढेन आठवड्याभरात. नंतर काहीतरी थापा माराव्या लागतील, जखम केसांनी कव्हर झाली वगैरे."

"बाकी सगळं ठीकय, पण त्या ओळख परेडने खरी मजा आणली," श्याम स्वतःशीच विचार करत म्हणाला, "तशी शाळेकडून काहीतरी ॲक्शन घेतली जाईल याची खात्री होतीच, पण अशी ओळख परेड वगैरे.. काही वेळा प्लॅन न केलेल्या गोष्टीत खरी मजा असते."

शर्वरीला पुन्हा हसू यायला लागलं आणि आता श्यामही तिच्याबरोबर हसत राहिला.

शर्वरीबद्दलचं त्याचं मत असं अचानक सुधारेल यावर त्याचा कधी विश्वासही बसला नसता, पण तसं झालं होतं! गोष्टी किती अचानक बदलतात. काही काही वेळा प्लॅन न केलेल्या गोष्टीतच खरी मजा असते हेच खरं!


**–गणेश मतकरी**

*ganesh.matkari@gmail.com*

*(प्रसिद्ध कथा-पटकथाकार)*


## विनोद

▸ तहानलेल्याला पाणी, भुकेलेल्याला अन्न... आणि डेकोरेशन करणाऱ्याला सेलोटेप कापून देण्यासारखे दुसरे पुण्य नाही... वेध दिवाळी डेकोरेशनचे...

▸ पहिल्या अमिबापासून दुसरा अमिबा तयार झाल्यावर पहिला अमिबा काय म्हणाला असेल?

...आता आमी 'बा' झालो!

**खेळाडू ते अभिनेत्री हा यशस्वी प्रवास करणारी दीपिका पदुकोण फार शिस्तीची आहे. भावभावनांना महत्त्व देणारी मनस्वी व्यक्ती आहे. खास 'वयम्'च्या किशोरवयीन मुलांसाठी तिने व्यक्त केलेलं हे मनोगत–**



# शिस्तीची दीपिका

**आमचं** घर म्हणजे एकदम खेळकर! माझे वडील प्रकाश पदुकोण हे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे बॅडमिंटनपटू आहेत. माझा जन्म ५ जानेवारी १९८६ला कोपनहेगन- डेन्मार्क येथे झाला. माझी आई उज्ज्वला पदुकोण एक ट्रॅव्हल एजन्सी चालवत असे. माझी धाकटी बहीण अनिषा हिला लहानपणी गोल्फ खेळण्याची आवड निर्माण झाली, तर मला बॅडमिंटन खेळण्याची. पप्पांच्या बॅडमिंटनच्या मॅचेस नसल्या की आम्ही स्विमिंग, बॅडमिंटन, गोल्फ, बिलियर्ड्स, स्नूकर, टेबल-टेनिस असे सगळे स्पोर्ट्स खेळत असू. आज जेव्हा बऱ्याचशा मुलांना मी मोबाइल ॲपवरचे गेम खेळत तासन्तास एका जागेवर बसलेलं पाहते, तेव्हा मला वाईट वाटतं. बैठ्या खेळांनी शरीराला कुठलाही व्यायाम मिळत नाही. मोकळी, ताजी हवा, घाम येणं, अंगाला माती लागणं हे मुलांच्या निरोगी वाढीसाठी आवश्यक आहे, असं मला वाटतं. माझ्या आई आणि पप्पांनी आम्हा दोघी बहिणींना पहाटे लवकर उठण्याची सवय लावली. ही सवय माझ्यात इतकी भिनली, की आजही कधी शूटिंग नसलं तरी मी सकाळी सहानंतर झोपत नाही, आपोआप जाग येतेच. लॉकडाऊनमध्येही मी हा नेम मोडला नाही.

लहानपणी मी जाम उद्योगी होते. एकदा आईच्या ड्रेसिंग टेबलवर असलेली तिची मोत्याची माळ मी खेळायला घेतली. खेळता खेळता ती माळ तुटली

आणि त्यातील एक मोती मी गिळला. आईने जेव्हा बेडरूममध्ये ती तुटलेली माळ आणि माझं हलणारं तोंड पाहिलं, तेव्हा काय घडलंय हे तिच्या लक्षात आलं. तब्बल ७२ तासांनी तो मोती माझ्या शरीरातून बाहेर काढण्यात वैद्यकीय पथकाला यश मिळालं.

शालेय वयात असताना माझ्या डॅडींनी स्वतः मला बॅडमिंटनचं ट्रेनिंग दिलं. त्यांना मनापासून वाटायचं की, मी बॅडमिंटनमध्ये माझं करियर घडवावं; परंतु बंगळूरूला कॉलेजचं शिक्षण घेत असताना माझी भेट प्रसाद बिडाप्पा ह्या फॅशन गुरू, स्टायलिस्ट आणि इमेज कन्सल्टन्टशी झाली. त्याने मला मॉडेलिंगमध्ये संधी दिली आणि अवघ्या महिन्याभरात मी यशस्वी मॉडेल झाले. अनेक प्रॉडक्ट एन्डोर्स करू लागले. २-३ वर्षं हा सिलसिला सुरू होता. त्यातून मग मी मुंबईत अभिनयात संधी शोधू लागले. मी अभिनयक्षेत्रात जाणार, असं वडिलांना सांगितलं, तेव्हा ते रागावले नाहीत; उलट घरच्यांनी मला प्रोत्साहनच दिलं.

त्या काळात ऑडिशन हा प्रकार कमी होता. कलाकारांना स्ट्रगलर्स असंच सर्रास म्हटलं जायचं. मी अनेक फिल्म प्रॉडक्शन ऑफिसेसमध्ये जाऊन माझा पोर्टफोलिओ देऊन आले. मी शास्त्रीय नृत्यही शिकलेय. दिग्दर्शक आणि कोरिओग्राफर फराह खानला भेटले तेव्हा ती म्हणाली की, शाहरूख खानची नवी फिल्म 'ओम् शांती ओम्' मी दिग्दर्शित करतेय. तुला मी सिलेक्ट करेन, पण ते शाहरूखवर अवलंबून आहे... पुढे शाहरूखशी माझे असे काही सूर जुळले की आम्ही तीन फिल्म्स एकत्र केल्या.



बहिणीसमवेत

**आपल्या व्यक्तींशी सतत संपर्कात राहणं मला आवश्यक वाटतं. जीवनात आलेल्या कठीण प्रसंगांतून मार्ग कसा काढावा, याचा खरा सल्ला आपल्याला आपले जवळचे असलेलेच देत असतात. मध्यंतरी काही काळ मी भावनिकदृष्ट्या ढासळले होते; घरच्यांच्या व मानसतज्ज्ञांच्या मदतीमुळे सावरून परत नव्याने उभी राहू शकले.**

या क्षेत्रात नाव झाल्यावर तुम्हांला एक सेलेब्रिटी स्टेटस मिळतं. रणवीरही म्हणतो की, बॉलिवूडच्या ग्लॅमरस अभिनेत्रीने घरच्या कामांसाठी स्वतः मेहनत केली तर मग स्टार आणि सामान्य स्त्री यात फरक तो काय राहणार? अर्थात मला त्याचं हे मत पटत नाही. घरातील रोजचं रुटीन हे माझ्यासाठी स्ट्रेस बस्टर आहे. माझ्या कामांमधून स्विच ऑफ होण्यासाठी मला असं घरात मन रमवायला आवडतं. माझ्या घरातील सगळी कामं मी फार आधीपासूनच स्वतः करते. आईने लावलेली सवय! घरात नोकरांवर फार अवलंबून राहू नये, अशी तिची शिस्त असे. मी व रणवीर (अभिनेता रणवीर सिंग) आम्ही दोघं मुंबईत, प्रभादेवीला राहतो. डायनिंग टेबल स्वच्छ, नेटकं ठेवणं, घरातले अकाउंट्स मॅनेज करणं, घरात झाडं लावणं अशा प्रत्येक कामाची मला आवड आहे. अशी कामं मन लावून करणं मला आवडतं. रणवीरला घरकामाची सवय नाही, पण मी हल्ली त्याला मला मदत करायची सवय लावलीये!

मी जवळजवळ दररोज बंगलोरला मम्मी, पप्पा आणि अनिषाशी व्हिडियो कॉलवर बोलते.



गेल्या १६ वर्षांमध्ये मी मॉडेल ते अभिनेत्री असा प्रवास केला. अनेक जण मला माझ्या यशाचा मंत्र विचारतात- करडी शिस्त, कष्ट, वेळेचं नियोजन या सवयी आई-वडिलांनी लावल्या आणि मी त्या पाळल्या!

रणवीरच्या घरच्यांशी आम्ही दोघे बोलतो, मुंबईत असलो तर त्यांना भेटायला जातो. माझ्या जवळच्या नातेवाइकांशीही आम्ही रोज बोलतो. मुंबईत असतो तेव्हा भेटायलाही जात असतो. आपल्या व्यक्तींशी सतत संपर्कात राहणं मला आवश्यक वाटतं. जीवनात आलेल्या कठीण प्रसंगातून मार्ग कसा काढावा, याचा खरा सल्ला आपल्याला आपले जवळचे असलेलेच देत असतात.

आई-वडिलांच्या सल्ल्यावरून आठवण आली, ती माझ्या आयुष्यातील एका कठीण प्रसंगाची. २०१५ मध्ये मी 'तमाशा' आणि 'पीकू' हे चित्रपट पूर्ण केले. त्यानंतर काही वैयक्तिक कारणांनी मला नैराश्य आलं. त्याचा इतका प्रतिकूल परिणाम माझ्या मानसिक आरोग्यावर होईल याची मलाच काय, माझ्या कुटुंबालाही कल्पना नव्हती! मला टोकाचं डिप्रेशन आलं. अन्न जाईना, झोप उडाली, मनात अनेक नकारात्मक विचारांचं काहूर माजलं, स्वतःला मी कोंडून घेतलं. मी त्यावेळेस मुंबईत होते. मला बरं वाटत नाहीये, हे माझ्या आवाजावरून आईच्या-पप्पांच्या लक्षात आलं आणि ते दोघं तडक मुंबईला आले. पुढच्या फ्लाइटने त्यांनी मला आमच्या बंगलोरच्या घरी नेलं. औषधोपचार सुरू झाले. मला जगण्याची इच्छा उरलेली नाही, असं मी बरळू लागले होते. डोळ्यांखाली काळी वर्तुळं आली होती. खांद्याची, गळ्याची हाडं दिसू लागली होती! माझ्या मनात नैराश्याच्या भावना का, कशामुळे आल्या, हे मी माझ्या आईशी मनमोकळेपणे बोलले. मग आम्ही 'लव्ह लाफ लिव्ह' ह्या संस्थेचे थेरपिस्ट अण्णा चंडी आणि डॉक्टर श्याम भट या मानसोपचारतज्ज्ञांची मदत घेतली. ध्यानधारणा, सकारात्मक विचार, वेळच्यावेळी गरम आहार, पुरेशी झोप, औषधं अशा सगळ्या उपायांनंतर मी ३-४ महिन्यांनी बरी झाले. माझ्या ह्या मानसिक आजारातून मला बरं करण्याचं श्रेय माझ्या आई-वडिलांना, बहिणीला आणि डॉक्टरांना जातं.

आपल्या आयुष्यात मानवी संवेदना फार महत्त्वाच्या असतात. सिनेमातही. शकुन बत्रा या तरुणाच्या फिल्ममधल्या मानवी संवेदना फार भिडणाऱ्या असतात. शकुनचा पहिलाच सिनेमा होता– 'कपूर एन्ड सन्स'. हा सिनेमा मी पाहिला आणि त्याच्या कलेच्या प्रेमात पडले. 'पिकू', 'तमाशा' ह्या माझ्या दोन्ही फिल्म्समध्ये ह्यूमन इमोशन्स फार उत्तम दाखवल्या गेल्या आहेत. आता गुडी गुडी कॅरेक्टर्सचं युग राहिलेलं नाही. पडद्यावरच्या व्यक्तिरेखा प्रेक्षकांना खऱ्याखुऱ्या आणि जिवंत जाणवायला हव्यात.

संजय लीला भन्साळी या नामवंत दिग्दर्शकासोबत

तीन फिल्म्स करण्याची संधी मिळाली आणि मी तावून सुलाखून निघाल्यासारखं वाटलं मला. ते परफेक्शनिस्ट आहेत; सेटवर आम्हांला रागावतसुद्धा, पण त्यातूनच शिकत गेले मी.

ॲसिड ॲटॅकमधून वाचलेल्या लक्ष्मी अगरवालची कथा मला समजली आणि मी अंतर्बाह्य शहारून गेले. सत्य घटनेवर आधारित असा सिनेमा आपणच काढावा असं वाटलं आणि म्हणून मी स्वतः निर्मितीत उतरले. या सिनेमातल्या माझ्या भूमिकेचं कौतुक झालं, पण 'छपाक' फिल्मला बॉक्स ऑफिसवर फारसं यश लाभलं नाही. '८३' फिल्मची निर्मिती मी केली. रणवीरने यात कपिलदेवची भूमिका केली आणि मी रोमी देव यांची म्हणजे त्याच्या पत्नीची. आता मी एका तेलगू फिल्मची निर्मिती करतेय.





वडिलांसमवेत

माझ्या करियरला १६ वर्षे झालीत आणि ह्या १६ वर्षांमध्ये मी मॉडेल ते अभिनेत्री असा प्रवास केला. अनेक जण मला माझ्या यशाचा मंत्र विचारतात. त्यावर माझं उत्तर असतं- करडी शिस्त!

मधल्या अवघड काळानंतरही कष्ट, शिस्तबद्ध वागणं, माझ्या आईवडिलांचा पाठिंबा, तसंच हितचिंतक, प्रेक्षक, मीडियाच्या सद्भावना या सगळ्यामुळे माझी पुढची वाटचाल सुकर झाली. मी एक गोष्ट कटाक्षाने पाळली. माझा दोष नसताना कोणी माझं मन दुखावलं तरी त्या व्यक्तींबद्दल मी माझ्या मनात कधी दुराग्रह बाळगला नाही. मनात आकस न ठेवता जगणं सोपं नसलं तरी अशक्य नाहीच. त्यातूनच स्वतःचा विकासच घडतो, हा माझा अनुभव आहे.

माझ्या वडिलांनी मला व्यायामाची, खेळण्याची शिस्त लावली. आईने जीवनात 'फोकस्ड' राहण्याची सवय लावली. शाळेतून घरी आल्यावर मी आईला शाळेतल्या घडामोडी सांगायचे. वेळेत सगळा गृहपाठ पूर्ण करायचे. माझ्या शाळकरी-कॉलेजच्या दिवसांमध्ये माझं फ्रेंड-सर्कल फार मोठं नव्हतं. मी मित्र-मैत्रिणींसोबत फारसं कधी 'हँग आऊट' केलेलं नाही. मित्र-मैत्रिणी नक्की असावेत, मात्र त्यांच्यासोबत आपण किती वेळ घालवावा, याला मर्यादा असल्या पाहिजेत, हेच मी माझ्या बालपणापासून शिकत आले. टीव्ही बघण्यातही मी कधी वेळ घालवला नाही. त्या आखीव-रेखीव आणि शिस्तबद्ध जीवनाचा मला आज खूप फायदा होतोय. कोणत्याही क्षेत्रात असलं तरी सतत कष्ट केल्याशिवाय प्रगती होऊ शकत नाही. माझ्या यशात घरातून मिळालेल्या या संस्कारांचा व सवयींचा वाटा मोठा आहे.

**-दीपिका पदुकोण**

**शब्दांकन- पूजा सामंत**

*samant.pooja@gmail.com*

(ज्येष्ठ पत्रकार)

धमाल फॅन्टॅस्टिक गोष्ट



# राजूचा बागुलबुवा

**राजूच्या** आईने राजूला हळूच दटावलं. म्हटलं, "झोप हं राजू, नाहीतर तो येईल, 'बागुलबुवा'" -राजूने घाईघाईने डोळे तर मिटले, पण डोळे किलकिले करून तो आईकडे पाहत राहिला.

"कळतंय बरं, नाटक... झोप आता!... नाहीतर येईल तो," राजूच्या आईने म्हटलं तसं त्याचे वडील डोकावले. हळू आवाजात ते म्हणाले, "सारखं सारखं म्हणत जाऊ नकोस तसं. उगाच मनात भीती बसली म्हणजे?" राजूच्या आईने हळूच जीभ बाहेर काढली आणि तरीही तिने दटावत म्हटलं, "झोप हं राजू, उगाच नखरे नकोत..." मग ती गेली पाहत पाहत.

राजूने मनातल्या मनात म्हणायला सुरुवात केली. मी झोपणारच आहे, पण मला त्या बागुलबुवाची भीती वाटत नाही! तसं मला अंधाराची थोडी भीती वाटते म्हणा! आणि कधीकधी भुताची पण वाटते. पण भुतं नसतात, असं बाबा म्हणतात!

राजूने हळूच डोळे उघडले. आई गेली होती, थोडा अंधार पण पसरला होता. तेवढ्यात खिडकीचा पडदा सळसळला. तिथे लपलेला बागुलबुवा हळूच बाहेर आला. राजूने हसून म्हटलं, "आलास?"

"मग काय करू? बोलावलं ना मला!" "मी नाही बोलावलं! आईने.."

"तेच रे! पण मग आलो, खेळायला."

"खेळायला?"

"मग नाहीतर काय?"

"तुझी आई पाठवते तुला रात्री?"

"पाठवते, पण लवकर ये म्हणते, वाट पाहते. झोपत नाही."

"तुला भीती नाही वाटत, अंधाराची?"

"खरं सांगू? ...वाटते."

"मग?"

बागुलबुवाने आपल्या पाठीवरचं गाठोडं जमिनीवर ठेवलं आणि त्यावर तो बसला. त्याने म्हटलं, "या गाठोडयात काय आहे, माहीत आहे?"

"नाहीरे!... पण तुझ्याकडे असतं ते गाठोडं..."

"या गाठोड्यात अंधार असतो, चांदण्या असतात आणि बऱ्याच गमतीच्या गोष्टी.."

राजू त्या गाठोड्याकडे बघत राहिला. त्याला कुतूहल वाटू लागलं.

तो म्हणाला, "गमतीच्या गोष्टी? कोणत्या?"

"सांगता येणार नाहीत, पण एखाद्या वेळेस तुला बघता येतील..."

"म्हणजे रे काय?"

सांगावं की सांगू नये असं वाटून बागुलबुवा घुटमळत राहिला.

मग म्हणाला, "सिक्रेट आहे! कुणाला सांगणार तर नाहीस ना?"

"नाही सांगणार... बोल!"

त्यावर बागुलबुवा म्हणाला, "सिक्रेट आहे, पण सांगतो... आता ना, मी अदूच्या स्वप्नात चाललोय. येशील?"

राजू एकदम उठून बसला. एकदम एक्साईट झाला. म्हणाला, "म्हणजे अद्वैतच्या-अदूच्या? वरच्या मजल्यावर राहतो तो? पण मला कसं येता येईल?"

बागुलबुवा हसला. म्हणाला, "तो पण झोपत नाहीए, म्हणून त्याच्या आईनेसुद्धा मला बोलावलंय. वरच्या मजल्यावर तर जायचंय. अलगद, तरंगत जाऊ... येशील?"

राजू जरा चिडून म्हणाला, "तुझं ठीक आहे रे. पण मी कसा तरंगेन?"

बागुलबुवाने राजूच्या हातावर टाळी दिली. म्हटलं, "या गाठोड्याच्या कडेला धरून ठेव आणि बैस गाठोड्यावर. एकदम सोप्पं! बाबांच्या स्कूटरवर बसतोस ना, तसं..."

राजू पटकन गाठोड्यावर बसला. गाठोडं विशविशीत होतं. मऊ होतं स्पंजसारखं. आणि स्कूटरच्या सीटसारखंसुद्धा होतं. राजूने गाठोडं घट्ट धरलं. आत अंधार होता म्हणे. आत तारका होत्या म्हणे. आणि चंद्रसुद्धा. काहीतरीच सांगतोय हा बागुलबुवा!

बागुलबुवाने गाठोडं उचललं आणि पाठीवर ठेवलं. राजू गाठोड्याला चिकटला होताच. आणि मग ती गंमत झाली. हळुवारपणे राजू उचलला गेला गाठोड्यासह. कारण बागुलबुवा तरंगायला लागला होता. नंतर भस्कन तो खिडकीच्या बाहेर आला. राजू डोळे विस्फारून खाली पाहत राहिला. खरंच की, आपण तरंगतोय एखाद्या हलक्याशा पतंगासारखे. काही फूट वर तरंगत गेल्यानंतर बागुलबुवा भस्कन पुन्हा खिडकीतून अदूच्या बेडरूममध्ये आला. पण बेडरूममध्ये अंधार नव्हता. कसलासा सोनेरी प्रकाश होता आणि त्या प्रकाशात अदू उभा होता- मंद मंद हसणारा. आणि तिथं मोतीकुत्रा होता. त्याच्या बाबांची स्कूटर होती. क्रिकेटची बॅटपण होती. तेवढ्यात गंमत झाली. एका झाडाच्या आडून जिराफाची मान डोकवायला लागली. जिराफ हसून बघत होता. बागुलबुवाने हळूच राजूला जिराफाच्या मानेवर बसवलं. एखाद्या घसरगुंडीवरून घसरत यावं तसा राजू घसरत

आला आणि अदूसमोर त्याने उडी मारली. अदूला अत्यानंद झाला. टाळ्या वाजवत तो म्हणाला, “अरे राजू, तू आलास? हे माझं स्वप्न आहे... माहीत आहे ना?”

“स्वप्नं?”

“मग काय? हा बघ हा जिराफ... हा बघ हा मोती... ही बाबांची स्कूटर... ही क्रिकेटची बॅट...”

तेवढ्यात बागुलबुवाने आपलं गाठोडं जमिनीवर ठेवलं. त्याने गाठोड्यात हात घातला. त्याने हात बाहेर काढला तेव्हा अनेक रंग बाहेर येऊ लागले. लाल, हिरवे, पिवळे. आसपासची झाडं त्या रंगात न्हाऊन निघू लागली. मोती कुत्रा तरंगू लागला आणि भुंकायच्या ऐवजी गाऊ लागला. अदूच्या स्वप्नात एक घर होतं. पण ते घरासारखं दिसतच नव्हतं. म्हणजे एका मोठ्या फुलासारखं दिसत होतं. राजू आणि अदू त्या फुलाच्या पाकळ्यांवर जाऊन नाचायला लागले. तेव्हाच कुठून तरी घड्याळाचे टोल ऐकू यायला लागले... टण्... टण्... टण्... बागुलबुवाने जीभ बाहेर काढली. तो म्हणाला, “बापरे! वेळ झाली...” दोघांनी विचारलं, “कसली रे वेळ झाली?” “मिनीच्या स्वप्नाची वेळ झाली आहे... येता तुम्ही दोघं? पण सिक्रेट आहे हां...” “येतो... येतो-” दोघांनी म्हटलं. अदू म्हणाला, “माझ्याकडे नाचणाऱ्या मोराचं चित्र आहे.. तिला पाहिजे होतं.. घेऊ बरोबर?”

बागुलबुवाने थोडा विचार केला. मग तो म्हणाला, “बरं, चल घेऊन.. नेमका मोरच आज मी आणला नव्हता.. आता उपयोगी पडेल! या बसा दोघंही..”

राजू आणि अदू दोघांनी गाठोड्यावर उडी घेतली आणि दोघेही तरंगू लागले. पुन्हा तोच प्रवास. खिडकीतून भस्‌कन बाहेर जायचं आणि काही फूट तरंगत गेल्यानंतर मिनीच्या बेडरूमच्या खिडकीतून भस्‌कन आत जायचं. आत निळा, जांभळा सुंदर प्रकाश पडलेला होता. आभाळात ढग दाटून आले होते. मिनी पाठमोरी उभी राहून आभाळाकडे पाहत होती थोडी हिरमुसली होऊन. तिने बागुलबुवाला पाहिलं. पण ती हसली नाही. बागुलबुवाने विचारलं, “काय झालं? रुसवा कशाचा?”

“काल सगळ्यांनी इंद्रधनुष्य पाहिलं. मी आले धावत, तर दिसलंच नाही. निघून गेलं होतं!”

“इतकंच ना?” बागुलबुवाने गाठोड्यात हात घातला आणि एकदम त्याने मोठ्ठं इंद्रधनुष्य बाहेर काढलं. मिनीच्या स्वप्नातल्या आकाशात उमटलेलं.



चित्रं- संतोष घोंगडे

अदू म्हणाला, “मग मोर पण पाहिजे ना?”

“करेक्ट! दे तो...” अदूने घाईघाईने मोराचं चित्र दिलं आणि मग अचानक इंद्रधनुष्याच्या खाली जाऊन तो मोर नाचायला लागला. पावसाचे थेंब पडायला लागले. मिनी आनंदाने नाचू लागली. राजूही आणि अदूही.

त्याच वेळेला दूरवर कुठेतरी घड्याळाचे टोल पडायला लागले. टण्... टण्... टण्...

* * *

मिनीच्या आईने हळूच मिनीच्या बेडरूमचा दरवाजा उघडला आणि आत डोकावून पाहिलं. मिनी झोपली होती. पण झोपेत हसत होती. आई म्हणाली, 'हासतेय वेडी!.. पाऊस पडतोय वाटतं! अगदी मिनीच्या अंगावरसुद्धा थेंब पडतायत. आणि रंग कसले पडलेत इथं?' असं म्हणून मिनीच्या आईने हळूच खिडकी लावून घेतली.

अदूच्या आईने हळूच डोकावून पाहिलं आणि ती म्हणाली, 'झोपलाय वाटतं! क्रिकेटची बॅट घेऊनच झोपलाय..' आईने हळूच क्रिकेटची बॅट उचलली. 'हे मोराचं चित्रही पडलंय वाटतं..' असं म्हणत तिने खिडकी लावून घेतली.

राजूच्या आईने हळूच डोकावून पाहिलं. 'झोपलाय वाटतं!' तिने थोडी आवराआवरी केली, म्हटलं, 'आणि या प्लास्टिकच्या चांदण्या कुठून आल्यात इथं?' आणि मग तिने हळूच खिडकी लावून घेतली.

* * *

राजू, अदू, मिनी, पंपू, गंपू सगळेच जमले होते. राजूने अदूला टाळी देत म्हटलं, "कित्ती मज्जा! मी तुझ्या स्वप्नात आलो होतो.."

अदू मोठ्याने हसला. त्याने आणि राजूनेही मिनीला टाळ्या दिल्या आणि दोघांनी म्हटलं, "आणि आम्ही तुझ्या स्वप्नात आलो होतो... कसलं इंद्रधनुष्य होतं! भारी..."

तिघे, आणि पाठोपाठ सगळे हसू लागले. थोडं हसून झाल्यानंतर पंपू डोकं खाजवू लागला. तो म्हणाला, "कुछ तो गडबड है यार! तू माझ्या स्वप्नात आला होतास, असं अदूने किंवा मिनीने राजूला म्हणायला पाहिजे... हो ना? पण इथे राजूच म्हणतोय की, मी तुझ्या स्वप्नात आलो होतो... आणि अदू मिनीला म्हणतोय की, आम्ही तुझ्या स्वप्नात आलो होतो... हे कसं काय?"

पंपू, गंपू आणि इतर मित्रमंडळी डोकं खाजवू लागले. पहिल्यांदा राजू, अदू आणि मिनीसुद्धा हसले, पण बुचकळ्यात पडून तेही डोकं खाजवू लागले. हे कोडं काही त्यांना सुटेना.

तुम्हीसुद्धा आता बुचकळ्यात पडून डोकं खाजवायला लागलात ना?

* * *

**-भारत सासणे**
*bjsasne@yahoo.co.in*
*(अ. भा. साहित्य संमेलनाचे अध्यक्ष)*




**▸ शेजारच्या काकूंनी मला ५० रुपये दिले. ४० रुपयाचं दही आणायला सांगितलं आणि म्हणाल्या की, "१० रुपये तुला ठेव."**

**....आता मी १० रुपयांची फ्रुटी प्यायलो आहे. पण दही कुठेच मिळत नाहीये.**

निसर्ग नवल

**सस्तन प्राणी अंडी घालत नाहीत, त्यांची बाळं पोटातून येतात, असे आपण शिकतो. पण निसर्गात अनेक चमत्कार पाहायला मिळतात. ऑस्ट्रेलिया खंडातील प्राण्यांचा अभ्यास करणाऱ्या युरोपीय शास्त्रज्ञांना सस्तन असून अंडी घालणारे काही प्राणी आढळून आले. त्यातून प्राण्यांच्या एका नव्या गटाची माहिती हाती लागली...**

# सस्तन असूनही अंडी घालणारे

**ऑस्ट्रेलिया** हा पृथ्वीच्या दक्षिण गोलार्धातील देश आहे. सतराव्या शतकापर्यंत युरोपमधील लोकांना ऑस्ट्रेलिया सापडलेलाच नव्हता, त्यामुळे या देशातील वन्यजीव, इथली भौगोलिक परिस्थिती आणि नैसर्गिक अधिवास याबाबतही काहीच माहिती नव्हती. अठराव्या शतकात या देशाच्या भूमीवर आणि आसपासच्या द्वीपसमूहांवर युरोपियन व्यापारी, संशोधक नियमित जाऊ लागले. तिथे त्यांना अनेक अनोख्या गोष्टी दिसल्या. अठरावे शतक संपता संपता या भागातून युरोपमध्ये एका प्राण्याचा नमुना आला आणि तो पाहिल्यावर युरोपमधील प्राणिशास्त्रज्ञांचा भलताच गोंधळ उडाला. 'बिव्हर'सारख्या प्राण्याला बदकाची चोच जोडली आणि त्याच्या पायांना कातडी पडदे लावले, तर जसं दिसेल तसा तो प्राणी दिसत होता. या प्राण्याला त्याच्या सपाट, फताड्या पंज्यांवरून 'प्लॅटिपस' म्हणजे 'सपाट' पायाचा असेच नाव मिळाले. त्याच्या बदकासारख्या चोचीमुळे 'डकबिल प्लॅटिपस' असेही म्हणतात. या प्राण्याचा अधिक अभ्यास केल्यावर लक्षात आले, की हा खरोखरच जगावेगळा प्राणी आहे, कारण हा सस्तन प्राणी असूनही अंडी घालतो.

वीणीचा हंगाम वगळता नदी किंवा जलाशयाच्या काठावर पाण्याच्या पातळीच्या सुमारे एक फूट वरती



प्लॅटिपस

हे प्राणी बीळ करून राहतात. अंडी द्यायची वेळ येते, तेव्हा मादी अंड्यांसाठी वेगळे बीळ खोदते. ते ६०-६५ फूट लांब असते. जलाशयाच्या पाण्याची पातळी वाढलीच तर सगळे पाणी आत शिरू नये म्हणून, त्यात अंतराअंतरावर अडथळे उभारलेले असतात. प्लॅटिपसची मादी आधी सुमारे २८ दिवस आपल्या पोटातच अंडी उबवते आणि नंतर बाहेर काढून सुमारे १० दिवस पुन्हा उबवते. अंड्यातून बाहेर आलेली पिल्ले अतिशय नाजूक असतात. त्यांना दृष्टी नसते. त्यांच्या अंगावर केस नसतात. साधारण चार महिने प्लॅटिपसची मादी त्या बिळात आपल्या पिल्लांना वाढवते, मग ते बाहेर येऊन स्वतंत्रपणे जगू लागतात.

ऑस्ट्रेलिया खंडातील इतर प्राण्यांचा अभ्यास करताना प्लॅटिपसच्या प्रकारातील म्हणजे सस्तन असून अंडी घालणारा आणखी एक प्राणी आढळून आला, तो म्हणजे 'इचिडना'. साळींदरासारखा दिसणारा हा लहानसा प्राणी 'स्पायनी अँन्ट इटर' या नावानेही ओळखला जातो. या इचिडनाच्या चार प्रजाती आणि प्लॅटिपस असे फक्त पाचच सस्तन प्राणी अंडी देतात. त्यांचा 'मोनोट्रेमाटा' असा वेगळाच गट मानला जातो.

इचिडना हा प्राणी उत्क्रांतीच्या चक्रात सुमारे २० ते ५० दशलक्ष वर्षांपूर्वी जन्माला आला. याचे पूर्वज जलचर होते. मात्र आज आढळणारे इचिडना हे भूचर आहेत. भारतात मिळणाऱ्या साळिंदरासारखा किंवा अमेरिकेत सापडणाऱ्या हेजहॉगसारखा हा इचिडना दिसतो. रोमन भाषेतील 'इखिनॉस' म्हणजे 'हेजहॉग सी अर्चिन' या नावावरून 'इचिडना' हे नाव पडल्याचे मानले जाते. प्रामुख्याने वाळवी, मुंग्या यावर गुजराण करणाऱ्या इचिडनाला तोंडात दात नसतात. जमिनीत बीळ खोदण्यासाठी मजबूत पाय आणि मोठ्या, ताकदवान नख्या असतात.

यांचे पूर्वज जलचर होते, त्यामुळे इचिडना उत्तम पोहणारे असतात. इचिडना मादीच्या पोटावर एक पिशवी असते. ती तिचे अंडे त्याच पिशवीत घालते. दहा दिवसांनंतर अंड्यातून जे पिल्लू बाहेर येते, ते अतिशय नाजूक आणि अपुरी वाढ झालेले असते. ते पुढे ४५ ते ५५ दिवस याच पिशवीत राहते. नंतर आई त्याच्यासाठी मातीत एक खड्डा खोदून पिल्लाला त्यात ठेवते. पिल्लू सात महिन्यांचे होईपर्यंत दर पाच दिवसांनी मादी त्याला दूध पाजायला येते.

हे अंडी घालणारे सस्तन प्राणी आणि इतर सस्तन प्राणी यांच्यात काही फरक पाहायला मिळतात. प्लॅटिपस आणि इचिडनाला प्रौढावस्थेत इतर सस्तन प्राण्यांसारखे दात नसतात. इतर सस्तन प्राण्यांच्या तुलनेत यांचा चयापचयाचा (Metabolism) वेगही अतिशय कमी असतो. प्लॅटिपसच्या शरीराचे सर्वसाधारण तापमान ३१ अंश सेल्सियस असते, जे इतर सस्तन प्राण्यांचे ३७ अंश असते. याशिवाय प्लॅटिपस आणि इचिडना यांना मागच्या पायावर एक खुरासारखा अवयव असतो. इचिडनासाठी हा



*इचिडना*

तसा निरुपयोगी अवयव असतो; प्लॅटिपस मात्र या खुराच्या मदतीने आपले विष सोडतो. फक्त नर प्लॅटिपसनाच विष असते आणि त्याचा उपयोग भक्ष्य पकडण्यासाठी, इतर नरांशी लढण्यासाठी केला जातो.

प्लॅटिपस आणि इचिडना या अंडी देणाऱ्या सस्तन प्राण्यांच्या 'मोनोट्रेमाटा' या गटाबद्दल १९व्या शतकापर्यंत पुरेशी माहिती नव्हती आणि त्यामुळे काही गैरसमज प्रचलित होते. काही अभ्यासकांना असे वाटत होते की हे 'अर्ध रेप्टाइल्स' प्रकारचे प्राणी सस्तन प्राण्यांच्या गटात सगळ्यात शेवटी निर्माण झाले आहेत आणि अतिशय दुय्यम स्तरातले आहेत. मात्र ही समजूत चुकीची असल्याचे पुरावे फॉसिल्सच्या रूपाने मिळाले. ऑस्ट्रेलिया खंडात सुमारे ११० दशलक्ष वर्षांपूर्वीच्या मोनोट्रेमस प्रकारच्या प्राण्याचे जे फॉसिल्स मिळाले आहेत, त्यावरून हे कळते की ते प्राणी आजच्या प्लॅटिपसपेक्षा वेगळे होते. प्लॅटिपसच्या संमिश्र शरीर वैशिष्ट्यांमुळे उत्क्रांतीचे दुवे शोधणाऱ्या संशोधकांना त्याचे संशोधन हे नेहमी आव्हान ठरत आले आहे. रेप्टाइल आणि सस्तन प्राणी दोन्हींचे गुणधर्म असल्याने प्लॅटिपसच्या शरीरातील लिंग ठरवणाऱ्या गुणसूत्रांची संख्याही इतर सस्तन प्राण्यांपेक्षा खूप जास्त म्हणजे 'दहा' असते.

निसर्गाच्या पसाऱ्यात प्रत्येक प्राण्याचे एक विशिष्ट असे स्थान आहे आणि त्यासाठीच तो प्राणी उत्क्रांतीच्या चक्रात निर्माण झालेला असतो. अंडी घालणारे सस्तन प्राणीदेखील याच नियमानुसार अस्तित्वात आले आहेत आणि एका विशिष्ट मर्यादित भूप्रदेशापुरते सीमित राहिलेले आहेत.

**-मकरंद जोशी**
*makarandvj@gmail.com*
*(निसर्ग अभ्यासक व लेखक)*

*(लेखातील फोटो इंटरनेटवरून साभार )*

# वाट चिमुकली



**वाट**
चिमुकली
मऊ मातीची
आडवी तिडवी
झाडासंगे.. रानामधुनी
दुडुदुडू पळते घाटावरुनी..

**गाव**
पिटुकले
भातशेतीचे
सजले धजले
घरोघरीच्या मंद दिव्यांनी
हळूच गिळले मध्यरातीने..

**सूर्य**
उगवला
फुटे लालिमा
बोलू लागल्या
गायी-म्हशींच्या घुंगुरमाळा
डोंगरातला गाव जागला..

**-दासू वैद्य**
*dasoovaidya@gmail.com*

# डॉ. एलन स्वॅलो रिचर्ड्स

**गृह** अर्थशास्त्र (होम इकॉनॉमिक्स) हा विषय महाविद्यालयीन अभ्यासक्रमात शिकवला जातो. त्यात कुटुंबाचे स्वास्थ्य, त्याचा आहार, आरोग्य, घरात आवश्यक असणाऱ्या सुविधा यांचा अभ्यास शरीरशास्त्र, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, जीवशास्त्र, सूक्ष्मजीव विज्ञान वगैरे शास्त्र शाखांच्या आधारे केला जातो. 'गृह अर्थशास्त्र' शास्त्रशाखेचा उगम झाला तो एका सर्वेक्षणातून. सांडपाण्याचे नमुने तपासण्याच्या मोहिमेतून.

म्हणजे त्याचं असं झालं- अमेरिकेतील 'इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी' विद्यापीठाच्या सॅनिटरी केमिस्ट्री प्रयोगशाळेवर मॅसेच्युसेटस राज्याच्या आरोग्यखात्याने प्रयोगशाळेवर पाण्याची तपासणी करण्याची कामगिरी सोपवली. या प्रयोगशाळेत एलन साहाय्यक संशोधक होती. तिने आपल्या मदतनीसांना ठिकठिकाणीचे जलसाठे, जलस्रोत, सांडपाणी वगैरे ठिकाणच्या पाण्याचे नमुने गोळा करायला सांगितले. जवळपास चाळीस हजार नमुने तपासले. कारखान्यांनी सोडलेल्या दूषित रसायनांमुळे पाण्यात मोठ्या प्रमाणावर प्रदूषण झालेलं एलनला आढळलं. एलनने दिलेल्या सखोल आणि विस्तृत अहवालाची दखल घेतली गेली. देशभर त्यावर चर्चा झाली. मॅसेच्युसेटस राज्याच्या आरोग्यखात्याने पाणी शुद्धीकरण यंत्रणा उभी केली.



*एलन पाणी परीक्षण करताना*

**मुलींना विद्यापीठात प्रवेश दिला जात नव्हता, अशा काळात १३० वर्षांपूर्वी डॉ. एलन यांनी अमेरिकेतल्या MIT विद्यापीठात नेटाने प्रवेश मिळवला. पाणी, पोषण आहार, आरोग्य अशा विषयांवर संशोधन केलं, पुस्तकं लिहिली.**

पाण्याच्या शुद्धतेचं मानक ठरवून दिलं. अमेरिकेत हे असं प्रथमच घडून आलं ते एलनच्या अहवालामुळे आणि 'सॅनिटरी इंजीनियरिंग' या विषयाची पायाभरणी झाली तीही तिच्यामुळेच.

एलन होती रसायनशास्त्राची अभ्यासक आणि अध्यापक. पण पाण्याचे नमुने तपासताना तिच्या मनात विचार येत होते ते गृहिणींचे. स्वच्छतेची तंत्र, सांडपाणी व्यवस्था कशी असावी, पोषक आहार कसा असावा, घरातली कामं करताना कोणती साधनं वापरली तर वेळ आणि ऊर्जा वाचेल, गुणवत्तापूर्ण आरोग्यसंपन्न कुटुंब व्यवस्था कशी राखता येईल याबाबत तिचे विचार आणि प्रयोगही चालू असत. तिने घराची प्रयोगशाळा केली आणि प्रयोगशाळेत 'घर' नेलं. पुढे १८९० साली अमेरिकेतील बोस्टन शहरात चक्क एक आदर्श स्वयंपाकगृहच उभं केलं. तिथे स्वस्त परंतु पोषणमूल्ययुक्त अन्नपदार्थ विक्रीची सोय केली. हे पदार्थ कसे तयार करावेत, त्यातले घटक कसे व कोणते असावेत हे शिकवण्यासाठी पालकांचे वर्ग घेतले. या उपक्रमाची दखल घेतली गेली. लवकरच शिकागो शहरात भरत असलेल्या जागतिक प्रदर्शनात (वर्ल्डस् कोलंबियन एक्सपो) असं आदर्श स्वयंपाकघर उभारून प्रात्यक्षिकं देण्यासाठी तिला एक कक्ष देण्यात आला.

या उपक्रमाचं फलित म्हणजे शालेय विद्यार्थ्यांना पोषक आहार देण्याचा उपक्रम सुरू झाला. एलनच्या संशोधनामुळे, तिच्या व्याख्यानांमुळे, पुस्तकांमुळे अमेरिकेत जलसुरक्षा, अन्नसुरक्षा यांचं महत्त्व लक्षात घेऊन त्याविषयीचे कायदे तयार केले गेले. गृहिणींनाही विज्ञानाचं, अर्थशास्त्राचं ज्ञान असलं पाहिजे या विचारांचा प्रभाव वाढला. 'गृह अर्थशास्त्र' या विषयासाठी शैक्षणिक अभ्यासक्रम तयार झाला.

> **भारतात कधीपासून विद्यापीठात मुलींना प्रवेश मिळू लागला, माहितीये? शोधून काढाल? सुरुवातीच्या काही भारतीय पदवीधर महिलांच्या कहाण्या जरूर वाचा.**

आज आपल्याला 'यात काय मोठं' असं वाटेल. पण हे अमेरिकेत घडत होतं १८८०-९०च्या दशकांत. त्याकाळी अमेरिकेत स्त्रियांसाठी विद्यापीठाचे दरवाजे उघडले गेले नव्हते. काही तुरळक महिला विद्यापीठं नुकतीच सुरू झाली होती. ज्या MIT विद्यापीठात एलनने नंतर आयुष्यभर अध्यापन आणि संशोधन केलं, त्या विद्यापीठातही १८८३ सालापर्यंत स्त्रियांना/विद्यार्थिनींना प्रवेश नव्हता.

एलन स्वॅलोचा जन्म १८४२सालातला. स्वॅलो दांपत्याची ही एकुलती एक मुलगी. ते ज्या छोट्या गावात राहात होते, तिथे प्राथमिक शिक्षणाची चांगली सोय नव्हती. म्हणून पालकांनी एलनला घरीच प्राथमिक शिक्षण दिलं. पुढचं शिक्षण तिला चांगलं मिळावं म्हणून ते गाव बदलून दुसरीकडे गेले. आर्थिक परिस्थिती बेताचीच होती. एक छोटं दुकान टाकून ते आपला चरितार्थ भागवत. तिथल्या माध्यमिक शाळेत एलन शिकू लागली. रसायनशास्त्राच्या अभ्यासाने तिला आकर्षून घेतलं. आपल्या रोजच्या जगण्यात रसायनशास्त्राचा किती सहभाग असतो, ते लक्षात आल्याने तिचं रसायनशास्त्राचं प्रेम वाढतच गेलं. ती आई-वडिलांना दुकानाच्या कामातही मदत करे. जमाखर्च पाही. अन्नपदार्थांच्या पाकिटांवर लिहिलेले अन्नघटक वाचे. मग ती त्याविषयी अधिक माहिती मिळवण्याचा प्रयत्न करी.

एलन शालान्त परीक्षा उत्तीर्ण झाली. तिला महाविद्यालयात पाठवावं अशी घरची परिस्थिती नव्हती. फीचे पैसे जमवण्यासाठी एलन वेगवेगळी कामं करू लागली. घरकामाची मदतनीस, आजारी



*MIT तून पदवी प्राप्त करणारी एलन आणि तिचे सहकारी*

माणसांची सुश्रुषा, लहान मुलांच्या शिकवण्या वगैरे कामं करून तिने पैसे जमवले. वयाच्या २६व्या वर्षी (१८६८ साली) तिने महिलांसाठीच्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळवला. तिथे तिने गणित, रसायनशास्त्र वगैरे विषयांचा अभ्यास केला. १८७०साली तिला त्या महिला विद्यालयाची पदवी मिळाली. रसायनशास्त्राच्या पदवीमुळे आपल्याला एखाद्या कारखान्यात, उद्योगधंद्याच्या प्रयोगशाळेत नोकरी मिळेल, अशी तिला आशा होती. अमेरिकाभर चौकशी करून, ठिकठिकाणी अर्ज करून पाहिले. कोणीही तिला प्रतिसाद दिला नाही. प्रवेश दिला नाही.

एका प्राध्यापकाने सुचवल्यावरून तिने MIT संस्थेत अर्ज केला. तिच्या पदवी परीक्षेतली तिची गुणवत्ता उत्तम दर्जाची होती खरी, पण MITनं तोपर्यंत मुलींना प्रवेश दिलेलाच नव्हता. शेवटी एक प्रयोग म्हणून संस्थेने तिला 'विशेष विद्यार्थी' म्हणून प्रवेश दिला. तिथे तिचं नाव विद्यार्थी-पटावर नव्हतंच. तिला फी द्यावी लागत नव्हती. तिला विद्यार्थी म्हणून अधिकृत मान्यता दिलेली नव्हती; तरी त्या पुरुषी क्षेत्रात ती खंबीरपणे उभी राहिली.

आपण हरलो तर MIT पुन्हा कोणा स्त्रीला प्रवेश देणार नाही, हे तिला माहीत होतं. तिथे ती नेटानं शिकली. तिची चिकाटी, बुद्धिमत्ता प्राध्यापकांच्या लक्षात आली. १८७३साली MITतून तिने पदवी शिक्षण पूर्ण केलं. मात्र MIT'ने तिला पदवी दिली नाही. १८७३ ते १८७८ अशी पाच वर्षं तिने MIT'मध्ये विनापद, विनावेतन शिकवलं. त्याच संस्थेतील खनिजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रिचर्डस यांच्याशी १८७५ साली तिचा विवाह झाला. त्यांनी तिला सर्वतोपरीने मदत केली.

स्त्रियांची विज्ञानक्षेत्रात होणारी कुचंबणा लक्षात घेऊन एलनने डॉ. रिचर्ड्स यांच्या आर्थिक पाठिंब्यावर MIT'मध्ये स्त्रियांसाठी प्रयोगशाळा सुरू केली. १८८३ साली MIT'ने स्त्रियांना प्रवेश देणं सुरू केल्यावर त्या वेगळ्या प्रयोगशाळेची गरज उरली नाही. त्याच वर्षी MIT'ने सॅनिटरी केमिस्ट्रीसाठी अमेरिकेतील पहिली प्रयोगशाळा सुरू केली. त्याच प्रयोगशाळेत एलनने 'पाणी परीक्षा' केली. एक नवा अध्याय सुरू केला. मॅसेच्युसेटस आरोग्यखात्याने तिला १८८७-९७ या काळात जलविभागाची तज्ज्ञ म्हणून पद दिलं.

शिक्षणविषयक जागृती करण्यासाठी एलनने व्याख्यानं दिली, लेख लिहिले. गृहविज्ञान, आरोग्य, सांडपाणी व्यवस्था, पोषक आहार, वस्त्र प्रावरणं वगैरे विषयांवर तिने एकूण १७ पुस्तकं लिहिली. स्मिथ कॉलेजने तिला १९१० साली डॉक्टरेट प्रदान करून तिच्या कार्याचा सन्मान केला. शेवटपर्यंत कार्यरत असणाऱ्या एलन स्वॅलो रिचर्डसनं ३० मार्च १९११ रोजी शेवटचा श्वास घेतला.

**-वीणा गवाणकर**
*veena.gavankar@gmail.com*
*(ज्येष्ठ चरित्र-लेखिका)*

# लव्ह स्टोरी

**ही** आहे तुमच्याच काय तर कुणाच्याही घरात घडणारी खरीखुरी 'लव्ह स्टोरी' म्हणजे एकदम हंड्रेड पर्सेंट खरी!

म्हणजे या माझ्या विधानावर तुमचा पटकन विश्वास बसणार नाही.. तुम्ही



धमाल विनोदी गोष्ट

*चित्रं- गिरीश सहस्रबुद्धे*

जसजसे या गोष्टीतून पुढे-पुढे सरकत जाल तसतसे तुम्हांला तुमच्याच घरातले हे (छुपे) प्रियकर आणि प्रेयसी दिसू लागतील. आणि जेव्हा ही गोष्ट तुम्ही वाचून संपवाल त्यावेळी तुम्ही त्या प्रियकराच्या गळ्यात तरी पडाल किंवा त्या प्रेयसीला गुंडाळूनच ठेवाल.. नक्कीच!

ते रोज एकमेकांना तसे लांबूनच पाहायचे. पण खास असं बोलणं कधी झालं नाही त्यांचं. दोघांनाही वाटायचं की एकमेकांशी बोलावं, पण नेमकं त्यावेळी त्याचं तोंड दुसरीकडे असायचं.

कधी कधी ते एकाच तलावात पोहायला जायचे. त्यावेळी तर ते एकमेकांच्या बाजूबाजूने पोहायचे. अंगाला अंग घासतही पोहायचे.

पण त्यावेळी इतकी म्हणजे इतकी गर्दी असायची, की चुकून जरी कुणी बोलायला तोंड उघडलंच तर कुणाचा तरी हात, नाहीतर पायच तोंडात जायचा! त्यामुळे तिथे कुणालाच बोलता यायचं नाही.

कधी ते फिरायला गेले तर लांबूनच चालायचे. त्यामुळे एकमेकांशी बोलणं नाही, तर फक्त एकमेकांकडे बघणं व्हायचं.

गेले वर्षभर तो तिच्याशी बोलण्याची वाट पाहात होता...

आज तो हात ताणून निवांत पडला होता, इतक्यात त्याच्या बाजूला ती येऊन बसली! वाऱ्यावर हात हलवत तो म्हणाला, "व्वा! खूप दिवसांनी भेट झाली गं."

ती इतकी भिजली होती, की तिला पटकन काही बोलताच आलं नाही. त्यावेळी बाजूला लोंबकळणारा खट्याळ रुमाल म्हणाला, "फारच आवडली वाटतं ही साडी तुला? ही तुझ्यासारखी प्युअर कॉटन नाही बरं.."

बॉर्डर झटकत साडी म्हणाली, "मी प्युअर सिल्क आहे म्हटलं! झुळझुळीत आणि सुळसुळीत!!"

इतक्यात मागच्या तारेवरचा टी शर्ट म्हणाला, "झुळझुळीत आणि सुळसुळीत म्हणे? पण वापरून वापरून झाली आहे मुळमुळीत आणि पुळपुळीत! हॉऽऽऽहा."

टी शर्टचं बोलणं ऐकून साडी काळवंडली! तिच्या काठावरचं डिझाइन दुःखाने वाकडंतिकडं झालं. रंग फिकुटले.

संतापून हात उगारत शर्ट म्हणाला, "एऽऽऽ 'एक बटण्या' जरा कॉलर सांभाळून बोल. काही लहान मोठं आहे की नाही? अरे या साडीच्या किमतीत तुझ्यासारखे छपन्न मिळतील!"

हे ऐकून टी शर्ट धुसफुसू लागला.

तेव्हा पाय उडवत पँट म्हणाली, "एऽऽ पुन्हा असं कुणाला बोललास तर तुझा गळाच फाडून टाकीन. या घरातले आपल्याला एकत्रच धुतात, एकत्रच पिळतात आणि सरळ रांगेत वाळत घालतात. आपण सारे सारखेच. नो झगडा.. ओके?"

एक बटण्याने होकार देत कॉलर हलवली तेव्हा कुठे साडीची बॉर्डर खुलली. साडी लाजत लाजत म्हणाली, "मिस्टर शर्ट, तुम्ही मला दहा वर्षांपूर्वी पाहायला हवं होतं. आता त्या वॉशिंग मशीनमधे उलट सुलट गरगरून थोडा रंग उतरलाय माझा. पूर्वी फक्त सणासुदीला मी बाहेर पडायचे. नंतर मग डायरेक्ट लाँड्रीतच जायचे."

"परवा मी तुम्हांला नाटकाला पाहिलं. अगदी व्यवस्थित चापूनचोपून बसला होतात तुम्ही." मिस्टर शर्टनी असं म्हणताच साडी फणकारली, "नाव काढू नका त्या नाटकाचं.."

"काय झालं काय एव्हढं चिडायला?" लेडीज रुमालाने विचारलं.

पदर हलवत साडी बोलू लागली, "त्या दिवशी खूप दिवसांनी मी मिस्टर शर्टना पाहिलं. खरं सांगते, पाहताक्षणीच ते मला आवडले. चकचकीत बटणं,

स्टायलीश कॉलर, बेस्ट मटेरियल आणि माझ्याशी मॅच होणारा परफेक्ट रंग! मी ब्लाउजला म्हणालेच, यांचं नाव 'मिस्टर रुबाबदार' असणार. नाटकाच्या इंटरव्हलमध्ये यांची व्यवस्थित ओळख करून घेऊ, असं मी ठरवलं होतं..''

साडीला थांबवत रुमाल म्हणाला, ''अगं तुझं बोलणं म्हणजे, फॉल वीतभर आणि साडी हातभर. काय झालं ते पटकन सांग. नाहीतर तुझं बोलण संपेपर्यंत मी सुकून जायचो.''

पदरामागून मिस्टर शर्टांकडे पाहात साडी म्हणाली, ''त्या दिवशी इंटरव्हलला मी भाजून निघाले!''

''बापरे! काय केलं काय या शर्टाने तुला?'' असं लेडीज रुमालाने विचारताच शर्टाची बटणं चमकली!

''अं.. .. इंटरव्हल झाल्यावर ती कागदाच्या ग्लासात कॉफी घेऊन आली आणि मिस्टरांच्या बाजूला बसून पिऊ लागली. इतक्यात नाटक सुरू झालं. त्यावेळी नाटकात काय झालं कुणास ठाऊक? ती घाबरून असं काही ओरडली की तिच्या हातातली सगळी गरमागरम कॉफी माझ्या अंगावर सांडली...''

साडीला थांबवत टी शर्ट म्हणाला, ''बरं झालं, गरम कॉफी सांडली..''

हे ऐकताच पँटीने पाय उगारला आणि मिस्टर शर्टाचे हात शिवशिवू लागले.'' बरं झालं कारण.. त्यामुळे तर हिला लगेच आपल्या सोबत धुतलं आणि मिस्टरांच्या बाजूला सुकत टाकलं.'' असं टी शर्टने म्हणताच शर्टाची कॉलर लाजली आणि तिचा रंग बदलला!

पँट म्हणाली, ''ही झाली अर्धी स्टोरी. पण.. खरी लव्ह स्टोरी तर पुढेच आहे आणि ती फक्त मलाच माहीत आहे! ती सांगू की नको, याचा मी विचार करते आहे.''



काकुळतीला येऊन रुमाल म्हणाला, ''लवकर सांग. मी आता सुकत आलोय. एकदा का आपल्याला या तारेवरून खेचलं की पुन्हा बाजूबाजूला कधी येऊ कुणास ठाऊक? कपड्यांचे योगायोग काही शिवता येत नाहीत, ते त्यांच्या धाग्यातच असावे लागतात, असं आपल्यात म्हणतात ते काही उगीच नाही. चल सांग..''

पँट सांगू लागली, ''कॉफी सांडली तेव्हा माझं लक्ष नव्हतं. पण इतक्यात मिस्टर शर्टांची चुळबुळ वाढली! माझ्यात खोचलेला शर्ट उसळी मारून बाहेर येऊ लागला. शर्टाचा हात जोरात हलला आणि साडीवर मिस्टरांच्या हातातलं कोल्डड्रिंक सांडलं. मी चाटच पडले! इतक्यात मिस्टर शर्ट मला हळूच म्हणाले, ''अगं, मिसेसच्या अंगावर गरम कॉफी सांडली.. भाजलं असेल गं साडीला. म्हणून मग केली चुळबुळ. पण आता थंडगार शिडकावा झाल्यावर बरं वाटेल तिला!''

आता मला सांगा, आहे की नाही ही खरी लव्ह स्टोरी?''

''खरी लव्ह स्टोरी तर पुढेच आहे,'' रुमाल सांगू लागला, ''या सांडासांडीनंतर त्यांनी मला बाहेर काढलं. आणि पाहतो तर काऽऽय.. हाडामांसांचे मिस्टर आणि मिसेस एकमेकांशी भांडताहेत. आणि आपले मिस्टर कॉटन आणि मिसेस सिल्कम एकमेकांकडे लाजून बघताहेत! सांगा बरं आता.. ही खरी लव्ह स्टोरी कुणाची?''

हे ऐकताच सगळे सुके कपडे आनंदाने जोरजोरात फडफडले.

**–राजीव तांबे**
*rajcopper@gmail.com*
*(प्रसिद्ध बालसाहित्यिक)*

# शब्दखेळ

**दिवाळीत मज्जा करणार ना?**
**मग दिवाळीशी संबंधित हे शब्द**
**ओळखून दाखवा पाहू.**

१) एका राक्षसाचं, पाच अक्षरी नाव दिवाळीशी जोडलं गेलंय; त्या पाच अक्षरांपैकी,
-पहिली दोन अक्षरे म्हणजे 'पुरुष' असा अर्थ होतो,
-तिसरे आणि नंतर दुसरे ही दोन अक्षरे घेतली तर वाहनासाठी असलेला इंग्रजी शब्द येतो.
- तिसरे व पाचवे ही दोन अक्षरे घेतली तरीही पुन्हा वाहनासाठी असलेला इंग्रजी शब्दच येतो.
-चौथे आणि तिसरे ही अक्षरे घेतली तर 'वाळलेला' असा अर्थ होतो.
मग सांगा पाहू हा राक्षस कोणता?

२) दिवाळीच्या एका दिवशी ही पूजा करतात. शब्दामध्ये पाच अक्षरे आहेत.
-पहिली दोन अक्षरे घेतली तर एका देवीचे नाव होते,
-पहिले व तिसरे अशी दोन अक्षरे घेतली तर 'दडून बसू या' असा अर्थ होतो,
-चौथे व पाचवे या दोन अक्षरांतून 'लोक' असा अर्थ निघतो,
सांगा पाहू या दिवशी काय करतो आपण.

३) दिवाळीच्या एका दिवसाचे नाव हे आहे. शब्दात चार अक्षरे आहेत.
-पहिली दोन अक्षरे घेतली तर 'भावंड (पुरुष)' असा अर्थ होतो,
-तिसरे व चौथे अक्षर घेतले तर 'बी-बियाणे' असा अर्थ होतो,
काय साजरे करत असू बरे आपण या दिवशी?

४) फराळात आपण हा पदार्थ करतो. पाच अक्षरी शब्द आहे.
-पहिली तीन अक्षरे म्हणजे एका मोठ्या देवाचं नाव आहे,
-दुसरे व तिसरे अक्षर घेतले तर हात असा अर्थ होतो,
-चौथे व तिसरे या क्रमाने ही दोन अक्षरे घेतली तर झाडाभोवतालचा दगडी ओटा असा अर्थ होतो,
-दुसरे व पाचवे अशी दोन अक्षरे घेतली तर समजेल असा अर्थ होतो, कळला का हा पदार्थ कोणता ते? आवडतो का तो तुम्हांला?

५) दिवाळीतला हा दिवस अत्यंत उत्तम दिवस मानला जातो, यात तीन अक्षरे आहेत;
-पहिले व तिसरे अशी दोन अक्षरे एका वाद्याचे नाव सांगतात,
-पहिले व दुसरे अक्षर 'खाली टाक' अशी आज्ञा करणारा शब्द देतात,
कोणता बरं हा दिवस?

उत्तर- १) नरकासुर २) लक्ष्मीपूजन ३) भाऊबीज ४) शंकरपाळी ५) पाडवा

**- प्रतिभा गोपुजकर**
*gopujkars@hotmail.com*



# डासांची फॅक्टरी

**सिंगापूरच्या** ब्रॅडेल भागातले बहुसंख्य नागरिक तिथे जमा झाले होते. प्रत्येकाची उत्सुकता ताणली गेली होती. आज एका अनोख्या फॅक्टरीतल्या पहिल्या उत्पादनाचं वितरण होणार होतं.

वेळेवर समारंभाला सुरुवात झाली. त्या फॅक्टरीचे मुख्याधिकारी मंचावर आले. त्यांच्या हातात एक मोठा डबा होता. एक, दोन, तीन म्हणत त्यांनी त्या डब्याचं झाकण उघडलं. त्यातून काळ्या रंगाचे छोटे छोटे तुकडे आकाशात उडाले. मंचावरच्या उच्चपदस्थांनी टाळ्या वाजवल्या. इतरांनीही त्यांचं अनुकरण करायला सुरुवात केली. पण सर्वांच्याच चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह होतं. हेच का ते गाजावाजा केलेलं उत्पादन? आहे तरी काय ते? आणि त्याचा आपल्याला काय फायदा?

जमलेल्या सर्वांच्या मनातले हे प्रश्न ओळखून त्यांची उत्तरं देण्यासाठी मुख्याधिकारी सरसावले. "हे आता आसमंतात उडाले, पसरले, ते आहेत डास. 'एडिस इजिप्ती' या जातीचे डास. हेच आपल्यामध्ये डेंग्यू, झिका, चिकनगुनिया वगैरे रोगांचा प्रसार करायला कारणीभूत ठरतात. तसं पाहिलं तर सिंगापूर हे अतिशय स्वच्छ शहर. कुठंही केरकचरा, सांडपाणी उघड्यावर दिसणार नाही. तरीही दरवर्षी डेंग्यू रोगाची साथ येऊ लागली आहे. वेगानं पसरू लागली आहे..."

तिथे जमलेले सगळेजण कान देऊन ऐकू लागले. त्या मुख्य अधिकाऱ्याने त्यांची योजना समजावून सांगितली- या रोगाला कारणीभूत असणाऱ्या रोगजंतूंचा प्रसार डासांमार्फत होत असल्याचं वैज्ञानिकांनी शोधून काढलं होतं. कारण या रोगजंतूंच्या जीवनचक्रापैकी काही भाग डासांच्या शरीरातच पूर्ण होतो. असे डास मग माणसाचा चावा घेतात, तेव्हा त्यांच्या शरीरातले अर्धविकसित रोगजंतू माणसाच्या रक्तात शिरतात. तिथे त्यांच्या जीवनाचा पुढला टप्पा पार पडतो. रोगाला बस्तान बसवणं शक्य होतं. मलेरियासारखाच या रोगाचा प्रसार डासांमार्फत होतो. त्यामुळे या डासांना आळा घालण्याचं अभियान चालवलं जातं. ते दरवर्षी नव्याने राबवावं लागतं. त्या डासांचा कायमचा बंदोबस्त नाही का करता येणार, असा प्रश्न वैज्ञानिकांना छळत होता.

मलेरियाचा प्रसारही डासांमार्फतच होतो. म्हणूनच १९५०च्या दशकात त्यांना नेस्तनाबूत

## रोगांचा प्रसार करणाऱ्या डासांचे काय करावे, हा प्रश्न जगभरातील वैज्ञानिकांना छळत होता. त्यातून सापडला एक नवीन उपाय– रोगप्रसार रोखणारे नवे चांगले डास निर्माण करायचे. या डासांचं उत्पादन करण्यासाठी फॅक्टरी स्थापन करायची.

करण्यासाठी डीडीटी या जंतुनाशकाचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात आला होता. काही काळ त्याचा चांगलाच परिणामही दिसून आला. पण कालांतराने दोन समस्या निर्माण झाल्या. पहिली म्हणजे या रसायनाला दाद न देणाऱ्या डासांच्या प्रजाती उदयाला आल्या. त्यामुळे डीडीटीचा फवारा निरुपयोगी ठरू लागला. शिवाय या विषारी रसायनाचे अंश इतर आसमंतातल्या वनस्पतींमध्ये आणि पाण्यामध्ये राहिल्यामुळे आपलं अन्नपाणी दूषित होऊ लागलं. त्यानंतर डीडीटीचा वापर करणं जवळजवळ बंदच झालं. डासांची मूळ समस्या मात्र तशीच राहिली.

मलेरिया पसरवणारे डास 'एनॉफिलस' या जातीचे असतात. 'एडिस इजिप्ती' ही एक दुसरी प्रजाती डेंग्यू, झिका, चिकनगुनिया वगैरे रोगांचा प्रसार करते. त्यांची वाढ तुलनेनं स्वच्छ पाण्यातही होऊ शकते. शिवाय हे सहसा दिवसाउजेडीच घोंघावतात व चावा घेतात. त्यातून मग डेंग्यू वगैरे रोगांच्या विषाणूंचा शिरकाव माणसाच्या शरीरात होतो.

तुम्हांला माहीत आहे ना, आपल्याला चावते ती डासी! सहसा मादी डासच माणसाचा चावा घेतात; नर डास नाही.

सिंगापूरमध्ये वर्षभर पाऊस पडतो. त्या पाण्याचा निचरा करण्याचे अनोखे उपाय शोधले गेले असले तरी घराच्या वळचणीला, कुंड्यांमध्ये, बादल्यांमध्ये काही प्रमाणात जे पाणी साचून राहतं, त्यामध्ये या डासांच्या अळ्या सुखेनैव नांदू शकतात. त्यापायीच या डासांची पैदास तिथे मोठ्या प्रमाणावर होते.

याच 'एडिस इजिप्ती' डासांचं उत्पादन आम्ही या नव्या अनोख्या फॅक्टरीत करतो! तुम्हांला प्रश्न पडला असेल की, या डासांचं उत्पादन करण्यासाठी फॅक्टरी स्थापन करण्याचा खटाटोप करायचाच कशाला?

सांगतो. हे फॅक्टरीमधून तयार केलेले डास 'एडिस इजिप्ती' या जातीचेच असले तरी हे वेगळे आहेत. त्यांच्यावर खास प्रक्रिया केलेली आहे. ते रोग-प्रसार करणार नाहीत, तर उलट त्या प्रसाराला



आळाच घालतील. तो कसा, हे समजून घ्यायला हवं. मलेरियाचा प्रसार ज्या 'एनॉफिलस' जातीच्या डासांकडून होतो, ते सहसा संध्याकाळी किंवा रात्रीच चावतात. त्यांच्या वाढीसाठी गढूळ पाण्याची गरज असते. पण एडिस इजिप्ती डास स्वच्छ पाण्यातही आपली वाढ करू शकतात. दिवसाउजेडीच ते आपला प्रताप गाजवतात. त्यांच्या बंदोबस्तासाठी वेगळीच शक्कल लढवणं आवश्यक होतं.

त्याविषयी संशोधन करत असताना असं दिसून आलं की, या डासांना जर 'वॉलबाकिया' या जीवाणूचा संसर्ग झाला तर ते वांझ होतात. त्यांची प्रजननक्षमता संपुष्टात येते. अशा जीवाणूग्रस्त नर डासांचं जर मादीशी मीलन झालं तर त्यातून ती मादी अंडी घालते. पण ती उबत नाहीत. त्यातून अळ्यांचा जन्म होत नाही. त्यामुळे अर्थातच पुढच्या पिढीच्या डासांचा जन्मच होत नाही. साहजिकच रोगांचा प्रसार करू शकणाऱ्या डासांच्या संख्येत घट होते. रोगप्रसाराला आळा बसू शकतो. एका फटक्यात हे होणार नाही. आता समजा असे वॉलबाकिया ग्रस्त नर डास जर मोठ्या प्रमाणात वातावरणात राहिले तर त्यांच्याशीच माद्यांचा संबंध येण्याची शक्यता वाढते. आणि रोगजंतूमुक्त नर डासांशी संपर्क होण्याची शक्यता कमी होते. त्यामुळे डासांचा जन्मदर घटतो. काही काळानंतर ज्यांच्या शरीरात वॉलबाकिया जीवाणूने आपलं बस्तान बसवलेलं आहे, असे डासच उरतात. जीवाणूमुक्त नैसर्गिक डासांची हकालपट्टी होते.

या डासांच्या आणखी एका वैशिष्ट्याचाही उपयोग होतो. सहसा मादी डासच माणसाचा चावा घेतात. नर डास चावा घेत नाहीत. तेव्हा मोठ्या प्रमाणात नर डास जरी वातावरणात पसरले तरी त्यांच्यापासून माणसाला धोका नसतो. मादी डासांनी चावा घेतला तरी त्यांच्या शरीरात रोगजंतू नसतील तर रोगप्रसाराला आळा घातला जातो. या माद्यांच्या



शरीरात वॉलबाकिया असले तरी त्याची फिकीर नाही. कारण हे जीवाणू फक्त डासांवरच अनिष्ट परिणाम करतात. माणसांना त्यांच्यापासून अजिबात धोका नसतो.

पण आपण परत परत अशा वॉलबाकियाग्रस्त डासांची फवारणी करत राहिलो, त्यांना हवेत पसरवत राहिलो तर कालांतराने रोग असलेल्या डासांची संख्या चांगलीच कमी होईल. म्हणजे आसपास डास दिसतील, पण ते निरुपद्रवी असतील. म्हणूनच तर अशा वॉलबाकिया-ग्रस्त डासांचं उत्पादन आपण या अनोख्या फॅक्टरीत करत आहोत.

हे नेमकं कसं केलं जातं याची कहाणीही मनोरंजक आहे. तसंच ते खूप कौशल्याचं काम आहे. पहिली पायरी मोठ्या प्रमाणावर वॉलबाकिया ग्रस्त डासांचं उत्पादन करण्याची. त्यासाठी 'एडिस इजिप्ती' या डासांची पैदास केली जाते. त्यानंतर त्यांना वॉलबाकियाचा संसर्ग होण्यासाठी मोठमोठ्या विशिष्ट आकाराच्या काचपात्रांमध्ये ठेवलं जातं. त्या जीवाणूंचा संसर्ग झाला आहे, याची खातरजमा झाली की त्यांचं मीलन धट्ट्याकट्ट्या माद्यांशी घडवून आणलं जातं. त्यातून त्या माद्या अंडी घालतात.

या वाक्याच्या शेवटी जो पूर्णविराम आहे, त्या आकाराची काळ्या रंगाची अंडी विशेष प्रकारच्या कागदावर गोळा केली जातात. त्यांच्यापासून डासांना जन्माला घालण्याची वेळ येईपर्यंत ती बाजूला ठेवली जातात. त्याला 'एग बँक' म्हणतात. अशा एग बँकेत एका वेळी तब्बल साडेतीन ते चार कोटी अंडी जय्यत तयारीत ठेवलेली असतात.

वेळ आली, की ही अंडी स्वच्छ पाण्यात सोडली जातात. अवघ्या अर्ध्या तासातच त्यांच्यामधून लार्वे बाहेर पडतात. ही डासांच्या जीवनचक्रातली पुढची पायरी. मोजणीचं यंत्र वापरून या लार्वेंची संख्या मोजली जाते. एका ट्रेमध्ये हे लार्वे ठेवून त्यांना माशांपासून मिळालेल्या अन्नाचा खुराक दिला जातो. त्यावर धष्टपुष्ट होत ते पुढच्या पायरीवरच्या प्युपांना जन्म देतात. त्यातील नर वेगळे काढले जातात. माद्या नष्ट केल्या जातात. तरीही काही चुकार बिलंदर माद्या उरल्याच असतील तर त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी त्या प्युप्यांना क्ष किरणांच्या एका सौम्य झोतामधून फिरवून आणतात. नर प्युप्यांचं कसलंही नुकसान होणार नाही, एवढीच त्या क्ष किरणांची मात्रा ठेवली जाते. अशी प्रक्रिया केलेले वॉलबाकिया-ग्रस्त प्युपे काचेच्या नळ्यांमध्ये ठेवले जातात. त्या नळ्यांमध्येच त्यांची वाढ होऊन त्यांचं प्रौढ डासांमध्ये रूपांतर होतं. अशा नळ्या जिथे त्या डासांना हवेत सोडायचं आहे, तिथे आणून उघडल्या जातात. ते डास आपल्यावर सोपवलेली कामगिरी करायला सज्ज होतात.



**जगभरात अनेक ठिकाणी आता अशा डासांचं उत्पादन करण्यासाठी 'फॅक्टऱ्या' सुरू झाल्या आहेत. भविष्यात शास्त्रज्ञांच्या या उपायामुळे डासांपासून होणारे आजार कमी होतील.**

पण ते खरोखरीच आपली कामगिरी इमानेइतबारे पार पाडतात की नाही याची खातरजमा करून घेणं आवश्यक होतं. नाहीतर रोगापेक्षा उपाय भयंकर अशी अवस्था व्हायची. त्यासाठी प्रथम प्रयोगशाळेत त्याची चाचणी घेतली गेली. तीन वेगवेगळी काचपात्रं घेतली गेली. एकामध्ये निसर्गात असतात तशी नरमाद्यांची मिश्र वसाहत तयार केली गेली. दुसऱ्या पात्रात त्यांच्याबरोबर कारखान्यातल्या नर डासांचा समावेश केला गेला. तिसऱ्या भांड्यात फक्त कारखान्यातलेच नर डास आणि निसर्गातल्या धडधाकट माद्या ठेवल्या गेल्या. त्या तिन्ही भांड्यांमधल्या नव्याने जन्माला आलेल्या डासांची संख्या मोजली गेली. त्यातून दुसऱ्या भांड्यात ती लक्षणीयरीत्या कमी झालेली आणि तिसऱ्यात तर जवळजवळ शून्य असल्याचं दिसून आलं.

त्यानंतर प्रत्यक्ष विभागांमध्ये चाचण्या घेतल्या गेल्या आणि तिथे डासांची संख्या न मोजता डेंग्यूची लागण किती झाली आहे, याचं प्रमाण पाहिलं गेलं. या सर्व चाचण्यांमधून उत्तीर्ण झाल्यानंतर आता ही फॅक्टरी डेंग्यूच्या प्रसाराला व्यापक प्रमाणावर अटकाव करण्यासाठी सज्ज झाली आहे. इतर देशांकडूनही या फॅक्टरीच्या उत्पादनाला मागणी येऊ लागली आहे.

अशी डासांची फॅक्टरी आपल्याकडेही स्थापन करावी, असं नाही का वाटत!

**-डॉ. बाळ फोंडके**
*dr. balphondke@gmail.com*
*(ज्येष्ठ वैज्ञानिक व विज्ञान लेखक)*

# तेज!

**विश्वंभटांकडे विस्तव मागायला गेलेल्या लहानग्या रमालासुद्धा त्यांच्या तापटपणाचा अनुभव आलाच. पण तिने तिच्या बुद्धीच्या तेजाने त्यांना दिपवून टाकलं...**

**फार** फार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एवढी जुनी की तेव्हा काडेपेटी, लायटर यातलं काहीच नव्हतं. त्यामुळे घरातले लोक एक-दोन निखारे सतत जपून ठेवत असत. घराला कुलूप लावून सर्वांनी बाहेर जाण्याची वेळ संपूर्ण आयुष्यात एखाद वेळेस येत असे. त्या काळातली ही गोष्ट!

अंबा नदीच्या काठावर अवघं वीस-पंचवीस घरांचं एक गाव वसलं होतं. एकमेकांना सोबत मिळावी म्हणून असेल कदाचित, पण ही घरं खूप जवळ जवळ होती. शेतीवाडी घरापासून दूर! गाव अगदीच चिमुकलं असल्याने सगळे एकमेकांना नीट ओळखत होते. सगळ्यांचे स्वभाव आणि विचार वेगळे असले तरी एकमेकांना मदत करायला सगळेच तत्पर होते.

याच गावात रमा नावाची एक चिमुरडी राहात होती. रमाच्या चुलत आजोबांच्या घरी लग्नकार्य निघालं. रमाचं संपूर्ण घर या लग्नाला जाणार होतं. घरातली आवराआवर झाली. गाईगुरांची जबाबदारी शेजाऱ्यांनी घेतली. तेव्हा प्रवास फक्त बैलगाडीतून केला जायचा. त्यामुळे मुक्कामी पोहोचायला आणि यायला मिळून सात-आठ दिवस लागणार होते. सात -आठ दिवस लग्नकार्य होतं. रमाचं कुटुंब पंधरा दिवस गावात नव्हतं.  पंधरा दिवसांनी ते आले तेव्हा अर्थातच घरात अग्नी नव्हता.

छोट्या रमाला आईने 'विस्तव घेऊन ये' म्हणून सांगितलं. 'विश्वंभटांकडे जाऊ नकोस', अशी स्पष्ट सूचना दिली. विश्वंभट प्रचंड विद्वान! पण वागायला, बोलायला विक्षिप्त होते. काय बोलतील, याचा नेम नाही. त्यांच्या चेहऱ्यावर हास्य तर या गावाने कधीही पाहिलं नव्हतं. गावातले सर्वच जण त्यांच्यापासून चार हात लांब राहात असत.

पण जाऊ नकोस म्हटल्यावर सगळी लहान मुलं जे करतात, तेच रमाने केलं. ती थेट विश्वंभटांकडे पोहोचली. अतिशय स्वच्छ आणि टापटीप अशा या घरात ते एकटेच राहतात, हे सांगूनही खरं वाटलं नसतं. रमा माजघरात गेली. तिथे पुस्तकांची कपाटं होती. त्यात जाडजूड ग्रंथ होते. गोष्टीची पुस्तकंही होती. तिथेच खाली लेखनाचं टेबल आणि लेखनसामग्री होती. विश्वंभट पूर्ण एकाग्रतेने काहीतरी लिहीत होते. घरात एक प्रसन्न शांतता होती. रमाच्या पावलांच्या आवाजामुळे विश्वंभटांनी



चित्र- अदिती पाध्ये-देसाई

वर पाहिलं. मग खुणेनेच, “काय आहे?” असं विचारलं.

“ही सगळी पुस्तकं.. तुम्ही वाचली आहेत?” हा रमाचा भाबडा प्रश्न ऐकून विश्वभटांनी, “छे,छे! शोभेला मांडून ठेवली आहेत!” असं खोचक उत्तर दिलं.

“बरं, आता काय हवं ते पटकन सांग.” असं ते खेकसले.

रमाने, तिला अग्नी हवा आहे, असं सांगितलं. ते पुन्हा उसळले, “तुझ्या घरच्यांना काही अक्कल आहे का? अग्नी आणायला एवढ्याशा चिमुरडीला पाठवतात का?” थोडी उसंत घेऊन ते पुन्हा कडाडले, “तू भांडं-तवा काही आणलेलं दिसत नाही.”

रमा चटकन म्हणाली, “कशाला? मी ओंजळीत माती घेते, त्यावर तुम्ही निखारा ठेवा. म्हणजे माझा हात भाजणार नाही.” रमाचं उत्तर ऐकून विश्वंभटांना तिच्या बुद्धीचं, हजरजबाबीपणाचं आणि निडर वृत्तीचं कौतुक वाटलं. अख्ख्या गावाने बघितलं नव्हतं ते विश्वंभटांच्या चेहऱ्यावरचं हसू रमाने पाहिलं.

“छान, छान! हुशार आहेस हो! स्वतःच्या बुद्धीवर असाच विश्वास ठेव आणि आपली मतं मांडत राहा. तुला पुस्तकं वाचायला आवडत असतील, तर घेऊन जा वाचायला. पण व्यवस्थित परत करायची बरं का?” असं म्हणत, त्यांनी रमाच्या ओंजळभर मातीवर एक रसरशीत निखारा ठेवला. रमा तिच्या घरी सुखरूप पोहोचेपर्यंत विश्वंभर तेजस्वी बुद्धीच्या रमाकडे कौतुकाने पाहात होते.


**-कांचन जोशी**

*kanchanpjoshi76@gmail.com*

*(संस्कृत अभ्यासक)*



# Hide & Seek

Illustrated by Mahimkar Sisters

Some objects are playing hide & seek besides, can you find them all?



**3** Diya



**3** Ladoo



**4** Anaar



**3** Chakli



**3** Kaaju Katli



**4** Karanji

***BONUS!*** *Some of these objects are hidden in the coverpage! Did you spot them?*

गोष्ट

# विली, प्रिन्स आणि मी!

**एरव्ही** झाडंझुडपं वाढल्याने पार पडिक म्हणून इतिहासातच गडप झालं असतं हे ॲनिक् रेल्वेस्टेशन. पण कल्पक इंग्रज साहेबानं हे स्टेशनच न्यू कॅसलचं आकर्षण-केंद्र केलं. कुठल्या भन्नाट डोक्यातून ही कल्पना आली असेल कुणास ठाऊक! या आडगावाच्या जुनाट स्टेशनाला चक्क पुस्तकालयाचं रूप दिलंय. इथे पुस्तकांची देवघेव करावी, वाचत बसावं. अत्यंत देखणं. कधीही



**लंडनजवळील न्यू कॅसल या नगरीशेजारील ॲनिक् रेल्वेस्टेशनात घडलेली ही गोष्ट. सत्य आणि कल्पना यांचा सुरेख संगम असलेली...**

कुठलीही गाडी त्या स्टेशनात येत नाही. केवळ पुस्तकांच्या सोबतीने आनंदनगरीत पोहोचायचं- 'बार्टर बुक शॉप' नावाच्या!

मुख्य दालनात पाहिलं तर वाचनवेडी डोकी होतीच, पण इतर दालनांत विविधरंगी फुलांच्या कुंड्या ठेवून त्यावर पुस्तकांची झाडांसारखी रचना होती. कळावं, कुठल्या प्रकारची पुस्तकं या दालनात आहेत ते!

तिथे बसलेल्या दहा-बारा वर्षांच्या एका मुलानं माझं लक्ष वेधलं. सहज विचारलं, 'नाव काय रे?' 'विली'. अन् लगेच त्यानं पुस्तकात मन घातलंही. त्याच्याजवळ एक गोंडस कुत्रा होता. गंमत म्हणजे विली मधूनच त्यालाही चार ओळी वाचून दाखवल्यासारखं करी, नि ते श्वान 'छान! छान!' असं शेपटी हलवीत म्हणत असावं, असं वाटे. खूप वेळ हे असं सुरू होतं.

हा विली थोडासा रागावला तरी चालेल या तयारीनं मी विलीला विचारलं, "अरे, या कुत्र्याला काय कळणार तुझी गोष्ट?" विली अपेक्षेप्रमाणे काहीशा घुश्शात म्हणाला, "त्याचं नाव 'प्रिन्स' आहे, प्रिन्स!" नि विलीने प्रिन्सला इतक्या मायेनं कुरवाळलं की, शेपटीच्या भाषेनं तो 'थँक्स' म्हणतोय असा भास मला झाला.

न्यू कॅसलच्या मुक्कामात 'बार्टर बुक शॉप'मध्ये जायचं मला वेड लागलं. दरम्यान तिथल्या अनेक ग्रंथपालांपैकी मिस्टर बेल हे माझे इतके दोस्त झाले की, ग्रंथालयाची आतली कवाडं त्यांनी माझ्यासाठी उघडली. तिथं गोष्टी वाचत बसलेली अनेक मुलं होती. पण विली मात्र इंद्रधनुष्यी रंगात रंगलेल्या विस्तीर्ण मैदानावरील बाकावर, प्रिन्सला गोष्टी वाचून दाखवत बसलेला असे.

आजची गोष्ट विनोदी असावी बहुधा. आता माझ्याशी बऱ्यापैकी रुळलेल्या विलीनं अगदी अभावितपणे मला सांगितलं, "प्रिन्स पण कसा खदखदून हसतोय बघा!"

मी विलीच्या डोळ्यांनी पाहिलं... अरेच्चा, प्रिन्स चक्क हसतोय हे जाणवलं नि मलाच हसू आलं.

दुसऱ्याच मिनिटाला आश्चर्यकारक घटनेने मी, विली नि प्रिन्सच्या मागोमाग संमोहित झाल्याप्रमाणे जाऊ लागलो. हातातलं ते पुस्तक वाचून पूर्ण झालं असावं. विली पुन्हा मुलांसाठीच्या पुस्तकांच्या रॅककडे निघाला नि बरोबर हे प्रिन्स महाशय-शेपटी झुलवीत! विलीने चक्क प्रिन्सला विचारलं- 'आता कुठलं वाचायचं मित्रा? धम्माल विनोदी गोष्टी वाचून झाल्या. आता एखादी अफलातून रहस्यकथा?'

मनातल्या मनात मी हादरलोच. गारव्यात घाम फुटणं शक्य नव्हतं; नाहीतर तोही फुटला असता. कारण 'हो, रहस्यकथा चालेल' असं चटकन प्रिन्सच माणसाप्रमाणे बोलला तर काय घ्या, इतका हा खराखुरा संवाद! नशिबाने तसं घडलं नाही, पण प्रिन्सने शेपटी वेगाने हलवतच होकार दिला.

दरम्यान, आलेल्या प्रत्येक पुस्तकप्रेमीशी जुन्या दोस्ताप्रमाणे दिलखुलास बोलणारे मिस्टर बेल मला इथल्या बुद्धिमान नि कार्यतत्पर श्वानांविषयी अनेक गमती सांगू लागले. आपल्या मालकाला त्याचं आदल्या दिवशीचं पुस्तक सापडलं नाही, तर त्यांचा गोजिरवाणा श्वानुकला कसा नेमकं पुस्तक आणून देतो, हेही सांगायला मिस्टर बेल विसरले नाहीत.

पुढचे चार-पाच दिवस मी उरलेलं लंडन फिरलो. आता भारतात परतण्यापूर्वी शेवटचं एकदा प्रिन्स नि विलीला भेटावं म्हणून 'बार्टर बुक'मध्ये गेलो. पण नेहमीच्या ठिकाणी विली नव्हता; प्रिन्सही! जवळच्या व्यक्तीला अधिरतेने शोधावं, त्याच मायेने मी सारं ग्रंथालय धुंडाळलं. खास लहानग्यांसाठी केलेली वाचनाची फुलबागही धुंडाळली. विली तर नाहीच; पण प्रिन्स? तोही नाही. परतताना चुटपूट असणार

होती. नि ते माझं चुटपुटणं, अस्वस्थ होणं माझ्याशिवाय कुणाला कळणार नव्हतं.

तेवढ्यात अगदी अनपेक्षितपणे-

“हॅलो मिस्टर डॅव्हे!”

माझ्या आडनावाला आणखी एक फुटबॉल मारून उसळत्या हास्याचे निळे-हिरवे डोळे मिस्टर बेल यांच्या रूपात उभे होते. एव्हाना मला माझ्या आडनावाच्या जवळजवळ ४०-४२ तरी वेगवेगळ्या प्रकारच्या उच्चारांची सवय झाली होती.




*चित्रं- अदिती पाध्ये-देसाई*

माझे दोन्ही खांदे गदागदा हलवून, खूप जुन्या मित्रासारखे मिस्टर बेल म्हणाले, “आज तुम्ही नेहमीसारखे चिअरफुल, हॅपी दिसत नाही आहात, नि आलातही चार दिवसांनी. का एवढे रेस्टलेस?”

माझी अस्वस्थता सातासमुद्रापारच्या मिस्टर बेल साहेबांनी अचूक ओळखली होती. मी खरं काय ते सांगितलं. ते क्षणभर गप्प झाले. प्रिन्स नि विलीच्या पुस्तकानं जोडलेल्या नात्यात मी गुंतलो होतो, हे पाहून मिस्टर बेल थोडे हळवे झाले. माझा हात धरून ते अतिप्रेमाने मला पुस्तकालयातील कॉफी शॉपमध्ये घेऊन गेले. आता ते काय सांगतात, याचीच उत्सुकता होती-

“मिस्टर डॅव्हे, विली एक गोड छोकरा. पुस्तकवेडानं त्याचं आयुष्य आनंदी केलंय. सकाळी शाळेत जाऊन नंतर एका फूडमॉलमध्ये काम करून तो इथे वाचनासाठी रोज येतो. त्याचे आई-वडील दोघेही कष्टाळू आहेत. इथली बहुतेक मुलं काम करूनच शिकतात. पण सध्या विली आजारी आहे चार दिवस. आई-वडील कामावरून येईपर्यंत त्याला सोबत फक्त त्याच्या पुस्तकांची!”

“पण मग आता चार-पाच दिवस पुस्तकं कशी मिळणार त्याला?”

तेवढ्यात, मौजेने गुणगुणत चालत यावं तसा, इतर श्वान मित्र-मैत्रिणींना शेपटाने हाय, हॅलो करीत, ‘प्रिन्स’ येताना दिसला. मिस्टर बेल खांदे उडवत हिरवट, निळसर डोळ्यांनीच हसले.

“चार-पाच दिवस ही त्याची कुरिअर सर्व्हिस... प्रिन्स कुरिअर....”

प्रिन्सच्या गळ्यातली छोटी पिशवी काढत त्यातलं पुस्तकं काढून ते दाखवत मिस्टर बेल म्हणाले, “दर दोन दिवसांनी नवं पुस्तक बदलून घ्यायला प्रिन्स हजर. आत कागदावर लिहिलेलं असतं. हे बघा. आता कुठल्या लेखकाचं, कशा प्रकारचं हवं ते... आमची सेविका ते पुस्तक काढून प्रिन्सच्या बॅगेत ठेवणार नि अगदी घरपोच होणार...!”

हे सारं नवं होतं...

प्रिन्सची नि माझीही अगदी गट्टी नाही, पण

आता बऱ्यापैकी मैत्री झाली होती. त्याच्या शेपटीचा हलण्याचा वेग, तो हसतो आहे, हॅलो करत आहे, हे सांगण्यास पुरेसा होता.

क्षणभर मीच विली झालो! प्रिन्सला मायेनं जवळ घेतलं. तोवर विलीला हवं ते पुस्तक बॅगेत सज्ज होतं. अभावितपणे मी प्रिन्सला म्हटलं, "विलीला सांग हं, मी उद्या 'इंडिया'त परत जातोय. तूही ओळख ठेव मित्रा!" प्रिन्सने जणू शेपटी हलवत 'बाय' करीत निरोप घेतला.

मिस्टर बेल माझ्याजवळ आले. कॉफीचा नवा मग हातात देत म्हणाले, "मिस्टर डॅव् तुम्हांलाही प्रिन्सची भाषा कळू लागली तर...! अहो, तुम्ही त्याच्याशी चक्क बोलत होतात!"

माझ्या पापणीवर टचकन् अश्रू जमा झाले.

आता या घटनेलाही तीन वर्षं झाली आहेत, पण त्या जगावेगळ्या सुंदर ॲनिक् स्टेशनाची, विली व प्रिन्सची आठवण सतत सोबत करतेय.

**-प्रवीण दवणे**
*dilkhulass@rediffmail.com*
*(ज्येष्ठ साहित्यिक)*

# रांगोळी

**रांगोळी** हा सजावटीचा साधा-सोपा प्रकार. आदिवासींपासून आधुनिक माणसांपर्यंत सर्वजण, सर्वत्र रांगोळी ही कला वापरतात. महाराष्ट्रात 'रांगोळी', गुजराथेत 'साथिया', राजस्थान आणि मध्य प्रदेशात 'मांडणा', तामिळनाडूमध्ये 'कोलम', आंध्रात 'मुग्गुल', कर्नाटकात 'रंगावली' आणि केरळमध्ये 'पूविडल, पूकोलम'. नावे आणि डिझाइन विविध, पण जमिनीवर कलाकृती साकारण्याची हौस तीच! आजही आपण दिवाळीत रांगोळी रेखतो. पण एरवीही रांगोळीचे डिझाइन आपल्याला अनेक ठिकाणी दिसते. जरा आठवून बघा, कुठे कुठे आपल्याला 'रांगोळी'चे डिझाइन दिसते? यादी कराल?

**(संदर्भ- रांगोळी पुस्तक- डॉ. नयना तडवळकर)**





लेख

दोन वेगवेगळ्या जातीच्या प्राण्यांची खास दोस्ती होऊ शकते का? म्हणजे वाघाची बकरीशी, हत्तीची कुत्र्याशी मैत्री असू शकते?

# आंतरजातीय मैत्री



*सुरिया या ओरांगउटानचं रोस्को या शिकारी कुत्र्याशी असलेलं सख्य*

**माणसं** आपापसात मैत्री करतात. ती आयुष्यभर निभावतात. पण प्राण्यांमध्ये असं होतं का?- हो, प्राण्यांच्या काही काही जातींमध्ये असं होतं. घोडे, कुत्री, वटवाघळे, गायी, डॉल्फिन्स, हत्ती असे काही प्राणी आयुष्यभर टिकणारी मैत्री करतात. पण असा दोस्ताना सहसा एकाच जातीच्या प्राण्यांमध्ये असतो. दोन वेगवेगळ्या जातीच्या प्राण्यांची दोस्ती होऊ शकते का?

पाळीव प्राण्यांमध्ये अशी दोस्ती होऊ शकते. घरातली कुत्री आणि मांजरं एकमेकांची दोस्त झालेली अनेकांनी पाहिली असतील. माझ्या आत्याच्या घरी असलेल्या मांजरीची त्यांच्या कुत्र्याशी गट्टी होती. ती बिनधास्त त्याच्या कुशीत जाऊन झोपत असे आणि तो कुत्रादेखील सरडे, पाली वगैरे मारून तो खाऊ तिला आणून देत असे!



*मगरीच्या जबड्यात निर्भयपणे जाऊन तिचे दात साफ करून देणारा प्लोव्हर पक्षी*

दोन वेगळ्या जातीच्या वन्य प्राण्यांमध्येसुद्धा मैत्री होऊ शकते- पण जर दोन्ही जातीच्या प्राण्यांना ते फायद्याचं असेल तरच! उदाहरणार्थ, इजिप्शियन प्लोव्हर जातीच्या पक्ष्यांची मगरीशी दोस्ती असते. मगरीच्या दातांत तिनं खाल्लेल्या प्राण्यांच्या मांसाचे तुकडे अडकलेले असतात. हे पक्षी निर्भीडपणे तिच्या तोंडात जाऊन ते तुकडे काढून खातात आणि तिचे दात साफ करून देतात. त्यांना गट्टम् करायचा विचारही मगर मनात आणत नाही. कारण, एक तर तो पक्षी इतका छोटा असतो की मगरीच्या अर्ध्या घासालाही पुरणार नसतो. आणि दुसरं म्हणजे फुकटात दात साफ करून देणारा दंतवैद्य कोण गमावेल, नाही का? त्या पक्ष्यांच्या दृष्टीनेही ही मैत्री मोलाची असते. कारण त्याला विनासायास पोटभर जेवण मिळतं. शब्दशः दात कोरून पोट भरणारा प्राणी!

सिंह, तरस, जंगली कुत्री असे काही प्राणी टोळीनं शिकार करतात. पण दोन वेगळ्या जातीचे प्राणी सहकार्य करून शिकार करताना क्वचितच पाहायला मिळतात. लांडगे आणि तरस हे खरं तर एकमेकांचे प्रतिस्पर्धी. हाडवैरी म्हटलं तरी चालेल. एकटादुकटा लांडगा आढळला तर तरसांची टोळी त्याच्यावर हल्ला करून त्याला ठार मारायला कमी करत नाही. पण इस्रायलमधल्या वाळवंटी प्रदेशात लांडगे आणि तरस हे एकत्र मिळून शिकार करताना एका प्राणी-शास्त्रज्ञाला पाहायला मिळाले. तरसाचं नाक फार तीक्ष्ण असतं. कित्येक

किलोमीटर्सवरून त्याला भक्ष्याचा वास येतो. त्याच्या या कौशल्याचा फायदा करून घेण्यासाठी या प्रदेशातील लांडगे त्याला आपल्या टोळीत सामावून घेतात.

झेब्रा आणि शहामृग हे अनेकदा एकमेकांच्या संगतीत वावरताना आढळतात. झेब्र्यांची दृष्टी अधू असते, तर शहामृगांना ऐकू कमी येतं आणि त्यांचं नाकही फारसं तीक्ष्ण नसतं. त्यामुळे शत्रू जवळपास आलेला दिसला, तर शहामृग झेब्र्यांना आधीच सावध करतात. मात्र वासावरून किंवा आवाजावरून शत्रूची चाहूल झेब्र्यांना आधी लागते. त्याची सूचना ते शहामृगांना देऊ शकतात.

कधीकधी काय होतं, दोन जातीचे प्राणी अपघाताने एकमेकांच्या खूप जवळ येतात. पाहाणाऱ्याला वाटतं की त्या दोघांची मैत्री आहे. पण प्रत्यक्षात तसं काही नसतं. पक्ष्यांचं छायाचित्रण करणाऱ्या एका अमेरिकन फोटोग्राफरला एकदा एका उडत्या गरुडाच्या पाठीवर एक कावळा बसलेला दिसला. हे दृश्य इतकं विलक्षण होतं की, कुणाचा त्याच्या सांगण्यावर विश्वासच बसेना. सुदैवाने त्यानं त्यांचे एक नाही तर तब्बल तीस फोटो काढले होते. त्यामुळे त्याच्या हकिकतीवर विश्वास ठेवावाच लागला.

लोकांना असा बनवेगिरीचा संशय आला, त्याचं कारण त्याच्या थोडे दिवस आधी असलंच एक विलक्षण दृश्य एका माणसाने इंटरनेटवर प्रसिद्ध केलं होतं. त्यात एका सुसरीच्या पाठीवर एक रॅकून (उत्तर अमेरिकेत आढळणारा एक केसाळ प्राणी) चढून बसलेला दिसत होता. त्याच्या म्हणण्याप्रमाणे त्याला ते दृश्य फ्लोरिडाच्या 'नॅशनल फॉरेस्ट'मध्ये हिंडताना दिसलं होतं. ते छायाचित्र इंटरनेटवर प्रचंड गाजलं. पण ती फोटोशॉप करून केलेली बनवेगिरी होती, असं नंतर उघडकीस आलं.

टोकियोमधल्या 'मुत्सुगोरो ॲनिमल किंगडम्'



शहामृग आणि झेब्रा यांचं सहजीवन



गरुडाच्या पाठीवर बसलेला कावळा



सुसरबाई तुझी पाठ मऊ!
(सुसरीच्या पाठीवर बसून राइड घेणारा रॅकून)

या पेट शॉपमध्ये एका हॅमस्टरची सापाबरोबर मैत्री झाल्याची एक लोकविलक्षण घटना काही वर्षांपूर्वी समोर आली होती. त्या दुकानातल्या 'आओ चान' नावाच्या एका सापाला गोठवलेलं चिकन खायला दिलं जात असे. पुढे त्या दुकानदाराचं उत्पन्न खूपच कमी झालं आणि त्याला सापाला चिकन खाऊ घालणं परवडेना. बरेच दिवस तो साप उपाशी राहिला. शेवटी त्या दुकानाच्या मालकाने त्याला हॅमस्टर खाऊ घालायचं ठरवलं आणि गोहान नावाचा एक हॅमस्टर त्याच्या पिंजऱ्यात सोडला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे आओ चानने गोहानला खाण्याच्याऐवजी त्याच्याशी मैत्री केली. तो आणि गोहान एकत्र खेळत असल्याचा व्हिडिओ कोणीतरी इंटरनेटवर टाकला. काही काळातच तो व्हिडिओ प्रचंड व्हायरल झाला.

टोकियोतल्या 'फ्रेंड्स ऑफ ॲनिमल'सारख्या संस्थेच्या कार्यकर्त्यांना साप आणि हॅमस्टर यांना एकत्र ठेवणं साफ नापसंत होतं. त्यांनी याचा तीव्र निषेध केला. या दोघांची मैत्री वगैरे काही नसून तो त्या दुकानदाराने केलेला पब्लिसिटी स्टंट आहे, असा आरोप त्यांनी केला. नाइलाजाने दुकानदाराला या दोघांना वेगवेगळ्या पिंजऱ्यात ठेवणं भाग पडलं. काही दिवसांतच दुकानदाराचा धंदा बसला व त्याने आपलं दुकान बंद केलं. गोहान आणि आओ चान यांचं पुढे काय झालं ते कुणालाच माहीत नाही. पण ही दोघं एकत्र बागडत असल्याचा तो व्हिडिओ यू ट्यूबवर *https://www.youtube.com/watch?v=Z0NZhqrzyQo* या लिंकवर तुम्ही आजही पाहू शकता.

रशियामधल्या प्रिमोरी सफारी पार्कमध्ये एक अमूर नावाचा एक सायबेरियन वाघ आहे. पाच-सहा वर्षांपूर्वी त्यांच्या पिंजऱ्यात तैमूर नावाचा एक बकरा, त्याला खाण्यासाठी म्हणून सोडण्यात आला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे अमूरने त्या बकऱ्याला



*टोकियोमधल्या एका पेट शॉपमध्ये हॅमस्टरची सापाबरोबर मैत्री*

खाऊन टाकण्याऐवजी त्याच्याशी मैत्री करणं पसंत केलं. ते दोघं जोडीने एकत्र हिंडूफिरू लागले, एकत्र खेळू लागले, नाचू बागडू लागले. दिवसाचे २४ तास ते एकत्र असत. हे तर काहीच नाही, पण अमूरने आपल्या या मित्राला शिकार करायला शिकवायचाही प्रयत्न केला! तैमूरला अमूरची अजिबात भीती वाटत नसे. पुढे पुढे तर तो इतका



*रशियामधल्या प्रिमोरी सफारी पार्कमध्ये एका सायबेरियन वाघाशी मैत्री करणारा बकरा*

धीट झाला की त्याने आपल्या शिंगाने अमूरला सारख्या ढुशा द्यायला सुरुवात केली. महिनाभर त्याची ही मस्ती मुकाट्याने सहन केल्यावर अमूरची सहनशक्ती संपली. त्याने तैमूरची मान दातात पकडून त्याला एका लहानशा टेकाडावरून खाली फेकून दिलं. तैमूरला बऱ्याच जखमा झाल्यामुळे त्याला हॉस्पिटलमध्ये न्यावं लागलं. मॉस्कोमध्ये त्याच्या जखमांवर उपचार करण्यात आले. पण त्याचा उपयोग झाला नाही. काही दिवसांतच या शूरवीर बकऱ्याचा अंत झाला. तैमूरचं नीट दफन करण्यात आलं आणि त्याच्या समाधीवर एक ब्राँझची पाटीही बसवण्यात आली आहे. अमूर आणि तैमूरच्या जोडीचा व्हिडिओ तुम्हांला या *https://youtu.be/7oND4fbSho4* लिंकवर पाहता येईल.

मध्यंतरी नेटवर एक पोस्ट फिरत होती. त्या पोस्टमध्ये असलेल्या फोटोत एक वाघीण डुकरांच्या चार-पाच पिल्लांना दूध पाजत आहे, असं दिसत होतं. 'या वाघिणीची तीन नवजात पिल्लं मरण पावल्यामुळे तिला डिप्रेशन आलं. त्यामुळे या डुकराच्या पिल्लांना तिच्या पिंजऱ्यात ठेवलं आणि ती त्यांना दूध पाजायला लागली. तिचं डिप्रेशन गेलं.' अशी एक 'स्टोरी' रचून कोणीतरी ती पोस्ट टाकली होती.

पण खरंतर हे साफ खोटं होतं. तो फोटो बनावट नव्हता, पण ती स्टोरी खोटी होती. ही थायलंडमधल्या श्रिरचा नावाच्या एका प्राणी-संग्रहालयातील एक वाघीण होती. तिचं नाव साईमाई. तिला डिप्रेशन आलं होतं, वगैरे सर्व थापा होत्या. या प्राणी-संग्रहालयात सुमारे ६०० वाघ आहेत आणि तिथे वाघांची पैदास करून ते इतर देशांत पाठवले जातात. त्याचबरोबर हे प्राणी-संग्रहालय बघायला येणाऱ्या प्रेक्षकांना आकर्षित करण्यासाठी काही सर्कसचे प्रयोगसुद्धा तिथे दाखवले जातात. वाघांना आणि डुकरांना



*थायलंडमधल्या एका प्राणी-संग्रहालयातील एका वाघिणीच्या अंगावर बागडणारी डुकराची पिल्लं*

एकच पिंजऱ्यात ठेवण्याचा प्रयोग हा त्याचाच एक भाग होता. या साईमाईची आई मेली तेव्हा ती स्वतःच एका डुकरीचं दूध पिऊन जगली, म्हणून तिला डुकराच्या पिल्लांबद्दल प्रेम आहे, अशी एक लोणकढी थापही पसरवून दिली होती!

पुढे काही वर्षांनी ही साईमाई मेली. तेव्हा तिच्या जागी दुसऱ्या वाघिणींना बसवून त्यांच्या पिंजऱ्यात डुकराची पिल्लं सोडली जात असत. त्यांना वाघाच्या कातड्याचे कपडे शिवून ते घातले जात. त्या वाघिणींना पोटभर खाणं दिलं जात असे. कुठलाही प्राणी पोट भरल्यानंतर दुसऱ्या प्राण्यावर हल्ला करत नाही, म्हणून या वाघिणी डुकरांच्या पिल्लांकडे दुर्लक्ष करत असत. शिवाय या वाघिणींना तसं दुर्लक्ष करायचं प्रशिक्षणही दिलेलं असे. या तोतया साईमाईला बघायला प्रेक्षकांच्या रांगा लागत. प्राणी-संग्रहालयाला भरपूर कमाई होत असे. पण पुढे कधीतरी हा भ्रमाचा भोपळा फुटला. कारण साईमाई म्हणून बसवलेली एक वाघीण एका डुकराच्या पिल्लाला खाण्यासाठी तोंडात पकडताना प्रेक्षकांना दिसली. या प्रसंगाचा व्हिडिओ काढून

प्रियनुच नावाच्या एका व्यक्तीने तो नेटवरही टाकला आणि हा 'नाटकाचा प्रयोग' बंद पडला.

वर दिलेल्या तीन हकिकतीत सांगितलेली दोन भिन्न जातीच्या प्राण्यांची ही मैत्री खरोखरच झाली होती का? 'वाघीण आणि डुकराच्या पिलांची मैत्रीची कथा' ही त्या प्राणिसंग्रहालयाने केलेली लबाडीच होती. टोकियोतल्या सापाची आणि हॅमस्टरची गोष्ट हा पब्लिसिटी स्टंट असायची शक्यता आहे. तो साप कदाचित भुकेला नसेलही. रशियातल्या सफारी पार्कमधली वाघ-बकऱ्याची मैत्री मात्र खरी असावी. बहुधा तो वाघ एकटेपणाला कंटाळला असावा. पोट भरण्यापेक्षा त्याला कुणाच्यातरी सोबतीची जास्त गरज असावी.

बहुतेक तज्ज्ञांच्या मते कुठल्याही वन्य प्राण्याची त्याच्या भक्ष्याशी कधीही मैत्री होऊ शकत नाही. (अशी मैत्री खरंच झाली तर तो उपाशी मरणार नाही का?) सुसर आणि प्लोव्हर पक्षी, लांडगे आणि तरस यांची मैत्री ही दोघांनाही फायदेशीर म्हणूनच झालेली असते. पण आंतरजातीय प्राण्यांची पूर्णपणे निःस्वार्थी मैत्री जुळल्याचीही अगणित उदाहरणं आहेत. पाळीव प्राण्यांमध्ये तर आहेतच, पण वन्य पशुपक्ष्यांतही आहेत.

एका डॉल्फिनच्या मादीनं एका व्हेलच्या बछड्याचा वर्षभर सांभाळ केला होता. अंजना नावाच्या एका चिम्पान्झीच्या मादीनं पांढऱ्या वाघाची दोन पिल्लं दत्तक घेतली होती. 'सुरिया' या ओरांगउटाननं 'रोस्को' या शिकारी कुत्र्याशी सख्य जोडलं आहे. 'बबल्स' या हत्तीची 'बेला' नावाच्या एका कुत्रीशी दोस्ती झाली होती. 'बी' नावाच्या जिराफाची गट्टी 'विल्मा' या शहामृगाशी जमली होती. 'टिनी' या कुत्रीचा 'स्निफर' या कोल्ह्याशी दोस्ताना जुळला होता, तर 'टॉर्क' या कुत्र्याचा 'श्रेक' नावाच्या घुबडाशी. 'डेनिस' या बदकाच्या पिल्लाचा 'फ्रेड' नावाच्या कुत्र्याशी इतका स्नेहबंध



*अंजना नावाच्या एका चिम्पान्झीच्या मादीनं पांढऱ्या वाघाची दत्तक घेतलेली दोन पिल्लं*

निर्माण झाला होता की ते चक्क त्याच्या डोक्यावर चढून बसत असे. 'मिलो' या कुत्र्याची तर चक्क 'बोनडिगर या सिंहाशी घसट झाली होती. तो त्याच्या अंगाखांद्यावर बागडत असे. 'शेरखान' हा वाघ, 'बालू' नावाचं अस्वल आणि 'लिओ' हा सिंह यांची कथा फारच हृदयद्रावक आहे. मादक द्रव्याचा अवैध व्यापार करणाऱ्या एका माणसाने



*‘बी’ नावाच्या जिराफाची गट्टी ‘विल्मा’ या शहामृगाशी*

त्या तिघांना एकत्र बांधून त्यांचा प्रचंड छळ केला होता. त्यामुळेच की काय कोण जाणे, पण त्या तिघांची आता घट्ट मैत्री झाली आहे. इतकी, की ती तिघं आता एकमेकाला सोडायलाच तयार नसतात. अमेरिकेतल्या नोहाज आर्क सॅन्क्चुअरीमध्ये ती तुम्हांला भेटतील.

या प्राण्यांपासून माणसाला शिकण्यासारखं बरंच काही आहे. एक म्हणजे दोघांनाही फायदेशीर असली तर पिढीजात शत्रूशीसुद्धा मैत्री होऊ शकते. आणि दुसरं म्हणजे मित्र जोडताना ‘जात’ आड येत नाही!

**-सुबोध जावडेकर**
*संपर्क- 9870369372*
*(नामवंत विज्ञानलेखक)*



# राजा सूर्यदेवा...

राजा सूर्यदेवा तुला
माझा नमस्कार
तुझ्या प्रकाशाने हसे
माझे घरदार...

रूप तुझे कोवळे रे
आहे किती छान
तुला पाहावया बघ
जागे झाले रान...

तुला उठवाया पाने
वाजविती टाळ
तुझ्यासवे खेळायला
आतुरले बाळ...

चाले तुझी लपाछपी
हिरव्या पानांत
चमचमतोस देवा
दवाच्या थेंबात..

राजा सूर्यदेवा तुला
माझा नमस्कार
तुझ्यामुळे उघडते
दिवसाचे दार!

**-डॉ. संगीता बर्वे**
*dr.sangeeta.barve@
gmail.com*

ऋतुरंग वर्ष ३०वे । दिवाळी २०२२ ।
**संपादक : अरुण शेवते**

## ।। विशेषांक : 'उद्या पहाटे दुसऱ्या वाटा' ।।

ऋतुरंग दिवाळी अंकाचे हे ३०वे वर्ष आहे. यावर्षीचा विशेषांक 'उद्या पहाटे दुसऱ्या वाटा' हा आहे. आयुष्याचा प्रवास कधी स्थिर नसतो तर तो गतिशील असतो. एका वाटेवर अनेक वाटा खुणावत असतात. मनाला थांबून ठेवता येत नाही. मनाला हजार वाटा असतात. कुठली वाट निवडायची हे आपल्यालाच ठरवावे लागते. आपल्या विचारात, भावनेत अनेक बदल होत असतात. कधी हे बदल स्वीकारावे लागतात तर कधी नाकारून पुढे जावे लागते. वाटा आपल्याला बोलवत असतात. पहाट तर आपल्याला हवीच असते. वाटा बदलण्यासाठी धाडस लागते. माणसं बदलतात; भूमिका बदलतात. यातूनच आपल्या वाटेवरून पुढे जावे लागते.

**या अंकातील लेखक**

गुलज़ार, शर्मिला टागोर, जावेद अख्तर, विनय सहस्रबुद्धे, वैभव जोशी, हेलन पनास्युक, मुकुंद टाकसाळे, श्रीकांत बोजेवार, दीप्ती नवल, डॉ. भाग्यश्री पाटील, सुशीलकुमार शिंदे, अंबरीश मिश्र, किशोर मेढे, कमल परदेशी, मिन्तल मुखिजा, लक्ष्मण चव्हाण, मीरा विजय बाबर, अपर्णा पाटील, राजू बाविसकर, अंजली अंबेकर, सुरेशचंद्र वारघडे, भास्करराव पेरे पाटील, रसिका रेड्डी, मुकुंद संगोराम, संजय आवटे, मल्हार अरणकल्ले, मीनाक्षी पाटील, शिवराम भंडारी, दुर्गा गुडिलू, नीती मेहेंदळे, अरुण नाईक, सविता दामले, पूजा सामंत, सुभाष देवढे, माधुरी ताम्हाणे, किरण येले, जयश्री देसाई, शर्मिला फडके, प्रणव पाटील, शर्मिला कलगुटकर, जयश्री शेट्टी, सुचिता नांदापूरकर-फडके, मीरा उमप, तुषार बोडखे

**मुखपृष्ठ** : अन्वर हुसेन
**रेखाटने** : विजयराज बोधनकर, अन्वर हुसेन

**मूल्य : ३०० रुपये । पृष्ठसंख्या : २५०**

ऋतुरंग
प्रकाशन

संपर्क : **अरुण शेवते**
भ्रमणध्वनी : ९८९२४३८५७४ **अंक सर्व विक्रेत्यांकडे उपलब्ध.**
shevatearun@gmail.com



# मुंगीच्या पावकाने...

**पृथ्वीवर कुठेही जा, मुंगी कुळाचं साम्राज्य पसरलेलं असतं. त्याची मजेदार गोष्ट!**

**सारं** कसं शांत शांत! नाश्त्याला थोडीशी बुरशी खाऊन आणि थोडं मावा-ड्रिंक पिऊन राणी मुंगीनं 'आता पुढे काय..' अशा तऱ्हेने आजूबाजूला बघितलं. लवकरच ती तिच्या अंडी घालण्याच्या कामी लागेल, सेवेकरी मुंग्या हाजीर होतील, नव-शिशूंची देखभाल करण्यासाठी घेऊन जातील. मग परत थोडा खाऊ, आराम आणि हेच सगळं पुन्हा पुन्हा. तिला अगदी कंटाळा आला होता. ती राणी झाल्यापासून हाच एक दिनक्रम तिच्या वाट्याला आला होता.

'राणी म्हणे!' ती कधीकधी करवादून म्हणत असे! 'कसली आलेय राणी!! नुसतं अंडी घालायचं मशीन आहे झालं. आजूबाजूला नुसता अंधार. बाहेर काय चाललंय काही पत्ता नाही.' तिला आठवली तिची बाहेरची पहिली उडान! तो प्रकाश, वारा, मग नरांना भेटणं एकदाच अनुभवलं तिनं सारं.. आणि मग अंधार! कायमसाठी अंधार. तिला कळलं होतं, ती राणी आहे. तिची पिल्लं जगणार आहेत. त्यांची काळजी घेतली जाणार आहे. खूश झाली होती ती थोडा वेळ. एवढे सगळे नोकरचाकर दिमतीला. पण राणीची दुःखं राणीला ठाऊक. या अंधाऱ्या खोलीत बसून अंडी देत राहणं नशिबी आलं. कामकरी मुंग्यांचा हेवा वाटू लागला आता. त्या किती मजेत इकडे तिकडे हिंडून येतात, काय काय पाहून येतात, एकमेकीला कळवतात, प्रसंगी शत्रूशी दोन हात करतात. खरोखरच हेवा वाटण्याजोगं! रोज सकाळी ती त्यांची वाट बघायची. आजही त्यांची ये-जा सुरू झाली होती. तिनं त्यातल्या एकीला थांबवलं आणि राणीच्या आवेशात हुकूम सोडला, 'ऐक, जरा थांब.'

राणी मुंगीनं थांबवल्यावर कामगार मुंगी लगेच थांबली. तिला काय हवं नको बघणं सगळ्या मुंग्यांचं आद्य कर्तव्य होतं ना!

"ऐक, तू रोज बाहेर जातेस ना? बाहेर काय चालू आहे, ते सगळं तू मला रोज तपशिलात सांगायचं. आजपासून तू माझी वार्ताहर मुंगी!" राणी मुंगी म्हणाली.

मुंगी हसली. राणीचा कंटाळा तिच्या नजरेतून सुटला नव्हता. क्षणभर तिला वाटलं, सुटलो बुवा आपण यातून! आधी वाटलं होतं की आपण राणी का नाही! काम करायचं आणि मरून जायचं. पण आता असं वाटत होतं, जे आहे ते चांगलंच आहे. आपलं काम चांगलं आहे, त्यात मजा आहे, साहस आहे. राणीपेक्षा कमी जगणार आहोत आपण, पण जिंदगी हसीन हैं! उसमे हैं कुछ बात!

"होय राणी, मी सांगेन तुला सगळं. मी होईन तुझे डोळे. बघशील तू जग माझ्या नजरेनं. शेवटी तू आणि मी वेगळ्या का आहोत!" ती राणीला म्हणाली. राणीमुंगीनं तिचं मोठं डोकं हलवत सहमती दर्शवली.

"तर मग काय चालू आहे सध्या बाहेर?"

"आपलंच राज्य आहे राणी!" कामकरी मुंगी म्हणाली.

आपलंच राज्य! राणीला हसू आलं. काय काळ आहे हा! शेकडो वारुळं, शेकडो राण्या, पण साऱ्या आपल्याच. त्यांच्यात वैर नाहीच. एक काळ असा होता की थोड्या थोड्या अंतरावर वेगवेगळ्या जातीच्या मुंग्या आणि त्यांची वारुळं. या वारुळातली मुंगी त्या वारुळातल्या मुंगीला ओळखत नाही. नुसती ओळखत नाही असं नव्हे तर शत्रूच. एका वारुळातली मुंगी चुकून जरी दुसऱ्या वारुळाच्या दिशेनं आली तरी तिचा नीट समाचार घेतला जायचा. कधीकधी तर एका वारुळाचं दुसऱ्या वारुळाशी युद्ध चालायचं! एक वसाहत विरुद्ध दुसरी वसाहत. मोठ्या युद्धाचे प्रसंग यायचे. महिनोन्महिने, वर्षानुवर्षं ही युद्ध चालायची. मोठाच रक्तपात! हजारो शिपाई मुंग्या मरायच्या, आपल्या वसाहतीचं संरक्षण करण्यासाठी! तिनं ऐकल्या होत्या या गोष्टी.

मग मध्ये एक जादुई गोष्ट घडली. कोणी म्हणे केमिकल लोचा! आपलं आणि परकं असं उरलंच नाही. एरवी वारुळात राणी मुंगी सोडून दुसरीला अंडी घालता येत नसे. कुणी तसा प्रयत्न केलाच तरी इतर मुंग्या तो यशस्वी होऊ देत नसत. तिला वारूळ सोडून दुसरीकडे जाऊन स्वतःचं नवं वारूळ तयार करणं सोपं नसे. अनेक संकटं होती. आपल्याच लोकांतून सुटली तरी कुणी पक्षी खाऊन टाकेल असं सुद्धा घडू शके. त्यामुळे मोजक्या मुंग्या असं करू शकत.

पण आता मात्र तसं नाही. काय गंमत झाली, एकदा वारुळातून एक मुंगी दुसरं घर तयार करायला निघाली, तर तिला कुणी थांबवलं नाही. तिने अंडी घातल्यावर ती आधीच्या वसाहतीतल्या मुंग्यांनी आपल्याकडे पळवून आणली नाहीत. त्यातून तयार होणाऱ्या मुंग्यांना आपल्या वारुळाच्या कामाला लावणं खरंतर सोपं होतं, पण तसं घडलं नाही. त्या मुंग्या नव्या वारुळात जन्मल्या, नव्या राणीची सेवा करण्याकरिता तयार झाल्या. मग त्यातून एक मुंगी निघाली. तिने स्वतःची वसाहत स्थापन केली. तिलाही कुणी अडवलं नाही. करता करता मूळ मुंगी-कुळाचं साम्राज्यच की पसरलं! थोड्याथोडक्या नव्हे, हजारो किलोमीटर अंतरावर फक्त आपलेच भाईबंद किंवा बहिणी. ती त्यांच्यापैकीच एक.

जिकडे जावे तिकडे माझी भावंडं आहेत, सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मला दिसताहेत! आता खरोखरच हे शक्य झालं होतं. हजारो किलोमीटरवर पसरलेली आपलीच वसाहत. समुद्रकिनाऱ्यापासून पर्वतपायथ्यापर्यंत आणि खेड्यापासून शहरापर्यंत फक्त आपण आणि आपणच. त्या दुसऱ्या सुतारमुंग्या बसल्या चरफडत! त्यांना आता डोकं वर काढता येईना. उगाच कुठेतरी एखादं वारूळ करून जीव मुठीत धरून राहण्याची वेळ आली त्यांच्यावर. आमच्या मुंग्या, आमचा दरारा! इतर प्राणीपक्ष्यांनाही आश्चर्य वाटू लागलं होतं! हे म्हणजे असं झालं की बागेत फक्त पिवळा झेंडूच; शेवंतीसुद्धा नाही. किंवा झाडावर फक्त काळे कुळकुळीत कावळे, डोमकावळ्यालासुद्धा जागा नाहीच.

'नसू दे! आम्हांला जमलंय ते. आम्ही साध्य करून दाखवलंय. आमच्या बळावर. तुम्हांला जमलं तर तुम्ही करा..' राणीच्या मनात आलं.

"माणसांची फार मदत झाली हे सगळं साध्य करण्यात; नाही?" त्या वार्ताहर मुंगीला राणी म्हणाली.

"प्रश्नच नाही. त्यांच्याच तर बुटात, सामानात बसून आपण इकडे तिकडे गेलो. नव्या जागा शोधल्या. निरोप पाठवले. भराभर वस्ती वाढवली." वार्ताहर मुंगी म्हणाली, "मी स्वतः गेलीये बॅगेत बसून. इतकी मज्जा, कुणाला कळलंसुद्धा नाही."

"माणसं म्हणजे जरा हीऽऽऽच आहेत नाही! मला तर मजाच वाटते."

"हो ना, त्यांना वाटतं त्यांनाच सगळं जमतं. एवढाल्या इमारती, बोगदे, पूल, रस्ते... त्यांच्या आधीपासून इथं कोणी हे असं काही करतंय हे माहीतच नाही त्यांना. दृष्टीआड सृष्टी! शिवाय एवढाल्या बोटीत, रेल्वेत किंवा विमानात फक्त त्यांनीच बसून जायचं असं त्यांना वाटतं, किंवा त्यांच्या कुत्र्यामांजरांनी! वेडे कुठले!" वार्ताहर मुंगी खिदळत म्हणाली.

"आपण आहोत हे त्यांच्या लक्षातही येत नाही?"

"नाही ना! बरं आहे आपल्यालाही तेच. लक्ष गेलं की अंगात येतं त्यांच्या. इतके वेडे चाळे करतात की जणू आपण त्यांचे प्राण घेणार आहोत."

"अगदीच बावळट!"

"अगं काही विचारू नकोस. त्यांचं लक्ष गेलं की ते आपल्या अंगावर पाणी ओततात, पिवळी पूड टाकतात, कसले कसले विषारी फवारे

चित्रं- संतोष घोंगडे




उडवतात. आपल्या अनेक बहिणी या प्रकारात जीवानिशी जातात. अजून काय काय करणार आहेत आपल्याला संपवायला कुणास ठाऊक."

"ऐकते मी इथे बसून या दुःखद कहाण्या. माझ्या शूर बहिणी!"

"पण त्यांचं बलिदान व्यर्थ जात नाही. माणसांच्या अंगणात टिच्चून राहतो आपण.. काय करायचं ते करा म्हणून.. त्यांना समजतच नाही आपण येतो कुठून, करतो काय? एक दिवस अचानक नवं वारूळ कसं काय सुरू होतं! सगळं झाल्यावर येतात पाणी टाकायला.."

"जरा मंदच आहेत."

"हो, सध्या जरा जास्त बावचळलेले सुद्धा आहेत."

"का बरं?"

"युद्ध काही अजून त्यांना टाळता आलेलं नाही. त्यांच्या दोन देशांत युद्ध सुरू झालंय."

"युद्ध?" राणीचे डोळे चमकले. "किती मोठं?"

"खूप मोठं.. जिंकण्यासाठी ते काहीही करतायत. त्यांनी दुसऱ्या देशाच्या लोकांवर आगीचे गोळे टाकले. खूप मोठे आवाज, धूर, त्यांची घरं पडली.."

"बापरे, मोठंच नुकसान!"

"हो, खूप महिने झाले तरी युद्ध चालू आहे.."

"कित्ती भारी! किती दिवसांनी युद्धाच्या गोष्टी ऐकते आहे." राणी मुंगी नकळत म्हणाली. तिचा तो आविर्भाव बघून वार्ताहर मुंगीला राहवलं नाही, "भारी? इथे बसून तुला भारी वाटणारच." ती एकदम बोलून गेली. मग चपापून म्हणाली, "तुला त्याची काहीच धग लागत नाही. लागू देणारही नाही. आम्ही आहोत ना तुला प्राणपणानं जपायला.."

राणी मुंगी एकदम उदास झाली. तिला खूप राग आला, कशाचा ते तिलाही कळेना. आपण जरा जास्तीच बोललो हे जाणवून वार्ताहर मुंगी नुसतीच चुळबुळ करू लागली.

"निघ तू आता," राणी मुंगी एकदम म्हणाली.

"हो, आज नवीन मुंगी राणी झाली आहे. तिच्या नवीन घरी तिच्या मदतीला काही सेविका पाठवायच्या आहेत. येते मी.."

राणी मुंगी काही बोलली नाही. आजूबाजूला अंधारात बाजूची वर्दळ निरर्थक बघत राहिली.

एक मुंगी तिला दिसली. म्हणजे मुंगीसारखीच दिसत होती ती, पण काहीतरी वेगळं होतं तिच्यात. काय होतं ते? तिला उलगडा होईना.

लांबवर कुठेतरी संगणकावर संदेश चमकला. 'नव्या वारुळाची तयारी.. अलर्ट!' संदेश रिसिव्ह झाला. 'वा! हे जमतंय तर. मुंग्यांच्या वसाहती आपल्याला कंट्रोल करता येणार तर!' संगणकासमोर बसलेला कुणी खूश झाला. पुढच्या कार्यवाहीला लागला.

मुंगीसारखी दिसणारी ती, पुढच्या कामाला लागली! काळ त्यांचा होता. काळ असा बदलत होता.


**-मृणालिनी वनारसे**

*ioraespune@gmail.com*

*(निसर्ग अभ्यासक आणि साहित्यिक)*

# सुपरहिरो टांका

**सदा मदतशील, परोपकारी लहानग्याची छानशी गोष्ट–**



*चित्र- धनंजय गोरेगावकर*

**वहिनी** काळजीत पडल्या होत्या. "काल पाहिलंस का टापू?"

मी मान हलवली. "नाही. आता पुन्हा काय झालं?"

वहिनी म्हणाल्या, "हा पोरगा कुठे जातो कोण जाणे! इकडे लॉकडाऊन चालू आहे. बाहेर वाईट परिस्थिती आहे आणि हा पोरगा माझ्या जीवाला घोर लावतोय!"

आजी म्हणाली, "मी म्हटलं होतं ना तुला, याच्या रूपाने आजोबाच आपल्या घरी आलेयत. तेही असेच होते. नाहीतर लहान वयात सैन्यात भरती होऊन कोणी दुसऱ्या महायुद्धात भाग घेईल का?"

मला हे माहीत होतं. ब्रिटिश इंडियन आर्मीत जाऊन अल्जेरियात हिटलर-मुसोलिनीच्या विरुद्ध लढायला गेले होते आजोबा. त्यांनीच मला या गोष्टी सांगितल्या होत्या. २००८ सालापर्यंत ते हयात होते. ८८व्या वर्षीसुद्धा ताठ चालायचे, मोठ्याने हसायचे, कोणी अडचणीत असलं तर धावत मदतीला जायचे. आजोबांचा मृत्यू झाल्यावर पुढच्याच वर्षी टांकाचा जन्म झाला.

बघितल्याबरोबर आजी म्हणाली होती, "तुझे आजोबाच परत आलेयत. हे बघ डाव्या हाताच्या कोपरापाशी आजोबांसारखीच एक मोठी चामखीळ आहे."

तोच पोरगा आज १०-११ वर्षांचा झाल्यावर किती दांडगाई करतोय!

टांका माझ्या मोठ्या भावाचा मुलगा. खरं नाव होतं अविनाश, पण टोपणनाव होतं टांका. टांका केव्हा काय बोलेल, काय करेल, ते सांगता येत नसे!

लॉकडाऊन व्हायच्या काही दिवस आधी तो मला म्हणाला होता, "गल्लीतून येत होतो तेव्हा कुत्र्याचं एक पिल्लू माझ्या अंगावर धावून आलं, त्यावेळी एका मोठ्या मनीमाऊने आपल्या अंगावरचे केस फुलवून त्याला पळवून लावलं आणि माझी सुटका केली."

इतका वेळ मी काही बोललो नव्हतो, पण मग टांका म्हणाला, "मनीमाऊ मला म्हणाली, रस्त्यावर फिरू नकोस. ताबडतोब घरी जा." हे ऐकल्यावर मी त्याला म्हटलं, "हे जरा अतीच होतंय टांका!"

तो म्हणाला, "ॲलिस इन वंडरलँड'मध्ये असं झालं की तुम्हांला चालतं! असं कसं?"

कधी त्याला ॲलिस व्हायचं असतं तर कधी सुपरमॅन, आयर्नमॅन नाहीतर अरण्यदेव!

लॉकडाऊन चालू असताना शाळा घरातूनच करावी लागे. टांकाला एका जागी बसवणं मुश्कील होऊन जाई.

एके दिवशी शाळा झाल्यावर तो माझ्यापाशी आला. मी लॅपटॉपवर गोष्ट लिहीत होतो. तिथे 'टांका' हे नाव वाचल्यावर त्याने विचारलं, "काका, माझं नाव कशाला?"

मी म्हटलं, "तुझीच गोष्ट लिहितोय."
त्याने विचारलं, "या गोष्टीत मी कोण आहे? स्पायडरमॅन?"

मी त्याला समजावून सांगू लागलो, "असं कोणी व्हायला पाहिजे असा काही नियम नाही. इतरांना मदत करणं महत्त्वाचं. ते कोणाला नाही समजलं तरी चालतं. तुला सिंधुताई सकपाळ माहिती आहेत ना? त्यांनी आयुष्यभर किती गरीब मुलांना सांभाळलं. द्वारकानाथ शर्मा, हैद्राबादचे करीमभाई यांनी निःस्वार्थीपणे सामाजिक कार्य केलं. हे सारे सुपरहिरोच आहेत."

"म्हणजे माझे आजोबासुद्धा सुपरहिरोच होते ना?"

"होय."

"मी तसं काही केलं नाही. मग काका, तू माझी गोष्ट का लिहितोयस?"

हसून मी म्हटलं, "करतोयस की! रिकाम्या टबमध्ये झाडं लावतोयस; तुला गोळ्या, चॉकलेट्स,

खाऊ दिला की तू तो रस्त्यावरच्या गरीब मुलांना वाटून टाकतोस; परवा आईची महाग साडी समोरच्या गरीब दोक्तादीदीला देऊन आलास; तुझा कॅरमबोर्ड वस्तीतल्या मुलांना देऊन टाकलास."

"काका, या गोष्टी तू सांगू नकोस. चांगलं काम केलेलं बोलायचं नसतं ना!"

तेवढ्यात त्याची आई टांकाला शोधत तिथे आली आणि त्याला खेचत बाबांकडे घेऊन गेली. आता त्याला मार पडणार या भीतीने मीही पाठोपाठ गेलो. आईची बाबांपाशी गोड तक्रार, "याला काहीतरी सांगा. सारा वेळ उनाडक्या आणि बडबड करत फिरत असतो."

तितक्यात घंटेचा आवाज ऐकून कसलीतरी चाहूल लागल्यामुळे काही उत्तर द्यायच्या आधीच कोपऱ्यात ठेवलेला प्लास्टिकचा नॅपकिन घेऊन 'युद्ध, युद्ध!' असं ओरडत टांकाने गच्चीवर धूम ठोकली. आम्हीही त्याच्या पाठोपाठ धावलो. बघितलं तर गच्चीच्या एका टोकाला असलेल्या शेडमध्ये एक लाकडी खोका ठेवलेला होता आणि त्यावर मोडक्या ग्रीलच्या तुकड्याचं झाकण. त्या जाळीच्या तुकड्याभोवती बहिरी ससाण्याची चार पिल्लं बसली होती आणि खोक्यातून काहीतरी बाहेर काढायचा प्रयत्न करत होती. त्याला बांधलेली तार दरवाजापाशी आणली होती आणि त्याला देवाची घंटा बांधलेली होती. ससाण्याच्या पिल्लांच्या हल्ल्यामुळे जाळी हलली की घंटा वाजू लागे. याच घंटेचा आवाज ऐकून टांका गच्चीवर धावला होता.

मी पुढे झालो. प्लास्टिकचा तुकडा घेऊन टांका खोक्यापाशी जाता जाता 'हॅक, हॅक' असं ओरडत होता. त्याबरोबर ससाण्याची पिल्लं ग्रील सोडून पळून गेली. मी आणि टांकाचे बाबा आम्ही दोघेही धावलो.

नाक-तोंड लाल झालेला टांका म्हणत होता, "किती हे धाडस! खायला आली होती!"

आम्ही अवाक होत म्हटलं, "काय खायला?"

बघितलं तर नवीन टॉवेलवर नुकतीच जन्मलेली मांजरीची पिल्लं झोपलेली दिसली.

टांका म्हणाला, "काका, ती घंटा म्हणजे एक सिग्नल. मी तयार केलाय. या पिल्लांच्या आईनेच मला कुत्र्यापासून वाचवलं होतं. मी तुला सांगितलं नव्हतं का? काल गाबुदा म्हणाला, 'या पिल्लांची आई मारली गेलीय.' तेव्हा बाहेर जाऊन मी या पिल्लांना इथे घेऊन आलो. किती लहान आहेत ना ती! शिवाय त्यांच्या आईने मला मदत केली होती. ते लक्षात ठेवून मलाही मदत करायला नको का तिला? पिल्लांना मी इथे लपवून ठेवलंय."

त्याचे बाबा हसत होते. आई म्हणाली, "पुरे झालं! आता त्या पिल्लांना घेऊन खाली ये. गच्चीवर इतक्या कडक उन्हात ठेवलीस तर ती मरून जातील. आम्हांला का नाही सांगितलंस? प्लास्टिकच्या तुकड्याने ससाण्याच्या पिल्लांना हाकलवून देता येईल का? ती ससाण्याची पिल्लं तुला चावली असती तर..."

टांका हसू लागला. म्हणाला, "ते प्लास्टिक आहे, हे तुला माहितेय पण त्या ससाण्याच्या चार पिल्लांना कुठे माहीत होतं ते?"

आम्ही सारेच हसू लागलो. मांजरीच्या पिल्लांना घेऊन आमचा सुपरहिरो उभा होता. स्वतःचा विचार न करता, दुसऱ्याला मदत करण्यासाठी जो नेहमीच धावून जातो, त्यालाच म्हणतात सुपरहिरो! आज लॉकडाऊननंतर जे नवीन जग सुरू झालंय, त्यात आम्हांला असे अनेक टांका हवे आहेत!

**मूळ बंगाली कथा- स्मरणजित चक्रबर्ती**
**संक्षिप्त भावानुवाद- सुमती जोशी**
*sumatijoshi154@gmail.com*

# हितगुज



माझा हा पसारा
फांद्या फांद्यांनी वाढतो
घरट्यात पाखरांना
खुशीचा सांगावा धाडतो

पाना फुलांचा बहर
गंध फळांचा सांडतो
आसऱ्याला येता जीव
खेळ सुखाचा मांडतो

सारी माझीच लेकरे
मी आहेच तुमचा
माझ्या अंगाखांद्यावरी
झुला झुले आनंदाचा

कुशीत साऱ्यांना घेऊन
मी खुशाल डोलतो
कितीही मोठा झालो
नाते मातीशी सांगतो

नाही कटुता मनात
गुण्यागोविंदाने राहू
ऊन, वारा, पावसात
एकमेका आधार देऊ

असे बोलूनिया झाड
वर नभाकडे पाही
पावसाच्या नक्षत्रांना
खाली बोलावित राही

झाडाचे हितगुज
जेव्हा येते माझ्या कानी
झाड आजोबाच वाटे
सांगतो हिरवी कहाणी

**-एकनाथ आव्हाड**
*eknathavhad23@gmail.com*

खाली 'अ' आणि 'ब' गटात जोडशब्द दिले आहेत. पूर्णपणे विरुद्ध अर्थाच्या जोडशब्दांच्या जोड्या शोधा बरं !

| ‘अ’ गट | ‘ब’ गट |
|---|---|
| १. गुळगुळीत | अ. जाडाभरडा |
| २. काटकसर | ब. ठेंगणाठुसका |
| ३. लेचापेचा | क. खडबडीत |
| ४. वस्त्रगाळ | ड. धष्टपुष्ट |
| ५. उंचापुरा | इ. उधळमाधळ |

शब्दांच्या पुढे काही उलटसुलट अक्षरे दिली आहेत. त्या अक्षरांपासून तुम्ही अर्थपूर्ण शब्द तयार केलात की, तो डावीकडे दिलेल्या शब्दाचा समानार्थी शब्द असेल.

१. चित्ताकर्षक- ह नो म र
२. सुरुवात- शा णे श्री ग
३. निरक्षर- क्ष त्रू अ र श
४. पायी चालणारे- री पा चा द
५. शिकवणे- ध्या अ न प

**-कांचन जोशी**
*kanchanpjoshi76@gmail.com*



# वन-वाचनाचे नवे पान

**पावसाचे** दिवस सुरू झाले होते. सरत्या ग्रीष्माच्या दिवसांतही वळवाच्या सरी पडल्या होत्या. याच दिवसांत माझी बदली सह्याद्रीच्या डोंगरसरीवरील एका बीटमध्ये झाली होती. दूरपर्यंत पसरलेल्या या वनालगत टुमदार खेडे होते. बिबटे, गवा, अस्वल, रानकुत्री, साळींदर, रानडुक्कर, सांबर, भेकर अशा कित्येक रानटी जनावरांचा वावर होता. बिवळा, रानबिब्बा, कुंभळ, पायर, ऐन, सावर, किंजाळ, चांदकुडा, भेरलीमाड, नाना यांसारखी उंचच उंच झाडे होती. गेळण, उक्षी, हासोळी, तोरण, वाघचवड, मुरुडशेंग, वाकेरी, पेंडकूळ, शिकेकाई, शतावरी या वेली वळसे घेत झाडोऱ्यातून गडगच्च पसरलेल्या होत्या. अशा या जंगलाच्या संरक्षणाची जबाबदारी 'फॉरेस्ट गार्ड' म्हणून माझ्याकडे होती.

**जंगलातील हरेक कामासाठी रोजंदारीवर येणारा निवरू म्हणजे जंगलज्ञानाचा चालताबोलता ग्रंथ. विविध झाडं-वेली असोत, वा वळवळता जळू... सगळ्यांच्या गुणधर्मांशी त्याची ओळख होती आणि त्यांचे मजेदार किस्से तो सांगत असे. त्याच्यासोबत जंगलात वावरताना अनेक नव्या गोष्टी कळत असत.**

जंगलात गस्त घालण्यासाठी पहिल्याच दिवशी वनमजुराबरोबर गेलो होतो. तेव्हाच निवरूशी माझी ओळख झाली. जंगलवाटेवर निवरूची झोपडी होती. कारवीचे कुढान (कुंपण) करून त्याला शाडू मातीने लिंपून भिंती केल्या होत्या. त्यामुळे झोपडी लांबून पिवळीधम्मक दिसत होती. हडकुळ्या अंगलटीचा निवरू ठेंगू पण खूपच चपळ होता.

त्याच्या चेहऱ्यावर ओरखड्यांचे ठळक डाग होते.

'वनहद्दींची साफसफाई करणे, बुरुजांची डागडुजी करणे, वणवा लागू नये यासाठी जाळरेषेचे पट्टे घेणे, नाल्याला बांध घालणे, रोप-वनांची देखभाल करणे, यांसारख्या जंगलातील हरेक कामासाठी निवरू नेहमी रोजंदारीवर येतो. कधी उन्हाळ्यात जंगलात वणवा पेटला किंवा जनावर जखमी झाले, मानवी वस्तीत शिरले, विहिरीत पडले तर त्याच्या सुटकेच्या वेळी वन-अधिकाऱ्यांना त्याची मदत हमखास असते. 'वन्यजीवांच्या गणनेवेळी पाऊलखुणा, विष्ठा, जमीन-झाडांवरच्या खुणा शोधणे, ठशांचे ट्रायसर ट्रेसरवर नमुने घेऊन प्लास्टरकास्ट ठसे तयार करणे, कधी पाणवठ्यावर बसून प्राण्यांची मोजदाद करणे या साऱ्या कामांत निवरूचा भारी हातखंडा आहे,' असे सोबत असलेल्या वनमजुराने निवरूबाबत मला आधीच सांगितले होते. त्यामुळे निवरूसोबत जंगलात जाताना जणू 'जंगलज्ञानाचा ग्रंथ' माझ्यासंगत आहे, असेच मला वाटले.

रानवाटेवरून चालताना त्याच्या चेहऱ्यावरील जुन्या जखमांबाबत वनमजुराने विचारले, त्यावर तो म्हणाला, "लई वर्षांपूर्वी अस्वलानं हल्ला केला व्हता! त्येच्या नखांनं चेहऱ्याला खिडक्या पडल्या. हितं कातळकड्याला अस्वलं हैत! दिवसा घब्बीत (गुहेत) राहात्यात आन् रात्री भाईर पडत्यात, झाडावरची मधाची पोळं, वारुळातल्या मिंग्या हुडकत..."

मग अस्वलाने त्या दिवशी कसा हल्ला केला, त्यातून स्वतःची कशी सुटका करून घेतली हे सांगता सांगता आपल्या बाबांचा किस्साही आठवला म्हणून तो सांगू लागला...

...निवरूचे बाबा आणि त्यांचे साथीदार एकदा रानातून हिंडताना त्यांना साळींदराचे मोठे बीळ दिसले. भुयारासारख्या त्या बिळात साळींदर आहे का, याची खात्री करायला मग ते जमिनीवर आडवे पडून ढोपरांच्या मदतीने सरकत सरकत बिळाच्या आत गेले. बाहेरच्यांनी मागून त्यांचे दोन्ही पाय धरले होते. थोडा वेळ गेला नाही तोवर निवरूच्या बाबांना कुणीतरी बिळातून जाम ओढत असल्यासारखे बाहेरच्यांच्या लक्षात आले. शिवाय निवरूच्या बाबांचा गुदमरल्यासारखा आवाजही त्यांना ऐकू येऊ लागला. सगळे गोंधळले. मग त्यांनी पुरी ताकद लावून निवरूच्या बाबांचे पाय ओढत त्यांना बिळाबाहेर खेचले. पाहतात तर, चक्क निवरूच्या बाबांच्याबरोबर त्यांच्या मुणक्याला शेपटीने वेटोळे घातलेला जाडजूड अजगरही फरफटत बाहेर आला. भक्ष्याच्या शोधात बिळात गेलेल्या अजगराने निवरूच्या बाबांना विळखा घालून जाम पकडून आत खेचण्याचा प्रयत्न केला होता.

निवरू आपल्या बाबांच्याबद्दल बोलता बोलता मध्येच थांबला. माझ्या पायाकडे बघत ओरडला, "साहेब काणीट बिगटलं तुमच्या पायास्नी! वळव्याच्या पावसानं काणीटांच्या अंगात जीव धरला नव्हं."

मी पायाकडे बघितले. लांबुळके असे करडे-तपकिरी अंगाचे किड्यासारखे जीव माझ्या पायावर चिकटले होते. त्यांच्या गलगलीत अंगावर बारीक खाचा होत्या. त्यातील एक तर माझे रक्त पिऊन फुगून टम्म झाला होता, तर दुसरा पुढील शरीराचा भाग स्थिर ठेवून सबंध अंग ताणून आकड्यासारखे शरीर करत मागील अंग उचलत वरवर सरकत होता.

जळू (Leech)ला इकडे काणीट म्हणतात. हे जीव रक्त शोषून जगतात. त्यांच्या वजनाच्या तीन पट रक्त एकाचवेळी शोषतात म्हणे! या कल्पनेनेच मनात मला नेहमी त्यांच्याबद्दल भीती होती. आज तर जळूंचा हल्ला मी प्रत्यक्षात अनुभवत होतो.

जळू किंवा काणीट जेव्हा चिकटतो तेव्हा आपल्या त्वचेला खास करून जिथे नस (Vein) असते, अशा जागी त्याच्या चूषकाच्या साह्याने घट्ट पकडतो. मग नंतर तिथे चावा घेऊन Y आकारासारख्या दातांनी चिरा पाडतो. त्यानंतर त्याच्या तोंडातून लाळेसारख्या ग्रंथी सोडतो. या स्त्रावामुळे चावा घेतलेली जागा बधिर होते. शिवाय जखमेतून येणारे रक्त पातळ होते. यामुळे रक्त सलगपणे शोषणे जळूला सोपे जाते.

मी पायांवरील जळू झटकण्याचा प्रयत्न केला. त्यांना बोटांनी ओढण्याचा प्रयत्न केला तर त्यांचे लवचीक अंग ताणले जाऊ लागले व माझ्या त्वचेशी त्यांची पकड त्यांनी अजून घट्ट केली. तोवर निवरू जवळ आला. बाजूच्या कारवीच्या झुडपाचे खरखरीत पान त्याने काणीटांवर ठेवले, मग पानासह चिमटीत दुमडून काणीट पट्टदिशी बाजूला केले. काणीट चिकटलेल्या जागेवरून नंतर खूप वेळ थेंबथेंब रक्त निथळत राहिले. मग निवरूने रानातून हिंडून चिकणा (Sida Cordifolia) या वनस्पतीचा पाला आणून तो दगडाने चेचून त्या जागी बांधला.

"'जंगलात काणीट हाय तर जंगल शाबूत हाय! जंगल समृद्ध हाय. इतके दिवस उन्हाळ्यात जमिनीत लपून बसलेला हा जीव आता मिरगाच्या थेंबोट्यांच्या स्पर्शाने कसा तरतरीत झाला न्हायी! हाय का न्हाय ही निसर्गची किमया? काणीट चावा घेताना जरा बी कळणार न्हाई. पोशिंद्याला बिलकुल तसूभरबी त्रास होणार न्हाई याची समदी खबरदारी इवलासा जीव घेतो. निसर्गा तुझी अजबाईच येगळी!'"

निवरूचे हे बोलणे ऐकून मीदेखील विचारात पडलो. निसर्गातील प्रत्येक जीवाकडून आपल्याला काही ना काही शिकून घेता येते. अख्ख्या पावसाळ्यात बजबजीने दिसणारे जळू अचानक उन्हाळ्यात दिसेनासे होतात. उन्हाळ्यात त्यांचा



*काणीट / जळू*

जीवनक्रम कसा असेल, या दिवसात त्यांचे जगणे किती संघर्षाचे असेल, या विचारांनी माझ्या मनात जळूबद्दल आपलेपणाची भावना निर्माण झाली. मी याच विचारात, तंद्रीत असताना निवरू त्याच्या आजोबांकडून ऐकलेली गोष्ट मला सांगू लागला-

"एकदा म्हणे भर उन्हाळ्यात काही लोक जंगलात जमिनीचा सर्व्हे करायला गेले होते. दुपारचे जेवण जंगलातच बनवत होते. एकाने डोंगरात फिरून पळसाची पाने गोळा केली. मग जेवण वाढण्यासाठी पत्रावळ्या तयार करण्यासाठी तो एका ओढ्याकाठी गोळा केलेली पाने घेऊन बसला. खाली पडलेल्या काड्यातील एकेक काडी घेऊन पानांना टोचत त्याने पाने शिवून पत्रावळ्या तयार केल्या. त्यानंतर तयार केलेल्या पत्रावळ्या स्वच्छ धुण्यासाठी त्याने ओढ्याच्या पाण्यात खूप वेळ बुचकळल्या. मग पंगतीच्या ठिकाणी पत्रावळींचा ढीग ठेवला. थोड्या वेळातच ढिगातल्या काही ओल्या पत्रावळ्या आपोआप हलू लागल्या. सगळे भुताटकीच्या भीतीने घाबरले. मग एकाने काळजीपूर्वक न्याहाळले, तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, मगाशी पळसाची पाने शिवण्यासाठी टोचलेल्या काड्यांतील काही काड्या म्हणून सुकलेल्या

काडीसारखी पडलेली काणीटे वापरली गेली होती. पाण्याच्या स्पर्शाने त्यांना जाग येऊन ते वळवळत होते. त्यामुळे पत्रावळ्या थलथलत होत्या. ओढ्याकाठाला काडीसारख्या निपचित पडलेल्या काणीटांचा वापर पत्रावळ्या शिवण्यासाठी केल्याचे लक्षात येतात सर्वांची हसून पुरेवाट झाली." असे सांगत निवरूही खो-खो हसू लागला.

निवरू नेहमी मला अशा कित्येक रंजक, अतिशयोक्तीच्या कथा सांगत आला आहे. त्याच्या अशा ऐकीव, खोट्या कथांतूनही अभ्यासाचे नवनवे विषय सतत सापडत आले आहेत. पुढे माझी बदली दुसरीकडे झाली आणि निवरूशी कित्येक वर्षे माझी भेट झाली नाही.

एकदा कुणाकडून तरी कळले की, निवरूची तब्येत पार ढासळली आहे. सतत खोकतो, श्वास घेताना त्रास होतो, फुफ्फुसांना सूज आहे. रक्त पार आटले आहे. अंग पांढरेफट्ट झाले आहे. माझ्या मनात भीतीचा गोळा उठला. खाण्या-पिण्यातून एखादे काणीट चुकून तर गेले नसेल ना त्याच्या शरीरात!

माझ्या मनात असंख्य भीतीच्या शंका काणीटासारख्या वळवळत राहिल्या.

**-सलीम सरदार मुल्ला**

*(वनपाल, वन विभाग, कोल्हापूर)*

# अशी ही माणसं...

**माणसं बोलत राहातात**
**जातं फिरल्यासारखी वेगानं.**
**सांडत राहातं**
**सत्त्वहीन शब्दांचं पीठ त्यांच्या तोंडातून.**

**आपण सामाजिक प्राणी असल्यानं**
**करायलाच हवा चिवचिवाट वेळीअवेळी**
**म्हणून व्यक्त होताहेत**
**फेसबुक, वॉटसअॅप, ट्विटरवरून**
**आणि घाबरवताहेत घाबरलेल्या माणसांना.**

**घाबरलेली माणसं जगताहेत**
**शरीराच्या डाव्या बाजूला धडधडणारं**
**हृदय चालू आहे म्हणून.**
**शब्द अडगळीत टाकून बसली आहेत ती**
**स्वतःला म्यूट करून.**
**डोक्याला लावलाच कोणी बंदुकीचा घोडा**
**किंवा अचानक रवानगी झाली तुरुंगात**
**अजामीनपात्र गुन्हा केला व्यक्त होण्याचा म्हणून तर..**
**या कल्पनेनं थांबली आहेत ती**
**बोलायची, वाचायची, लिहायची,**
**विचार करायची.**

**अचानक गप्प झालीत माणसं**
**आपण बोललो तर कोणत्या प्राण्यात रूपांतर होईल..**
**आणि बंद होऊ पिंजऱ्यात**
**या भयानं,**
**माणसं मरत चाललीत आतल्या आत.**

**-नीरजा**

*nrajan20@gmail.com*



दिवाळीतल्या दिव्यांचा लखलखाट मनात झिरपेल, अशी एकदम उत्सवी गोष्ट!

# नंदादीपक

**नीलनं** आपल्या गूगल अकाउन्टचा पासवर्ड बदलला नि टाइप केलं, NandaDeepak_03. मग तो स्वतःवरच खूश झाला. त्याने घड्याळात बघितलं, सकाळचे साडेनऊ वाजले होते. 'म्हणजे इंडियात संध्याकाळचे सात वाजले असतील. ग्रँडमा... अहं... दादीमा दिया लावत असेल. आपणही त्याचवेळी पासवर्ड चेंज केला. व्हॉट अ कोइन्सिडन्स! दादीमाला कॉल करू या.'

असं मनाशी बोलत बोलत त्यानं फोन केला.

"दादीमाऽऽ... नील हियर. नंदादीपक लावतेयस ना? आय नो. मीही इथे एक नंदादीपक लावला. हा हा... कसा? लिसन..." नील दादीमाशी बोलण्यात रमला.

नील नुकताच भारतात येऊन गेला होता. त्याच्या आत्याबरोबर. जवळजवळ सात वर्षांनी तो भारतात आला होता. त्याआधी आला होता, पण तेव्हा तो लहान होता. जेमतेम पाच वर्षांचा. ह्या सात वर्षांत करोनासकट खूप काही घडामोडी घडल्या आणि नीलही मोठा झाला.

दिल्ली विमानतळावर उतरल्यावर तो भिरभिरत्या नजरेनं इकडेतिकडे पाहात होता. भारत खूप वेगळा वाटला त्याला. "सो कोऽझी हिअर." तो आत्याला म्हणाला. आत्या गालातल्या गालात हसली.

भारतातलं त्याच्या दादा-दादीचं घर होतं मथुरा जिल्ह्यातल्या राया गावामध्ये. मथुरा आणि वृंदावन ह्या दोन्ही महत्त्वाच्या शहरांपासून काही किलोमीटर अंतरावर. ही तीन ठिकाणं म्हणजे त्रिकोणाचे तीन कोन जणू.

दिल्लीहून राया गावापर्यंतचा कारचा प्रवास. नील तर झोपूनच गेला. अमेरिकेतल्या घड्याळाची वेळ आणि भारतातल्या घड्याळाची वेळ, ह्यांच्यातल्या फरकामुळे होणारा जेटलॅग. घराजवळ आल्यावरही तो झोपाळलेलाच होता. आत्याने सांगितलं, म्हणून फक्त दादा-दादींना नमस्कार करून तो खोलीत जाऊन पुन्हा झोपून गेला.

नीलला जाग आली तेव्हा नक्की किती वाजलेत, हे त्याला कळेचना. डोळे चोळत तो आजूबाजूला पाहू लागला. 'ओह् याह्... धीस इज इंडिया.' त्यानं घड्याळात पाहिलं. संध्याकाळ होत आली होती. नील खोलीतून बाहेर आला. घराचं निरीक्षण करू लागला. तसं त्यानं फोटोमध्ये, व्हिडिओ कॉलमध्ये घर पाहिलं होतं. पण आता प्रत्यक्ष बघताना त्याला ते वेगळंच वाटलं. 'ओहो... किती मस्त घर आहे हे. मोठ्ठं. दादाजी, दादीमा, आन्टी? कुठेत सगळे?'

जिना उतरून तो खाली आला. दादीमा दिया पेटवत होती. 'अमेरिकेत आपल्या घरी डिझाइन असलेले व्हरायटी ऑफ लॅम्प्स आहेत, पण हा लॅम्प वेगळाच दिसतोय.' नीलच्या मनात विचार आला.

दादीनं नीलला प्रेमानं जवळ घेतलं. त्याला आवडतात म्हणून दुधाचे वेगवेगळे गोड भारतीय पदार्थ तिनं बनवले होते. नील खूश झाला. तेवढ्यात दादाजीही आले. त्यांनीही नीलला जवळ घेतलं. त्याच्याशी गप्पा मारल्या. दादाजींबरोबर नीलच्याच वयाचा एक मुलगा आला होता. दादीनं त्यालाही खायला दिलं. त्यांच्या शेताची देखरेख करणाऱ्या जमनालाल यादवांचा मुलगा सुदाम. साधारण नीलएवढाच. नीलचं तोडकंमोडकं इंग्लिश-हिंदी आणि सुदामचं बृजभाषी हिंदी, त्यामुळे दोघांनाही खूप हसू येत होतं.

चार-पाच दिवसांत नील आपल्या इंडियन व्हिलेजमध्ये रमू लागला. खरंतर राया हे अगदी खेडं नव्हतं. हिंदी-इंग्लिश शाळा, इंजिनियरिंग कॉलेज, मोठी दुकानं इत्यादी बऱ्यापैकी नव्या सुधारणा असलेलं गाव. मथुरा आणि वृन्दावन अशी दोन्ही महाभारताच्या काळापासून दुधाचा व्यवसाय करणारी मोठी गावं जवळ. त्यामुळे राया गावातल्या घरांमध्येही दुधाचा व्यवसाय परंपरेनं चालत आलेला.

नीलच्या आजोबांचं घर त्यांपैकीच एक. बृजवासी मिठाईचा मोठा उद्योग चालवणारे त्याचे आजोबा आणि दोन काका. नीलचे वडील आणि आई फक्त कामानिमित्ताने अमेरिकेत. त्यामुळे नील अमेरिकेतच जन्मला नि वाढला. बाकी सगळे भारतात, राया गावातल्या घरात. नीलने आपल्या अमेरिकन दोस्तांना भारतातले फोटो पाठवले नि खाली लिहिलं... 'अ बिग इंडियन फॅमिली'...

आपल्या चुलत भावंडांशी नीलची दोस्ती झालीच, पण का कुणास ठाऊक सुदामशी जरा जास्तच मेतकूट जमलं त्याचं. सुदाम स्वभावानं अगदी शांत होता. त्याचं घरही नीलच्या घराहून लहान नि साधं होतं. पण तरीही नीलला ते चक्क आवडलं. सुदाम सुंदर स्केच काढायचा. फक्त तोच नाही तर त्याचा धाकटा भाऊ गोवर्धनसुद्धा. त्या दोघांच्या हातातली ड्रॉइंगची कला पाहून नीलला आश्चर्य वाटलं.

नीलच्या दादाजींच्या शेताजवळ गाई-म्हशींचा भलामोठा तबेला होता. तो पाहून तर नीलला खूप आश्चर्य वाटलं. तिथून काही अंतरावर दुधावर प्रोसेस करणारा आणि दुधापासून मिठाई बनवणारा त्यांचा खूप मोठा कारखाना होता.  दादाजी आणि त्याचे दोन्ही काका हे उद्योग सांभाळत होते. नीलला फार आवडलं हे सगळं.

रात्रीच्या वेळी दादी कृष्णाच्या गोष्टी सांगायची. नीलला आवडू लागल्या होत्या त्या गोष्टी. तसं त्यानं थोडंफार लॉर्ड क्रिष्णाबद्दल ऐकलं-वाचलं होतं. ॲनिमेशन फिल्मही पाहिल्या होत्या. पण, 'दादीमाकडे असलेला क्रिष्णाज स्टोरीज स्टॉक इज डिफरन्ट,' असं त्यानं आईला कळवलं.

दिवाळीच्या आदल्या दिवशी दुपारी दादी आणि नील दोघेच गच्चीतल्या शेडमध्ये बसले होते. दुपार असूनही थंड हवा अंगात हुडहुडी भरवत होती.  छान वाटत होतं. अंगाभोवती रजई गुंडाळून नीलने दादीच्या मांडीवर डोकं ठेवलं नि म्हणाला, "दादीमा... क्रिष्ण कन्हैय्या की स्टोरी बताओ."

दादी हसली, "आत्ता दुपारी? रात्री सांगीन रे."

नील हटूनच बसला. म्हणाला, "एक लहानशी सांग ना गोष्ट."

"ठीक बेटा, सांगते." दादी म्हणाली नि गोष्ट सांगू लागली.

'कृष्णकन्हैय्या ज्याच्या घरी लहानाचा मोठा झाला तो नंद राजा. गोकुळचा राजा. त्या गोकुळ गावाला वळसा घालून झुळझुळत वाहायची जमुना नदी. दिवसभर हसणारं, खिदळणारं गोकुळ तिन्हीसांजेला अंधारात गुडूप झालेलं दिसलं तिला. रोजच दिसायचं. फक्त गोकुळाच्या मध्यभागी असणारा नंदराजाचा राजवाडा मात्र, मंद सुवासाचं तेल असलेल्या एका मोठ्या दिव्यामुळे आणि लहान लहान पणत्यांमुळे उजळून निघालेला दिसायचा.

सूर्यास्तानंतर दाट काळोख पसरत असल्यामुळे गोकुळात राहणाऱ्या लोकांना आपली बरीचशी कामं त्या वेळेआधी कशीबशी संपवावी लागत. रात्रीचा अंधार चढायला लागला की, नंदराजाच्या राजवाड्यातून सर्वांचा लाडका कान्हा आपली बासरी वाजवू लागे. मग गोठ्यांतून गाई-गुरांच्या घुंगुरमाळाही शांत होत असत. आज मात्र संध्याकाळच्या वेळी या गोकुळाचं वेगळंच रूप जमुनेला बघायला मिळालं. आज गावाच्या मध्यभागी असलेला नंदराजाचा राजवाडा नेहमीप्रमाणे पणत्यांच्या प्रकाशानं लखलखला होताच, पण गावातली गरीब गोप-गोपींची लहान लहान घरंही दिव्याच्या प्रकाशानं उजळली होती. जमुनानदीला आश्चर्य वाटलं की, या गरिबांच्या घरी ही सुवासिक तेलाची दिवाळी कशी काय? तिच्या पाण्यावरचा गारवा घेऊन तो गोकुळात पसरवणाऱ्या वाऱ्याला तिने विचारलं. तो म्हणाला, "अगं जमुने, गरीब गोकुळातल्या कष्ट करणाऱ्यांच्या घरात संध्याकाळ झाली की, काळोख असतो. तेलाचे दिवे लावणं त्यांना परवडत नाही. नंदराजांच्या हे लक्षात आलं. म्हणून त्यांनी आज सकाळी आदेश दिला की, त्यांच्या राजवाड्यातल्या सर्वात मोठ्या दिव्यामधून गरीब गावकऱ्यांनी तेल घेऊन जावं. आपल्या घरातले दिवे लावावेत. हा सगळा प्रकाश त्यामुळे झालाय. चमत्कार म्हणजे, इतक्या गरिबांनी राजवाड्यातल्या दिव्यामधलं तेल नेलं, तरीही त्या

दिव्यातलं तेल काही कमी झालं नाही. तो अजून जळतोच आहे.”

हे ऐकून जमुना नदीचं मन गहिवरून आलं. तिनं प्रार्थना केली की,

“अशा नंदादीपकानं प्रत्येकाच्या घरातला, मनातला अंधार दूर होवो. मैत्रीचा, प्रेमाचा प्रकाश पसरो.”

दादीची गोष्ट ऐकता ऐकता नीलला कधी झोप लागली, हे त्याचं त्यालाच कळलं नाही.

त्याला जाग आली तेव्हा तो आश्चर्यानं भोवताली बघू लागला. संध्याकाळ झाली होती. त्याचं मोठ्ठं घर एखाद्या पॅलेससारखं झगमगलं होतं. सगळ्या खिडक्यांमध्ये, दारांमध्ये, गच्चीच्या कठड्यांवर पणत्याच पणत्या तेवत होत्या. नुसत्या तेवत नव्हत्या, तर त्या तेवणाऱ्या पणत्यांमधून एक मंद सुवास दरवळत होता.



चित्रं- अदिती पाध्ये-देसाई

‘ओह् याह्, इट्स दिवाली... फेस्टिव्हल ऑफ लॅम्प्स. फेस्टिव्हल ऑफ लाईट. व्हॉट अ स्वीट स्मेल. यस्स...आय ॲम एक्सायटेड टू सेलिब्रेट दिवाली इन इंडिया, इन माय होम स्वीट होम.’

तो जिन्यावरून उड्या मारत खाली आला. खालचं दृश्य पाहून जागीच उभा राहिला. त्याच्या घराचं जणू एका राजवाड्यात रूपांतर झालं होतं. व्हरांड्यात एक मोठा दिवा तेवत होता. सुंदर डिझाइन असलेला दिवा. दादीनं सांगितलेल्या नंदादीपकाच्या गोष्टीची आठवण झाली नीलला.

तेवढ्यात सुदाम आत आला. त्याच्याबरोबर गोवर्धनही होता. त्या दोघांनी नीलला स्वतः स्केच काढलेली, बनवलेली सुंदर ग्रीटिंग्ज देत दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. नीलकरता हे सगळं नवीन होतं. त्याला आठवलं, दादीमा घरी आलेल्या प्रत्येकाला काही ना काही घरचं देते.

तो आत गेला. आपल्या बॅगेतली ड्रॉइंगची दोन मोठ्ठी, नवी स्केचबुकं घेऊन तो बाहेर आला. त्या दोघांना ती स्केचबुकं देत त्याने दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. ते दोघंही अमेरिकेतली ती भारी भेट पाहून खूप खूश झाले.

नीलनं पाहिलं, त्याला वाटलं व्हरांड्यात लावलेला तो मोठा, सुंदर डिझाइन असलेला नंदादीपक आणखीनच झगझगलाय. सुवासिक प्रकाश देऊ लागलाय.

जणू त्या नंदादीपकातलं सुवासिक तेल आता कधीच संपणार नव्हतं. नीलच्या मनातल्या भारताबद्दलच्या, गावाबद्दलच्या, इथल्या माणसांबद्दलच्या प्रेमासारखं.

...नंदादीपकाचा लखलखीत प्रकाश घेऊन नील अमेरिकेला परत गेला.

नीलच्या लॅपटॉपवर पासवर्ड झळकत होता... NandaDeepak_03.

**-डॉ. निर्मोही फडके**
*nirmohiphadke@gmail.com*
*(लेखक, व्याख्याता)*

# पूर्वजांचे देणं!



एडक्कल केव्ह्ज्

**वायनाड** हा केरळमधला निसर्गसुंदर भाग. तिथे भटकंती करत असताना अंबलावायल ह्या शहरामध्ये बांधलेल्या, छोटेखानी हेरिटेज म्युझियममध्ये गेलो. ह्या भागातील मानववंशाचे अस्तित्व आठ-दहा हजार वर्षांपासूनचे आहे, याचे काही पुरावे तिथे मांडलेले दिसले. उत्सुकता चाळवली. जवळच 'एडक्कल केव्ह्ज्' नावाचे पुरातन ठिकाण आहे, हे कळले होतेच. परंतु तिथे जाण्यापासून मला परावृत्त करणारे दाखले दिले गेले होते, त्याचे कारण माझ्या पायांची क्षमता! "आपसे नहीं होगा.. बहोत चढ़ाव है" असे मला हॉटेलातल्या लोकांनी सांगितले होते. आमच्या गाडीच्या ड्रायव्हरचे मतही तसेच होते. लहानपणीच्या पोलियोपासून कमी झालेली स्नायूंची क्षमता आणि त्यात 'व्हेरिकोज व्हेन्स'सारख्या चिवट प्रकरणांची भर. पण मुद्दा असाही होता की ह्या साऱ्या मर्यादांसोबत राहूनसुद्धा मी बरीच भटकंती केली होती, करत होतो आणि ती सुद्धा वायफळ धोका न घेता. म्हणून ठरवले की डोंगराच्या पायथ्याशी जाऊ. चालायला लागू. ज्या क्षणी अशक्य वाटेल त्या वेळी परत फिरायचे. काही जण देवदर्शनाच्या ओढीने खडतर प्रवास करतात, तर काही जण स्वतःच्या क्षमतांना आव्हान देण्यासाठी. मला फक्त अनुभव घ्यायचा होता, अश्मयुगातील गुहा पाहण्याचा.

मी आणि सविता (माझी पत्नी) पाऊल रोवत रोवत चालायला लागलो.

## केरळमधील एडक्कल गुहेत आदिमानवाची पाषाण चित्रकला पाहाण्याच्या आणि मुळात तीनशे दगडी पायऱ्या चढून तिथपर्यंत पोहोचण्याच्या पहाडी अनुभवाचे हे मनोज्ञ शब्दचित्र–

चढण अवघड होती, पण रस्ता डांबरी होता. रात्रीच्या पावसाने ओला झाला होता. निसरडे वाटणारे पॅचेस टाळत चालत होतो. असे ठरवले की पुढच्या वीस ते पंचवीस पावलांवरचा एक टप्पा पकडायचा.. फक्त तिथपर्यंत जायचे. दहा श्वासांची विश्रांती... असे चार टप्पे झाले की वीस श्वासांची विश्रांती... असे दोन टप्पे झाले की जमेल तिथे विश्रांतीसाठी बसायचे. अशा पद्धतीने मी काही वर्षांपूर्वी श्रीलंकेमध्ये सिगीरिया नावाचा उभा पहाड टप्प्याटप्प्याने चढलो होतो. "सावकाश जा हं... ऑल दि बेस्ट." अशी सदिच्छा, परत येणारे काहीजण देत होते.

अशा वेळी दोन पथ्ये पाळायची असतात. एकतर घड्याळाशी संपर्क तोडायचा. आपल्या गतीचे नियंते आपण. आणि झपाट्याने पाठून पुढे जाणाऱ्यांचे (तुलना टाळून) छान कौतुक करायचे. घटाघटा पाणी पिणे टाळायचे. घोट-घोट पाणी अगदी छान फिरवायचे तोंडात. त्यातला ओलसरपणा पेशींमध्ये उतरवायचा आणि गिळायचे... असे प्लॅनिंग करण्याची सवय कुणी लावली मला? तर पोलियोनंतरच्या काळात आईवडिलांनी. पायाला कॅलिपर्स असतानाही नाटकामध्ये काम करण्याची संधी कोणी दिली? -क्षमतांवर विश्वास दाखवणाऱ्या शिक्षकांनी. मेडिकल कॉलेजला असताना नेरळ ते माथेरान असे सांभाळून चालत कोणी नेले? -तर मित्रांनी ! या विचारात पावले पुढेपुढे टाकली जात होती.

वळणावळणांचा हा चढ एक किलोमीटरपेक्षा थोडा जास्त असेल. गुहा वरती आहेत, समुद्रसपाटीपासून ३८०० फूट उंचीवर. सभोवार दाट जंगल. ताक, ज्यूस, चहा, कॉफी विकणारी दुकाने वाटेला जाग आणत होती आणि मुक्त संचार करणारी माकडे.

फ्रेड फॉसीट नावाचा मालाबार इलाख्याचा पोलीस सुपरिटेंडंट. शिकारीसाठी ह्या भागात आला १८९५ साली. त्याने ह्या गुहा शोधून काढल्या. असे म्हणतात की, जवळच्या जंगलात त्याला, अश्मयुगीन हत्यार सापडले आणि त्याची उत्सुकता जागृत झाली. म्हैसूरपासून मालाबार किनाऱ्यावर जाण्या-येण्याच्या व्यापारी मार्गावर हा प्रदेश आहे. पश्चिमेला खाली उतरले की कालिकत. किनाऱ्याने दक्षिणेला गेलात की क्रमाने कोचीन, त्रिवेंद्रम... ते थेट कन्याकुमारीपर्यंत! त्यामुळे मानवी वस्ती अनेक शतकांपासून इथे असणार. वहिवाटीचा रस्ता असेल तर इतिहासाच्या अनेक टप्प्यांवरच्या गोष्टी एकत्र येतात. श्रीरामांच्या बाणाने 'दुभंगलेला पाषाण' हा एडक्कलचा अर्थ. लव आणि कुशाचे संदर्भही आहेत या जागेला. मध्यप्रदेशातील 'भीमबेटका' म्हणजे भीमाची बैठक. रामायण-महाभारत हे ग्रंथ लोकजीवनाशी किती तऱ्हेने जोडले गेले आहेत पाहा! चढता चढता आता 'भव्य पाषाण' नजरेत भरू लागले होते. आणि खाली दिसणारे विहंगम दृश्यसुद्धा!

रस्ता जिथे संपतो तिथे तिकीटघर आहे. पाण्याची प्लॅस्टिकची बाटली पुढे न्यायची तर डिपॉझिट भरावे लागते. बाटलीवर स्टिकर लावतात. बॅगा आणि पर्स



आदिमानवाची
पाषाण
चित्रकला

ठेवायची सोय आहे.

आता दगडात खोदलेल्या पायऱ्यांचा, दोनशे संख्येचा चढता प्रवास! मी दगडी पायऱ्या चढायला सुरुवात केली. त्या कधी उंच, तर कधी खूप उंच होत्या. एवढ्यात माझ्या डाव्या बाजूला स्टीलचे कठडे असलेल्या पायऱ्या दिसल्या. दगडी पायऱ्यांनी चढायचे आणि स्टीलच्या बांधलेल्या पायऱ्यांनी उतरायचे, अशी व्यवस्था होती. त्याही चांगल्याच उंचसखल होत्या, पण आधारामुळे जास्त भरवशाच्या. दगडाच्या पायऱ्या दोनशे असल्या आणि ह्या तीनशे असल्या तरी श्रमांच्या दृष्टीने ह्या ठीक वाटल्या. तिकडच्या स्टाफला विनंती केली की, मला उतरायच्या वाटेने चढायची परवानगी द्या. ती पदरात पाडून त्या जिन्यांवर चढाई केली. दर बारा-पंधरा पायऱ्यांनंतर लॅन्डींग होते. आजूबाजूला माकडांचा निकट सहवास होता. जेवढा जिना नजरेत दिसत आहे, तेवढ्याचेच प्लॅनिंग करायला घेतले. जसजसा उंचावर जात होतो तसा वारा सुखावह होत होता. मला प्रोत्साहन देणाऱ्यांची संख्याही वाढत होती. धिम्या, पण कणखर गतीने गुहेच्या तोंडाशी पोहोचलो. तिथे कातळावर टेकलो. विस्मयकारक दृश्य होते समोरचे. थकवा कमी नाही झाला, पण थोडा दूर सारला गेला. गुहेत जाण्यासाठी बारा-पंधरा पायऱ्यांचा जिना उतरायचा होता.

विशाल खडक एकमेकांवर रोवून उभे आहेत, त्यामुळे हा 'निवारा' तयार झाला आहे. 'गुहा' ह्या व्याख्येत बसणारी जागा नाही ती. माझ्या डाव्या बाजूवरच्या खडकावर समोरून सूर्यप्रकाशाची लखलखती रेघ उठली होती... वीस फूट उंचीची सरळ रेषा. 'मॅकेन्नाज गोल्ड' या चित्रपटामध्ये पहाडावर पडणाऱ्या लखलखत्या प्रकाशरेषेचे दृश्य आहे; ते आठवले.  आणि त्या प्रकाशात उठून दिसत होती आदिमानवाची पाषाण चित्रकला. काही आकृत्या 'मास्क' लावल्यासारख्या दिसल्या. (हा करोना काळामुळे निर्माण झालेला दृष्टीविक्षेप तर नसेल ना!?) तिथले गाइड आम्हांला तपशील दाखवत होते. निओलिथिक आणि मेसोलिथिक अशा दोन टप्प्यांवरची अश्मरेखाटने आपल्याला पाहायला मिळतात. राजा-राणी यांच्यासारख्या आकृत्या आहेत. छोट्या मुलाची आकृती आहे. तामीळ आणि ब्राह्मी लिपीतली अक्षरेही कोरली आहेत. इतिहासाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर ती रेखाटली गेली. सिंधू (इंडस् व्हॅली) संस्कृतीबरोबर साम्य दाखवणारी काही रेखाटने आहेत. भूमितीमधले अनेक आकार एकमेकांमध्ये गुंतलेले असे आपल्याला दिसतात. एकूण चारशे वस्तू किंवा चिन्हे संशोधकांना समजली आहेत. एक हत्ती आणि एक हरीण आपण पाहू शकतो. चाके असलेला एक गाडा आपल्याला दिसू शकतो. आम्ही गेलो तेव्हा सूर्यप्रकाश होता. आतली जागा बऱ्यापैकी भव्य आहे. दोन दगडांमध्ये असलेली

एक नैसर्गिक फट आहे, ज्यातून परिसर पाहता येतो. पण त्या फटीच्या समोर अतिउत्साही प्रेक्षकांमुळे एक सळीदार दरवाजा लावावा लागला आहे... खरे तर एखादा अर्ध्या तासाचा 'लाइट ॲन्ड साउंड' शो करता येईल, अशी शक्यता ह्या जागेमध्ये आहे. पण अजूनही इथल्या सोयी प्राथमिकच आहेत. गुहेच्या जादुई वातावरणातून बाहेर पडताना जिना चढत होतो आणि लक्षात आले की अर्धा पिक्चर अजून बाकी आहे... तीनशे पायऱ्या उतरायच्या आहेत आणि अत्यंत तीव्र उतारावरून तोल सावरत चालायचे आहे. पण आता गाठीला 'मिशन फत्ते'चे समाधान होते.

आल्या मार्गाने उतरायला सुरुवात केली आणि लक्षात आले की, इथेही त्याच निग्रहाची आणि ठामपणाची गरज आहे. चढायच्या वेळी पायांसाठी वेगळी परीक्षा होती. आता वेगळी.. पुन्हा टप्पे नजरेसमोर आणले. परतीच्या प्रवासात टप्प्याटप्प्याने थोडे ताक, लिंबूपाणी आणि शेवटी तर आइस्क्रिम कोन खाल्ला. उताराच्या अखेरच्या टप्प्यावर बसलो आणि घड्याळात पाहिले, चार तास लोटले होते. काय म्हणून इच्छा झाली असेल आपल्या पूर्वजांना ही निर्मिती करण्याची?

व्यक्त होण्याची इच्छा आणि त्यासाठी माध्यमे शोधणे हा ध्यास त्या आदीम मानवापासूनचा असणार. एका बाजूला सर्जनशीलता, तर दुसऱ्या बाजूला Documentation म्हणजे दस्तावेज तयार करणे हाही भाग असेल? कुणीतरी वाचावे, पाहावे अशी performerची इच्छाही असेल? रुजर ब्रेग्मन (Rutger Bregman) या लेखकाच्या मतानुसार ह्या काळामधल्या चित्रणामध्ये शिकार आहे, पण युद्ध नाही. (ह्यूमनकाइंड, पृष्ठ ९३). दुसरे असे की, ह्या साऱ्या प्राचीन कला म्हणजे Collective work event होत्या, असे संशोधक म्हणतात. लोकांना एकत्र आणण्यासाठी आणि एकजीव ठेवण्यासाठी... मूलभूत गरजांच्या पुढे जाऊन पर्याय शोधणाऱ्या मानवी मनाचा हा आविष्कार होता. आणि तो टिकावा म्हणून निवडले होते दगडांचे माध्यम!

आणि आज, आत्ता ह्या क्षणाला हा मजकूर लिहिताना मला जाणीव होते आहे की, मीसुद्धा ह्या अज्ञात, अदृश्य साखळीमधला एक दुवा आहे... मी शब्दचित्र रेखाटतो आहे, दृश्यांना कॅमेऱ्यात पकडतो आहे, त्यामागे एक प्रेरणा आहे व्यक्त होण्याची.. अनाम पूर्वजांपासून ते फ्रेडपर्यंत आणि म्युझियम जतन करणाऱ्यांपासून ते माझ्या पालक-शिक्षकांबद्दलची कृतज्ञताही मला मांडायची आहे. आणि हे सारे फक्त 'माझे' न राहता 'सर्वांचे' व्हावे अशीही इच्छा आहेच की! एडक्कल गुहेमधली प्रकाशाची ती रेघ माझ्या मनात अधिकच लख्ख झाली... मस्त वाटलं!!

**-डॉ. आनंद नाडकर्णी**
*anandiph@gmail.com*
*(मनोविकासतज्ज्ञ)*



दोन दगडांमध्ये असलेली एक नैसर्गिक फट



# घाडसी धोंडू

**एखाद्या** लहान मुलाचा कोणी पोवाडा म्हणतं का? पण गोष्टच तशी घडली असेल तर? त्याचं झालं होतं असं...

ही गोष्ट आहे स्वातंत्र्यपूर्व काळातली.

श्रावणाचे दिवस. दुपार संपायला आलेली. सोनेरी ऊन पसरलेलं. हिरव्या गवतावर नुकत्याच पडलेल्या सरीचे थेंब. सारा माळ हिरवागार झालेला. आकाशात मधूनच जाणारा एखादा पोपटांचा थवा. त्या माळावर छोटा धोंडू उभा होता. सावळासा, काटकुळा. तो

## सत्य घटना आणि कल्पना यांचा मिलाफ असलेली साहसकथा-

धनगर होता. वेषही तसाच. गुडघ्यापर्यंत पांढरं धोतर-सदरा, डोकीवर लाल मुंडासं. अन् खांद्यावर रुबाबात धरलेली एक काठी; नाजूक वाजणारी घुंगरं लावलेली. जिच्यावर दोन्ही हात ठेवून तो शीळ घालत उभा होता. त्याच्या मेंढरांकडे बघत.. हीऽऽ मेंढरं. तपकिरी, करडी, राखाडी, पांढरी सगळीच. आणि दोन तीन कुत्रे.

मेंढरंही खुशीत होती. पाऊसपाणी भरपूर झाल्याने खायला मुबलक होतं. धोंडूही खुशीत होता. मध्येच त्याने एका बदामी रंगाच्या छोट्या पिल्लाला उचललं. त्याचे पाय त्याने धरले आणि केलं त्याला उलटं. खाली डोकं अन् वर पाय! ते म्याऽ म्याव करून ओरडायला लागलं बिचारं.

त्याचे वडील त्याला ओरडले, "ए, सोड त्याला, सोड. उगा त्रास देतो. तुला खाजकुयलीच लावीन, नाहीतर पत्री सरकारकडेच देईन."

धोंडूने डोळे मोठे केले. पिल्लाला खाली सोडलं. खाजकुयली त्याला माहिती होती. ती एक वनस्पती असते. ती अंगाला लावली की खाज सुटते. पण आता हे पत्री सरकार?

त्याने विचारलं, "अप्पा, हे पत्री सरकार काय असतं?"

त्यावर अप्पा म्हणाले, "ते सरकार असतं. इंग्रजांच्या विरुद्ध लढतं. वाईटांना सरळ करतं, कळलं?"

बिचारा धोंडू. त्याला हे सगळं कसं कळावं?

त्याने विचारलं, "मग याला आपण घाबरून राहावं का?"

त्यावर अप्पा म्हणाले, "अरे, ते सरकार आपलं असतं, आपल्यासाठी असतं."

त्यावर तो विचार करत राहिला. त्याला फार माहिती नसली तरी इंग्रज सरकारचा राग मात्र होता.

पत्री सरकार म्हणजे प्रति सरकार. क्रांतिसिंह नाना पाटील यांनी स्थापन केलेलं. ते इंग्रजांना शह देण्यासाठी, त्यांच्या विरुद्ध लढण्यासाठी होतं. सातारा-सांगली भागात, खूपशा गावांमध्ये त्यांचा कारभार चालत असे. हे सरकार लोकांना जागृत करणारं. दरोडेखोरांना, जुलमी सावकारांना वठणीवर आणणारं...

त्यांचा प्रचार गावोगाव चालत असे. शाहीर निकम यांचं पथक गावोगाव जाऊन पोवाड्यांतून, गाण्यांतून जनजागृती करे.

आता धोंडू ज्या माळरानावर उभा होता, त्याच्या शेजारी नदी होती. पलीकडे चिंचवली गाव होतं. आज रात्री तिथे पथकाचा कार्यक्रम होता. लांबवर डांबरी सडक दिसत होती. त्या सडकेवर अचानक एक ठिपका उमटला. तो मोठा झाला आणि त्याचा आवाज येऊ लागला. जीप! ती पोलिसांची जीप होती. अप्पांनी आवाज ऐकला आणि ते सावध झाले.

"धोंड्या, पोलीस! आता ते गावात जाणार आणि शाहीर पथकाला धरणार."

आता धोंडूला उलगडा झाला. त्याचं डोकं मेंढराच्या पिल्लासारखं टणाटण पळायला लागलं.

आणि मग? ...त्याने अप्पांना त्याची युगत सांगितली. काय असावी ती? ...

दोघांनी सगळी मेंढरं रस्त्यावर नेली. हाकत, इशारे करत. मुद्दाम!

पोलिसांची जीप त्यांच्या जवळ आली आणि थांबली. कारण मेंढरांनी सगळा रस्ताच अडवला होता. आता? ड्रायव्हर सोडता चार शिपाई खाली

उतरले. उग्र अन् मिशाळ. त्यांच्या हातात लांब नळीच्या बंदुका होत्या. धोंडू त्या पहिल्यांदाच पाहात होता. तो आधी घाबरला.

एक शिपाई अप्पांना ओरडला, “ए, मेंढरं बाजूला घे. का दाखवू इंगा?”

त्यावर अप्पांनी मेंढरं बाजूला घ्यायला सुरुवात केली. पण कुठली? तर जीपच्या जवळची सोडून बाकीची. त्यावर सगळे शिपाई गाडीपुढच्या मेंढरांना हाकलायला लागले. त्यांच्या हातातल्या बंदुकीच्या दस्त्याने त्यांना मारू लागले. धोंडू खोड्या काढत असला तरी त्याचं मेंढरांवर प्रेम होतं. त्यांना बसणारा मार पाहून त्याचा जीव कळवळू लागला. अन् – एकाने तर अप्पांनाच तडाखा ठेवून दिला. वर विचारलं, “गावात काय चाललंय?”

अप्पा म्हणाले, “काही नाही साहेब.”

ते पाहणाऱ्या धोंडूच्या डोळ्यांत पाणी आलं. त्याला राग आला. काहीतरी करायला हवं होतं. पण तो तर छोटासा. तो काय करू शकणार होता?

तोही मेंढरं हाकलत होता अन् तो जीपच्या मागच्या बाजूला गेला. लपत छपत. त्याच्या हातात दोन काठ्या होत्या. त्यावर खाजकुयली. त्याने त्या काठ्या त्या शिपुरड्यांच्या सिटांना चोळल्या. वर खाली आणि भरपूर. मग तो पसार झाला. त्याच्या मनात आलं-

पाठीत काठी मारता? आता कळेल तुम्हांला काठीपेक्षा खाजकुयली कसली भयंकर आहे ते!

मेंढरं हलली तशी जीपही हलली.

अप्पांचं आणि धोंडूचं काम झालं होतं. पुढे जाऊन जीप थांबली. ती थांबणारच होती ना.

शिपुरडे उतरले खाली आणि लागले पाठी खाजवायला. कराकरा अन् खराखरा!

आता खरं धोंडूचं काम होतं. पोलिसांना संशय नको म्हणून अप्पांनी स्वतःचं काम धोंडूवर सोपवलं होतं. ते मेंढरांचा कळप सांभाळणार होते.

तो पळत पळत उताराला लागला. दगडधोंडे चुकवत नदीच्या दिशेने. नदीला पाणी काही कमी नव्हतं. नुकत्याच झालेल्या पावसाने ती तर दुथडी भरून वाहात होती. गढूळ पाण्याने.

त्या पाण्यात वाहून येणाऱ्या वेली, साप अन् भोवरेही होते. पण धोंडू धाडसी पोरगा होता. त्याने धप्पदिशी पाण्यात उडी घेतली. अर्धी नदी

*चित्र- संतोष घोंगडे*



पार केल्यावर ते पाणी कापणं त्याला अवघड वाटू लागलं. पाणी त्याला पुढे खेचत होतं आणि त्याचं मन त्याला गावाकडे खेचत होतं. पाण्याला ओढ जास्त. ते पाणी जुलमी वाटत होतं - इंग्रज सरकारसारखं! तो त्वेषाने हातपाय मारत राहिला. त्याला पैलतीर गाठायचाच होता.

शिपायांची जीप पुलावर पोचायच्या आधी धोंडू पाण्यातून निथळत बाहेर निघाला. गावात पोचला. धापा टाकतच. ‘पोलिसपार्टी येतीये’, हा निरोप

त्याने गावकऱ्यांना दिला. त्यांनी ताबडतोब शाहीर निकम आणि त्यांचं पथक हलवलं. शेजारच्या जंगलातून ते एका छोट्याशा पाड्यावर पोचले. तिथे पोलीस येण्याची शक्यता नव्हती.

पोलीस गावात आले, शाहीरपथकाला धरायला. पण कसचं काय? हात हलवत, पाठी अन् बूड खाजवत त्यांना परतावं लागलं.

नंतर धोंडूच्या आईने त्याला जवळ घेतलं. तिच्या डोळ्यांत पाणी होतं, भीती होती, माया होती. त्याला खूप भारी वाटलं. अप्पांनी त्याला जवळ घेतलं. पुराच्या पाण्यात पोराला पाठवायचं, म्हणजे किती अवघड गोष्ट! पण त्यांनी मन खंबीर केलं होतं. देशासाठी! ... अन् त्यांचा धोंडूवर विश्वास होता.

धोंडू अन अप्पांचं गावानं कौतुक केलं.

पुढे त्याच गावात काही दिवसांनी ते पथक आलं आणि शाहिरी जलसा झाला. तेव्हा शाहीर निकम यांनी धोंडूचं कौतुक करून पोवाडा गायला-

*धोंडू होता वाटेला, पोलीस आलं फाट्याला*
*थोडी खाजकुयली, अन् मेंढरं अडवायला..*
*काम झालं जंगी, पोलीस लागले खाजवायला,*
*संकट टळलं आमचं, मग घ्या की वाजवायला..*
*ओ जिजी रं जिजी रं जिजी...*

धोंडू बिचारा स्वतःचं नाव ऐकून लाजला. त्याच्या आईला जाऊन चिकटला. तिने त्याच्या डोक्यावरून हात फिरवून कडाकडा बोटं मोडली. गावकऱ्यांनी खूप टाळ्या वाजवल्या.

शाहीर म्हणाले, "अशी धाडसी पोरं आपल्या देशात आहेत. मग आपल्याला स्वातंत्र्य मिळणं काय अवघड आहे? आणि अशा देशात आपण राहतो याचा पुढच्या पिढीला अभिमानच वाटेल."

**-ईशान पुणेकर**
*Bip499@hotmail.com*
*(ज्येष्ठ साहित्यिक)*

# Puzzle




१) वरील चौकोनात पाच अक्षरी इंग्रजी शब्द लिहा. आडव्या व उभ्या शब्दांचा समानार्थी अर्थ बाहेरच्या चौकोटीत लिहिला आहे. चौकोनातील अक्षरांपासून तीन अक्षरी शब्द बनवा.
किमान- पाच / कमाल- कितीही




२) प्रत्येक आडव्या व उभ्या रांगेतील पदावलीचे उत्तर 18 आहे. त्यासाठी पिवळ्या चौकोनात योग्य चिन्हं लिहा.

**-सुरेखा काणेकर**
*rekhakane@gmail.com*

# हसरी दुनिया

Sense of Humour is sense of Proportion ! असं म्हटलं जातं. हे सेन्स ऑफ प्रपोर्शन म्हणजे, तारतम्याची जाणीव ! आपल्या आसपास अशी माणसं असतात, काही हसणारी तर काही कायम गंभीर चेहरा करून वावरणारी.. तर अशा 'सिरियस' माणसाकडे तुम्ही पाहिले, तर कळेल की या माणसांना भोवताली काय गमती-जमती चाललेल्या आहेत, याचा पत्ता नसतो. 'मधुमती' या जुन्या सिनेमातल्या एका गाण्याच्या ओळी आहेत -

रुत मतवाली झूमे डाली डाली,
जाने जग सारा-जाने ना माली...

म्हणजे बागेत सगळीकडे बहार आलेली आहे, पक्षी बागडत आहेत, फुलं डोलत आहेत आणि हा माळी- त्याला खबर नाही कारण तो खाली पाहून फक्त कामच करीत बसलेला आहे. झाडांची मशागत करण्याच्या कामात तो इतका गुंतलाय की, त्याला गंमत कळतच नाहीये !

न हसणारा (सेन्स ऑफ ह्यूमर नसलेला) माणूस या माळ्यासारखा असतो. माळी कामाचा असतो, प्रामाणिकही असतो, पण परिसराचे भान असायला हवे ना !

त्याच्या उलट असतो हसणारा माणूस !

हास्यचित्रे (कार्टून्स) आपण पाहतो आणि पटकन आपली कळी खुलते ना ! आपल्या 'वयम्' अंकात नियमित येणारे अदिती पाध्ये-देसाई यांचे मिनूचे हास्यचित्र तुम्हांला आवडते ना ! शिवाय चिंटूची हास्यचित्रे तुम्ही आवडीने वाचता.

दिल्लीहून प्रसिद्ध होणाऱ्या 'इंडिया टुडे' या








नियतकालिकाचे पूर्वी एक  मुलांसाठीचे मासिक होते- टारगेट (Target) नावाचे. Rosalind Wilson या ब्रिटिश शिक्षणतज्ज्ञाने हे 'टार्गेट' मासिक सुरू केले होते. १९८५ ते १९९५ या दशकात हे  मासिक लोकप्रिय झाले होते. त्यात अजित निनान यांची हास्यचित्रं फार लोकप्रिय झाली होती. आज ते देशातले महत्त्वाचे राजकीय व्यंगचित्रकार आहेत.

अजित निनान यांच्या या सदरातील निवडक हास्यचित्रांचा संग्रह 'Ajit's Funny World!' या नावाने १९८७ मध्ये प्रकाशित झाला होता. तो माझ्याकडे आहे. आंध्र प्रदेशात जन्मलेले अजित निनान यांचे शिक्षण आधी हैद्राबादला, त्यानंतर चेन्नईला झाले. त्यांच्या या हास्यचित्र संग्रहाच्या मलपृष्ठावर (ब्लर्ब) नमूद केले आहे- If these illustrations don't make you laugh- go, see a Doctor!

तेव्हा, हास्यचित्रांच्या मजेदार दुनियेतल्या काही हास्यचित्रांची आपण मजा घेऊ या!

**-मधुकर धर्मापुरीकर**
*madhukardharmapurikar@gmail.com*
*(ज्येष्ठ साहित्यिक)*

## Find the way : clues-





"Sir, There is an old man from a nearby village at the door. He wants to meet you", Mamata, my assistant said coming out from my clinic situated behind the patio.

"Is it an emergency?, I asked.

"He does not have a patient with him Sir, it is he who wants to meet you." Mamata said.

It was a Sunday morning and I was relaxing with a cup of tea and a heap of newspapers in the patio. After a long and busy week with dogs and cats, and some sick goats and sheep I was looking forward to a quiet Sunday, reading and lazing about the house. I was not in the mood to do anything else. Mamata also had come to the clinic only to arrange some boxes of vaccines that had arrived the previous day.

"Ask him to take an appointment on a working day." I said irritably. But Mamata said that he had walked all the way from his village only to meet me and she couldn't say no to him.

'Was there no peace in a vet's life', I wondered and went into the clinic.

"Namaskar, Doctor Saheb." The old man stepped in and greeted me a bit apologetically. He was a simple villager of about 60 plus in dhoti, shirt and chappals, with a worried face but eyes that looked peaceful.



# A Return Gift

*Illustrated by Juilee Mahimkar*

I recognized him immediately.

"Namaskar! Kasa kaay!" responding him I asked if he would like to have some tea.

Although he said nothing, I asked Mamata to get one hot cup of tea with lots of sugar in it for the farmer, who had walked all the way from his village.

"So what brings you here on a Sunday morning? I hope your shepherd dog Sheroo, who looks after the sheep is well?" I asked

"Yes, he is doing fine, Saheb, thank god." he nodded. "But, It is one of my sheep I brought to you last year, if you recall, died suddenly in an epidemic". The wrinkles on his forehead deepened further.

"Oh, sad! So the epidemic got there too! What were the symptoms? These things happen. Nothing is immortal. I remember the last time after I treated her she happily went back in your arms"

"She returned home with me and was also recovering fast until suddenly one fine morning she lay dead. Then one by one another twenty of my dear sheep died of the same disease", he said.

"Yes, I have heard of this epidemic spreading in the nearby villages, and was concerned. In fact, I wanted to visit your village to inspect for myself exactly what the cause was, but the work in the city didn't allow me any time. Have you bought more sheep now? In case you have, have you ensured they are separately housed?" I said.

The villager didn't answer. It was as if there was something that was deeply bothering him. He just kept quiet for some time looking at the floor. He finished his tea and left the cup aside.

He gathered some courage and said, "Saheb, I am very poor and when I saw all my darlings leaving me one by one, I became very sad and depressed. I too fell ill. I had to spend a lot of money on doctors and medicines. I also had to sell one of my three cows. The only one who sustained me through this depression was Sheroo, my dog."

He grimaced and continued, "I took up some work with the rich farmers to raise some money," He said, and





took out some prescriptions by doctors and the cash receipts paid by him for medicines, from his pocket to show me the expenses incurred.

"Good you found some work. Now go and deposit the money you earned in the bank so that there will be some amount available when you need it." I said, becoming a little restless for he was taking too much of my time to come to the point. As I got up from the chair, to my surprise, he got up too and left a few Rs 500/- bills in my palm and said, "Sir this is yours."

"For me? No! Why in the god's name?" I muttered.

"The last time when I brought the sick sheep to you, I didn't have any money to pay your fees. You treated my sheep and went in a hurry to treat another patient, in emergency. I waited for some time and left without explaining. Since then it has been on my mind. Now that you heard my story, please forgive me for not paying your fees earlier."

"No!" I screamed and put the bills back in his shirt pocket and said, "Sorry, I cannot accept it. You need it the most."

I was stunned to find this gesture from a poor shepherd.

Reluctantly the old man took the money, turned and left.

I looked at him walking away from my clinic, in admiration. I looked up at the sky. The first monsoon showers were about to arrive. When I turned back I found a basket of fresh eggs left behind on the table. The basket symbolized much more than what it contained. It was re-experiencing a touch of human values that had become rare but not extinct.

**-Vidya Dengle**
*vidyadengle@gmail.com*
***(Violinist, Painter, Sculptor, writer)***

**जितकं अन्न खातील तितके गुलाबी!**

फ्लेमिंगोंचे (रोहित पक्षी) अन्न म्हणजे कीटक, मासे, अळ्या आणि शेवाळ. या अन्नातून त्यांना कॅरोटीनोइड (Carotenoids/ रंगद्रव्य) मिळतात, त्यामुळे या पक्ष्यांना केशरी-गुलाबी रंग मिळतो. हे पक्षी जितकं शेवाळ खातात तितका त्यांच्या पंखांचा रंग गुलाबी होतो. विचार करा, आपण जर पालक किंवा टोमॅटो खाऊन हिरवे किंवा लाल झालो असतो तर...?!



**-देवयानी खरे** | *devyanikhare28@gmail.com*

**या कविता आहेत तरुण कवींच्या. नामवंत कवींच्या घरात जन्मलेले, कवितेचे वातावरण अनुभवत मोठे झालेले तीन तरुण कवी आणि त्यांची अभिनेत्री मैत्रीण, कवयित्री स्पृहा जोशी मिळून कविता-वाचनाचा कार्यक्रम अधूनमधून करतात. आपण त्यांना आवाहन केले की तुम्ही 'वयम्'च्या बाल-किशोर वाचकांसाठी कविता करा. त्यांनी व स्पृहाने मनावर घेतले आणि या कविता आपल्यासाठी केल्या. हे तीन तरुण कवी म्हणजे प्रवीण दवणे यांचा मुलगा आदित्य, अरुण म्हात्रे यांचा मुलगा संकेत आणि किशोर पाठक यांचा मुलगा प्रथमेश.**

# नाव नसलेलं गाव...



दोन गावांमध्ये होते
एक छोटेसे गाव
पण गावाचे एके दिवशी
हरवून गेले नाव

नाव नसलेल्या गावाची
माणसं इतकी छान
इवली इवली बोटे
आणि मोठे त्यांचे कान

काय असावं नाव
म्हणून भरली मोठी सभा
सर्वांना ह्या गावामध्ये
स्पष्टपणाची मुभा

एक म्हणाला ह्या गावाचे
नाव असावे शेंदूर
दुसरा म्हटला नाही नाही
नाव केवळ डोंगूर

शेवटी उठला एक तान्हुला
म्हटला करूया युक्ती
नाव शोधूया इतके सोपे
मिळे पेचातून मुक्ती

आभाळातून देतो पाऊस
निर्मळ निळसर पाणी
पक्ष्यांचीही हिरवी ओली
ऐकू येतात गाणी

नदी वाहते दुधासारखी
प्रेम झिरपते कणकण!
म्हणून म्हणतो नाव असावे
गावाचे आईपण!

इतके गोंडस इतके गोडूस
असे पडावे नाव
शेत रहावे हिरवे हिरवे
सुखात न्हावें गाव

**-संकेत म्हात्रे**

# बालपण

असे वाटते पुन्हा एकदा बालवायचे होऊन जावे
आजीच्या कंपित हाताला लगडून पुन्हा कृतार्थ व्हावे

पुन्हा एकदा बोक्या, चिंटू कुठे हरवली साद दिसावी
टवकारून मग कान दिशेने काम हातचे सोडून द्यावे

बाबाच्या बळकट बाहुवर पुन्हा एकदा झोकून आणिक
कोकणच्या त्या निळ्या सागरी हवे तेव्हढे मी डुंबावे

कथा अपुरी ठेवून गेले कुठे कळेना अण्णा अमुचे
अधुऱ्या गोष्टीतील राजासम पुन्हा एकदा धुंडित जावे

आई येई, पहाट घाई, उठवाया परी मी न उठावे
शाळेची ती टमटम जाता, पुन्हा एकदा सुखी निजावे

खेळ असावे मैदानी ते, अन् काढावी खोड मिनेची
रडता रडता ती जाता, मी पुन्हा एकदा विजयी हसावे

पुन्हा एकदा 'शुभंकरोति कल्याणम्' मी गात रहावे
प्रसाद येता गोड शिऱ्याचा दोन्ही हातांनी तो खावे

कपिलेचे ते शुभ्र वासरु येता मी का मान डुलवते?
मामाला हे प्रश्न विचारून कोड्यामध्ये पुन्हा पडावे

शेणाचाही वास सुखावा देऊन जातो अंगणात या
सदाफुलीचे फूल पसरले पुन्हा एकदा मी वेचावे

कसे कळेना रस्ता भटकत मी आलो या भयाण जागी
शहर बापडे म्हणता याला गाव असे का संथ दुरावे

**-आदित्य दवणे**



*सर्व चित्रं- धनंजय गोरेगावकर*

# अंधाराला घाबरू नको...

अंधाराला घाबरू नको, माझ्या पिल्ला
दिवस संपलाय ना, मग
पृथ्वीला पण नको का झोपायला?

सूर्य असतो कठोर जरा,
पण हे चांदणं नाही कधीच,
आणि हे चमचम तारे आहेत ना,
ते तर नेहमी आपले,
कायम आपल्यासाठीच..

रात्रीशी एकदा दोस्ती झाली ना
मग भीती नसते बघ कशाची,
विचारांच्या बागुलबुवाला
एंट्रीच नसते स्वप्नांच्या दुनियेची!

दिवसा वाटतं पिल्ला,
अडचणी संपणारच नाहीत बघ,
पण रात्री, गाढ रात्री मात्र
शांत हसतं, निजतं जग..!!

-स्पृहा जोशी

*(रस्किन बॉण्ड यांच्या Don't be afraid of the dark कवितेचा भावानुवाद)*



# भागो यारो भागो



सबवे सर्फर, ल्युडो बिडो
काही नव्हते तेव्हा
लंगडी, चल्लस, आबाधुबी
खेळत असू जेव्हा

टॅबवरती खेळून खेळ
पोट कसे रे भरते?
एकही गुडघा न फुटताही
भूक कशी अन् लागते?

ऑनलाइन सगळे भेटून
अरे गोळ्या कसले मारतात
आणि अभ्यास करताना
मग डोळे चुरचुर करतात

घामाचा एक थेंबही नाही
कसे खेळता खेळ?
व्यायाम फक्त बोटांचा अन्
त्यात चालला वेळ

घराबाहेर पडा रोजचे
मैदानांवर जा
माती लगडू दे अंगाला
मगच घरात या

ऑनलाइन गेमिंग विरंगुळा
पण व्यसन न त्याचे लागो
मैदानांवर जाऊन ओरडा
'भागो यारो भागो'!

**-प्रथमेश किशोर पाठक**



# Cinderella shoes

*Illustrated by Juilee Mahimkar*

"Chanda, wait!" Chanda kept running and jumping while her elder brother, Suraj, tried to catch up with her. She was thrilled to see rows of lights that had brightened the market pavements. Shops selling lanterns and diyas were enhancing the beauty. While happily absorbing Diwali's festive mood, Chanda abruptly stopped near a shoe showroom that had kept many attractive shoes on display. The blinking lights decorating the showroom windows gave a dazzling effect even to the shoes. Chanda liked to stop there every day while returning home from school, to have a look at the shoes. But today, she was particularly charmed

by a pair of beautiful golden shoes embellished with delicate kundan and mirror work.

"Bhaiyya, Cinderella shoes... Look at those heels, so big!" Chanda exclaimed. She was in love with Cinderella's fairy tale which she had read umpteen times.

"They are so delicate. I don't know how Cinderella managed to run at midnight wearing such high heeled shoes. If you put them on and run like you did just now, they will break in no time. And if they don't, you will twist your ankle for sure." Suraj joked that vexed Chanda. She had a fixation for shoes which she knew her family couldn't afford. But somewhere in her mind she always longed for a pair of beautiful shoes like Cinderella's.

Chanda and Suraj were from a humble background. Both studied in a municipal school near their home. Chanda was in the third standard and Suraj studied in the ninth. Their Baba was a cobbler who ran a modest shoe repairing shop exactly opposite the shoe showroom, across the road. Their Amma helped in family's income, by stitching clothes.

On their way home, Suraj bought a parcel of vada-pav for both of them.

"Bhaiyya, Amma will scold us if she comes to know."

"Amma has given me the money to celebrate as our exams are over." Suraj assured as they both relished on their 'grand' feast. They knew the art of finding happiness in small things.

"Chanda, look your shoe's torn in the front. I will fix it when I go to the shop tomorrow. But I think you should buy a new pair." Suraj helped his father at their shop whenever possible.

"What about yours? They are beyond repair now. In fact, it's you who should be buying new shoes this Diwali."

"There is Diwali party in your school day after tomorrow. Our cousin's wedding is also coming up in a few days. Girls like to look nice and pretty on such occasions. Don't worry, I will talk to Baba."

"Amma has already stitched me a new dress for Diwali. I don't want any new shoes."

"But you had liked the ones at the store."

"Such expensive shoes...? Then we will need a miracle fairy to get them for us."

"We can buy cheaper ones from some sale then."

"Instead, we will buy a saree for Amma and a shirt for Baba. They hadn't had any new clothes since

last two years." Chanda was very sensible and mature for her age.

"Let's see." Suraj dismissed the conversation for the moment. But the thought of getting his little sister a nice pair of shoes made him restless. He was quiet and kept thinking the entire evening.  Suddenly, an idea struck in his head, just like a lantern illuminating darkness.

Suraj took out the rough book from his school bag and drew some shoes' pictures with designs. He opened Amma's bag in which she kept discarded cloth pieces from her stitching. He selected a big piece of Chanderi silk fabric in golden colour. While, Amma and Chanda were busy in the kitchen, he carefully selected some sequins, golden laces and buttons, pearls, mirrors and tiny bells from Amma's tailoring kit; and of course, Chanda's pair of shoes. He quickly kept them in the bag that he always carried to the shop.

Suraj went to the shop early next morning as his father had to go somewhere for work. This was a splendid opportunity for Suraj. He fixed Chanda's shoes, cleaned them and put a new sole and insole. He then measured the shoes and cut the Chanderi cloth in shape and stitched it firmly all around the shoes. He pasted sequins, pearls and mirrors on the upper front portion of the shoes creating an elegant floral design. He then fixed tiny bells that gave a pleasant tinkling sound when the shoes moved. While attending customers on one side, Suraj was busy the whole morning making 'designer' shoes for Chanda.

After giving final touches to the shoes, Suraj kept them aside for drying. A girl, who had just come there to fix her chappals, noticed them.

"Mamma, Cinderella shoes..." She exclaimed. Suraj looked up, surprised.

"Wow! Such beautiful hand-embroidered shoes! Do you make them?" The girl's mother enquired.

"No. It's the first time. I made them for my sister."

"Will you make a pair for me too?" The girl insisted to which Suraj readily agreed. The gesture endorsed that Suraj's designer shoes had shaped well.

A contented Suraj returned home that noon, with shoes gift-wrapped in a box. He kept them on the shoe-rack and called Chanda.

"Bhaiyya, I told you not to…" Chanda protested when she found the box.  She carefully opened the wrapping and was shocked to see similar shoes that she had liked at the showroom, "Cinderella shoes?"

She almost screamed.

"Minus the heels…" Suraj smiled.

"But where are mine?"

"These are the ones." Chanda couldn't believe.

"You made them?" Baba, who had returned home by then, asked astounded. Suraj nodded. Baba took the shoes and inspected them from all sides.

"Bhaiyya, you really made them?" Suraj then explained how he had given a facelift to a worn out pair of Chanda's shoes.

"So my tailoring material went into shoe-making, eh?" Amma appreciated Suraj's efforts but warned him to ask her before he took any of her material.

"My entire life went in mending shoes but my son has taken a step forward..." Baba was all praise for Suraj's work.

"This is a perfect Bhaidooj (Bhaubeej) gift… For this year's Bhaidooj, Bhaiyya gifts designer shoes…" Chanda winked and everyone laughed wholeheartedly.

Chanda's shoes were a rage amongst girls at the school's Diwali party. While returning home, she stopped at the shoe showroom like she always did. Those golden shoes were still on display. "You may be expensive, but mine are priceless." Chanda thought aloud as she walked past them, "My Bhaiyya fairy did the miracle after all!"

**-Prachi Mokashi**
*mokashiprachi@gmail.com*

## पाण्यात उकळा किंवा अंतराळात सोडा, आम्ही तसेच..



टार्डीग्रेड (Tardigrade) हा आठ पायांचा चिवट प्राणी सुरवंटासारखा दिसतो; मात्र त्याचे तोंड खारीसारखे लांबोळके दिसते. हा प्राणी नीट बघण्यासाठी मायक्रोस्कोपचा वापर करावा लागेल. यांच्या काही जाती जमिनीवर, तर काही पाण्यात आढळतात. अगदी -३५८ ते ३०४ डिग्री तापमानातही हा प्राणी जगू शकतो. टार्डीग्रेड हे डायनॉसॉर काळाच्या आधीपासून अस्तित्वात आहेत. २००७मध्ये काही शास्त्रज्ञांनी टार्डीग्रेड असलेली काही लाकडं एका डब्यात टाकून सॅटेलाईटद्वारे अंतराळात पाठवली. सूर्याच्या अतिनील किरणांमध्ये आणि हवेच्या अभावातही टार्डीग्रेड बराच काळ जिवंत राहिले, याचे सर्वांनाच आश्चर्य वाटले.

**-देवयानी खरे** | *devyanikhare28@gmail.com*

गोष्ट

मनात रेंगाळेल अशी छानशी गोष्ट–

# टीम करवंदे



**सुरुवातीला** हवीहवीशी वाटलेली उन्हाळ्याची सुटी शेवटी फारच कंटाळवाणी झाली. सुट्टीत आमच्या लहान-मोठ्या सहली झाल्या. नाटकं-सिनेमे पाहून झाले. मनसोक्त खेळलो. आवडीच्या पदार्थांवर ताव मारला. हे सारं करूनही कंटाळ्याचं शेपूट लांब ते लांबच! त्यामुळे कधी एकदा शाळा सुरू होतेय असं होऊन गेलं. नाही म्हणायला एक गोष्ट चांगली झाली. मृगाचा पाऊस तेवढा वेळेवर सुरू झाला; आणि त्याने सगळं वातावरण बदलून गेलं. उष्माही गायब झाला. अशातच जूनच्या मध्यावर एकदाची शाळेची घंटा वाजली. मग मात्र आमची मरगळ घरट्यांतून झेपावणाऱ्या

पक्ष्यांसारखी भुर्रकन उडून गेली! जुने मित्र-मैत्रिणी कितीतरी दिवसांनी भेटले. सुट्टीत कोण कुठे गेलं होतं, मामाच्या गावाला जाऊन कुणी काय धमाल केली, या गप्पागोष्टी संपता संपेनात. सुट्टीतले उद्योग मित्रांना खुलवून-खुलवून सांगताना आणि मित्रांचे एकेक उपद्व्याप ऐकताना खूपच मजा येत होती.

शाळा सुरू झाली, तरी पहिले काही दिवस अभ्यासाचा फारसा लकडा नसतो; पण ते सुख कुठे आमच्या नशिबी होतं? कारण यंदाचं आमचं नववीचं वर्ष होतं. पुढच्या वर्षी दहावी! त्यामुळे, अभ्यास, गृहपाठ हे सगळं लगेचच सुरू झालं होतं. 'अळंटळं न करता आता नीट अभ्यासाला लागा,' असा धोशा घरीदारी सुरू झाला होता. दहावीचा ताण आम्हांला आधीच जाणवू लागला होता.

बघता बघता अभ्यासक्रम पुढे सरकू लागला. आमचे शनिवार-रविवारही या चक्रात अडकले! आम्ही असे गुंतलेलो असतानाच, एके दिवशी वर्गात शेवटच्या बाकावर एक नवा चेहरा दिसला. काहीसा बुजलेला. थोडासा बावरलेला. अबोल.. शांत शांत.

तो आल्याच्या पहिल्याच दिवशी वर्गशिक्षकांनी या नव्या मित्राची ओळख करून दिली- हा राम करवंदे. आपल्या शाळेत नव्यानं आला आहे.

शेवटच्या ओळीतल्या एका बाकाजवळ राम उभा होता. सगळ्या वर्गानं माना वळवून वळवून रामकडे नीट पाहिलं. सावळा वर्ण. मध्यम शरीरयष्टी आणि साधा-जुना गणवेश.

करवंदे हे आडनाव तर आम्ही पहिल्यांदाच ऐकत होतो. आम्हांला आधी वाटलं, असलं कसलं बुवा हे आडनाव? काहीच अर्थ नसलेलं. महेश म्हणजे वर्गातला स्कॉलर मुलगा. मधल्या सुट्टीत आम्ही सगळे डबे खाताना तो म्हणाला, "करवंदे हे कुठं आडनाव असतं काय? पण त्यातही एक गंमत आहे बरं का! बघा हं; हे दोन शब्द करा- 'कर' आणि 'वंदे' असे. आता कळला का अर्थ? अरे, हा नवा मित्र म्हणतो आहे- मला वंदन करा!" आमच्या कंपूतले सगळे पोट धरून धरून हसले. मग काय? पुढचे काही दिवस राम म्हणजे आमचा चेष्टेचा हुकमी विषय होऊन बसला. रामच्या तोंडावरही आम्ही त्याची टिंगल करत असू. मात्र राम कधीच कुणावर रागावला नाही, की त्याने कुणाशी अबोला धरला नाही, उलट आमच्याबरोबर हास्यात तोही सहभागी होई.

रामच्या बाकावर शेजारी बसणाऱ्या मित्राने एके दिवशी नवीच गोष्ट सांगितली, "अरे, रामच्या वहीतलं अक्षर म्हणजे एकदम छापील, सुबक, वळणदार, नेटकं." आम्हांला वाटलं, रामचं अक्षर असं सुंदर असून किती असणार? फार तर वाचता येईल एवढं, कारण हस्ताक्षर स्पर्धेत बक्षीस मिळवणारे तिघे-चौघे मित्र आमच्या कंपूतच होते. त्यामुळे त्यांच्यापेक्षा दुसऱ्या कुणाचं हस्ताक्षर सुंदर असूच शकत नाही, असा आमचा समज होता. मात्र रामचा शेजारी ते काही मानतच नव्हता!

एके दिवशी आमच्या कंपूतल्या एकानं मधल्या सुट्टीत डबा खाण्यासाठी रामला बोलावलं. आमच्याबरोबर रामनेही दप्तरातून त्याचा डबा काढून हातात घेतला. आमचे बहुतेकांचे डबे स्टीलचे, चकचके, कुणाकुणाचे तर रंगीबेरंगी, नक्षीचे. आणि रामचा डबा कसला होता ठाऊक आहे? श्रीखंडाच्या रिकाम्या डब्यासारखा प्लास्टिकचा. वरचा रंग उडून गेलेला. झाकणालाही कडेनं चिरा पडलेला. आमच्या डब्यात आईने दिलेले आमच्या आवडीचे पदार्थ होते. खाऊ होता. रामच्या डब्यात दुमडलेली भाकरी आणि लालभडक चटणीचा गोळा! कंपूतल्या सगळ्या मित्रांनी नाकं मुरडली. 'रामचा डबा बघा' असं परस्परांना डोळ्यांनी खुणावलं. एकमेकांना कोपरखळ्या

मारून रामचा 'तसला डबा' पुन्हा पुन्हा दाखवला आणि गालातल्या गालात हसलोदेखील! मात्र रामच्या चेहऱ्यावरचं हसू मावळलं तर नव्हतंच, उलट तळ्यातल्या पाण्यावर वाऱ्याच्या धक्क्यांनी हलक्या लाटा तरंगत राहाव्यात, तसं फुलत होतं.

शाळा सुरू झाल्यावर जवळ जवळ महिनाभरानं राम आमच्या वर्गात आला होता. वर्गात त्याआधी शिकवून झालेला अभ्यासक्रम घरी त्याने स्वतःच पूर्ण केला होता. एवढंच नव्हे, तर आधीचे सर्व विषयांचे गृहपाठही त्याने केले होते. अगदी व्यवस्थित.

एके दिवशी अचानक आमचे मुख्याध्यापक वर्गात आले. दहावीच्या वर्गांना ते गणित शिकवत. 'गणिताचे नामांकित शिक्षक' अशी त्यांची ख्याती होती. आम्ही त्यांच्याबद्दल आणखीही ऐकून होतो, की ते खूप कडक आणि शिस्तप्रिय आहेत!

मुख्याध्यापकांनी वर्गात प्रवेश करताच, आम्ही सगळे घाबरून बाकांवर ताठ बसलो. वर्गातली एरवीची कुजबूज क्षणात विरून गेली. मुख्याध्यापक कधीकधी गणिती कोडी किंवा कठीण गणितं सोडवायला सांगत. हेही कुणीतरी सांगितलेलंच; पण आमचा वर्ग तर नववीतल्या 'हुश्शार' मुलांचा! मग भीती कसली?

सरांनी आम्हांला एक गणित सांगितलं, आणि ते सोडवायला दहा मिनिटांचा वेळ दिला. या वेळेच्या आधी गणित सोडवून झालं तर वही बंद करायची आणि जागेवर उभं राहायचं, मात्र दहा मिनिटं झाल्यावर, वहीत गणित जेवढं सोडवून झालं आहे, तिथेच थांबायचं आणि वही मिटायची, अशी सूचना सरांनी केली होती.


चित्रं- अदिती पाध्ये-देसाई

गणित कठीण होतं. आमचा कस पाहणारं होतं. माना खाली घालून आम्ही ते सोडवायची कसरत करत होतो. अधून मधून आमचं लक्ष स्कॉलर महेशकडे होतं, पण त्याची मानही खाली वहीतच!

चार-एक मिनिटांनी शेवटच्या बाकावर थोडी हालचाल जाणवली. आम्ही अंदाज घ्यायचा प्रयत्न केला, काय? गणित पूर्ण करून मागं कुणी उभा राहिलाय की काय? शेवटच्या बाकावरला राम वही बंद करून उभा राहिला होता!

दहा मिनिटांचा वेळ संपला. सगळ्या बाकावरल्या वह्या बंद झाल्या. मुख्याध्यापक बाकांच्या मधल्या जागेतून रामकडे गेले. त्यांनी त्याची वही उघडून पाहिली. काही क्षणातच त्यांनी रामच्या पाठीवर शाब्बासकीची थाप दिली. म्हणाले, गुड! एक्सलंट!

मुख्याध्यापकांचा चेहरा आनंदाने उजळून गेला होता. त्यांनी रामला वर्गात पुढे बोलावलं. तिथल्या टेबलाजवळ उभं राहायला सांगितलं.

"बाळ, नाव काय तुझं?"

"मी राम. राम करवंदे."

"शाळेत नवीन आहेस?"

"होय सर. याच वर्षी नववीच्या वर्गात आलो आहे."

"आधी कोणत्या शाळेत होतास?"

"आमच्या आदिवासी पाड्यापासून सात किलोमीटरवरच्या हायस्कूलमध्ये. एका छोट्या खेड्यातली ही शाळा आठवीपर्यंतच होती; म्हणून नववीला इकडे आलो."

"इथे राहतोस कुठे?"

"गावातली काही मुलं राहतात, त्या झोपडपट्टीत."

"आम्हा सगळ्यांना काम करून पोट भरावं लागतं. मीही सकाळी काही बंगल्यांत झाडलोट, फरशी पुसणं, मोटारी धुणं अशी काम करतो. आमच्यातलाच कुणी कुणी आळीपाळीनं स्वयंपाक करतो. ते झाल्यावर मी शाळेत येतो. शाळा सुटल्यावरही मी तासभर एका दृष्टिहीन आजोबांना पुस्तकं वाचून दाखवायला जातो. घरी येऊन जेवण करतो; आणि मग अभ्यास. खोलीतल्या काहींना पहाटे कामावर जायचं असतं; त्यामुळे त्यांना लवकर झोपायचं असतं. मग तिथे दिवा लावता येत नाही. जवळच्या चौकात कार्पोरेशनचा मोठा दिवा आहे. त्या झगझगीत प्रकाशात मला हवा तेवढा वेळ अभ्यास करता येतो."

हे ऐकून आम्ही सगळेच स्तब्ध झालो होतो. राम बोलत होता, तेव्हा आमचे डोळे भरले होते. आमच्या वर्ग-शिक्षकांनीही कितीतरी वेळा डोळ्यांवर रुमालाची घडी दाबून धरली होती.

मुख्याध्यापकांनी रामला नववीच्या आणि दहावीच्या पुस्तकांचा नवा कोरा संच बक्षीस दिला. त्याच्याकडे तो सोपवताना सर म्हणाले होते, खूप मोठा हो बाळ!

रामने आमच्या मनात त्याचं स्वतःचं वेगळं स्थान केव्हाच मिळवलं होतं!

**-मल्हार अरणकल्ले**
*arankalle.malhar@gmail.com*
*(कथाकार)*

# Puzzle

**Sometimes there are seven boxes here and sometimes there are eight. How many do you count?**



---

**आपल्या प्रत्येकात काहीतरी विशेष आहे. तसंच आपल्या मित्र-मैत्रिणींमध्ये विशेष काय आहे, ते शोधा. फक्त विशेषणाच्या सुरुवातीच्या अक्षराने सुरू होणारं ते नाव हवं. उदा :-**

**१) कष्टाळू- कविता २) शूर- शांभवी**
**३) हसरी- हर्षदा ४) अवखळ- अवनी**

# कुडता पेंटिंग!







**कुडता** हा काही रोज घालायचा पोशाख नाही. प्रत्येक सणाला वेगवेगळे कुडते विकत आणणं योग्य नाही. पण नेहमी एकच एक कुडता घालून बोअर होतं, हेही तितकंच खरं.

यावर एक उपाय आहे. जुन्या कुडत्याचा कायापालट करायचा!

फॅब्रिक पेंट किंवा ॲक्रेलीक पेंट घे. कुडत्याच्या रंगावर उठून दिसतील असा रंग निवड.

पहिल्यांदा कुडत्याला जिथे रंग लावणार आहेस, त्या भागाच्या खाली जुना जाड कागद किंवा वर्तमानपत्र टाक. म्हणजे सदऱ्याच्या मागच्या बाजूला रंग डोकावणार नाही.

आता सदऱ्यावर फळ्यावरच्या खडूने चित्र काढ. म्हणजे तो नंतर झटकून काढता येतो.

आता आवडीचे सोपे चित्र निवड. दिवाळी म्हटली की पणती, कंदील, रांगोळी वगैरे काढण्याचा विचार करशील, पण अशाने हा कुडता केवळ दिवाळीतच घालण्यापुरता राहील. त्यामुळे चित्र असं असावं की हा कुडता कुठल्याही वेळी घालता येईल. म्हणून शक्यतो भौमितिक आकार, अमूर्त आकार किंवा हवे ते चित्र रेखाटून त्यावर फॅब्रिक पेंटने रंगवून घे.



दुसरा प्रकार म्हणजे ब्लॉक प्रिंट. तुला राजस्थानी लाकडी ब्लॉक विकत मिळाले तर उत्तम. अलीकडे असे ब्लॉक स्टेशनरीच्या दुकानात मिळतात. तसे नाही मिळाले तर एका ४ बाय ४ इंच आकाराच्या फोमवर डिझाइन कोरून घेता येईल. मात्र त्यासाठी मोठ्यांची मदत घे. जाड पुठ्ठ्याचा किंवा इव्हा शीटचासुद्धा ब्लॉक करता येईल.

या ब्लॉकला ब्रशने हवा तो रंग लावून कुडत्यावर ठेवून समान दाब देऊन छाप पाड. आता सदऱ्याच्या आतील कागद तसाच ठेवून स्वच्छ हाताने तो कुडता हँगरला अडकवून किमान दोन तास वाळू दे.

प्लेन सदऱ्याच्या कुठल्या भागात डिझाइन करायचे आहे, ते आधी ठरवून घे. गळ्याकडे की खालच्या भागात, हाताला की अंगभर, हे ठरवून खडूने मार्किंग करून घे. त्यानुसार छापे पाड.

तुझा तू स्वतः डिझाइन केलेला कुडता तुला नक्कीच आवडेल.

**-श्रीनिवास बाळकृष्ण**
*Shriba29@gmail.com*

कल्पक, चौकस किशोरांचे मासिक
अहम् आवाम्
वयम्
'वयम्' न्यू वंदना को.ऑप.हा.सो., ३रा मजला, लालबहादूर शास्त्री मार्ग, वंदना सिनेमाजवळ, ठाणे- ४००६०२.
दूरध्वनी : ०२२-२५९८६२७० इमेल : info@wayam.in वेबसाइट : www.wayam.in

**वाचकांमध्ये 'वयम्'ची लोकप्रियता वाढत आहे. 'वयम्'चे सभासदत्व घेण्यास उत्सुक असलेल्यांच्या सोयीसाठी आमच्या प्रतिनिधींची ही यादी. हे 'वयम्' प्रतिनिधी म्हणजे 'वयम्'चा प्रसार प्रेमाने करणारे दूत आहेत.**

# 'वयम्' प्रतिनिधी

**पुणे (पिंपरी-चिंचवड)**
सुप्रिया पुराणिक
7030360758

**गोरेगाव-मुंबई**
अनघा अनिल चंद्रात्रे
8080550353

**पालघर**
मनोविकास ग्रंथोत्सव
9967081527

**गिरगाव-मुंबई**
मेसर्स बी.डी.बागवे एजन्सी
7506000869

**वरळी-मुंबई**
संजना चव्हाण
9221969336

**डोंबिवली**
सुनिल पांचाळ
9930016920

**कल्याण**
डॉ. योगेश जोशी
9757077614

**कल्याण**
विकास वाचनालय (DSK)
9819931421

**बदलापूर**
नेत्रा नरवणे
9604677297

**अलिबाग**
श्रुती संतोष बोंद्रे
9423381129

**रत्नागिरी**
गार्गी केदार देवस्थळी
9404331020

**कणकवली-मालवण**
सुषमा केणी
9284035326

**वेंगुर्ला-सिंधुदुर्ग**
मधुरा नित्यानंद आठलेकर
9405925454

**उदगीर**
नितीन दुरुगकर
9579018581

**कराड**
संजय पुजारी (**डॉ.कल्पना चावला विज्ञान केंद्र**)
9226163260

**नांदेड**
शिवाजी आंबुलगेकर
9423440598

**लातूर**
ज्ञानप्रकाश बालविकास केंद्र
9421693089

**लातूर**
वैद्य जयश्री कुलकर्णी
9326190749

**बुलढाणा**
मैत्री नरेंद्र लांजेवार
7666407475

**कोल्हापूर**
डॉ. धनश्री खाडे
9604636893

**अकोला**
उत्कर्ष जैन
9850263103

**SWS फायनान्शिअल सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड**

**नाशिक**
रुपाली कुलकर्णी
9011896681

**मुंबई**
किशोर काळे
9869239940

ऑनलाइन इंग्रजी बोलायला शिकण्याची
THE KINGS' English Academy
'वयम्'च्या वाचकांसाठी सुवर्णसंधी. केवळ 2000/- रुपये भरा आणि एक महिना ऑनलाइन क्लास आणि दोन वर्षांसाठी 'वयम्'चे सभासदत्व मिळवा. **विद्यार्थी, शिक्षक, महिलांसाठी स्वतंत्र बॅच.**

**संपर्क- प्रा. श्रुती राजे**
8421113111
9822240106

कल्पक, चौकस
किशोरांचे मासिक

अहम् आवाम्

# वयम्

आपला सारे


न्यू वंदना को. ऑप. हाऊसिंग सोसायटी, ३रा मजला,
लालबहादूर शास्त्री मार्ग, वंदना सिनेमाजवळ, ठाणे ४०० ६०२
दूरध्वनी : ०२२-२५९८६२७३/ ६९०८६२७३
'वयम्' मोबाइल : ९१३७१२८९१५
इमेल : info@wayam.in
वेबसाइट : www.wayam.in




## सभासद नोंदणी फॉर्म

**१ वर्ष**
**₹ ११००/-**
डिलिव्हरी चार्जेससहित

**१० + १ दिवाळी अंक**

scan here to pay

नोंदणी क्रमांक : ................ दिनांक : ................

नाव : ................

पत्ता : ................

................ पिन कोड : ................

जवळची खूण : ................

फोन : ................ इमेल : ................

जन्मतारीख : ................ इयत्ता : ................

शाळा : ................

वर्गणी जमा केल्याचा तपशील

चेक नं. : ................ बँक व बँक शाखा : ................

चेक दिनांक : ................ रुपये : ................

'वयम्'च्या ऑनलाइन सबस्क्रिप्शनसाठी माहिती-

Labindia Analytical Instruments Pvt. Ltd. Axis Bank, Thane | CC A/C No.: 911030017556004 | IFSC : UTIB0000061

चेक / डिमांड ड्राफ्ट : लॅबइंडिया ॲनॅलिटीकल इन्स्ट्रुमेंटस प्रा.लि.
(Labindia Analytical Instruments Pvt. Ltd.) या नावाने काढावा.

सही : ................

*'वयम्' मासिकाचे वर्गणीदार झाल्याबद्दल धन्यवाद!*



कल्पक, चौकस किशोरांचे मासिक
अहम् आवाम्
वयम्
ऐकता ऐकता
वाचू या!
गोष्टी
English
गप्पाटप्पा
कल्पक
लवकरच येत आहे..
मुलांचं आवडतं
वयम् मासिक आता श्रवणीय! -
वयम् ॲप
GET IT ON Google Play
Download on the App Store
www.wayam.in | 7045453343

RNI NO.MAHMUL/2013/53138 POSTAL Reg. No.THC/85/2020-22 Post at Mumbai Patrika Channel Sorting Office G.P.O. Mumbai 400 001
Published on 1st of every month and posted on 5th of every month

